आधुनिक केसरी

रविवार, २७ नोव्हेंबर २०२२

⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१०६

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 20 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-106 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# भाजप हा पक्ष आहे की चोरबाजार

## उद्धव ठाकरे : चिखली येथे शिवसेनेचा शेतकरी मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली : भाजप हा पक्ष आहे की चोरबाजार आहे. त्यांच्या पक्षातील नेते पाहिल्यानंतर बाहेरच्या पक्षातील नेते जास्त असल्याचे दिसते. त्यामुळे भाजप हा आयात पक्ष झाला. असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली गावात शिवसेनेचा शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बोलत होते.**

यावेळी पुढे बोलताना ठाकरे म्हणाले की, बुलढाण्यात आल्यानंतर काही जुने चेहरे दिसत नाहीत. पण जुने चेहरे फसवे निघाले, गद्दार निघाले. त्यांना असे वाटले की बुलढाणा त्यांची मालमत्ता आहे. पण तुम्हाला पाहिल्यानंतर धगधगत्या मशाली असल्यासारखे वाटते. आपले सरकार व्यवस्थित चालले होते. पण यांनी सरकार पाडले. पण यांची पाडायची पद्धत कशी आहे. आपल्याला हुकूमशाही हवी की लोकशाही, हा महत्वाचा प्रश्न आहे. काही जण 40 रेडे घेऊन गुवाहाटीला गेले आहेत. 40 रेडे मी नाही म्हटले, त्यांच्याच मंत्र्याने म्हटले आहे. मी मुख्यमंत्री झाल्यानंतर शिवतिर्थावरच शपथ घेतली. आमची कुलस्वामीनीचे दर्शन घेतले आणि त्यानंतर आयोध्येला गेलो होतो. हे आज तिकडे गेलेत नवस फेडायला. गेल्या आठवड्यात गेले होते, स्वतःचा हात दाखवायला. ज्याला स्वतःचं भविष्य माहित नाही, तो आपले भविष्य ठरवणार. तुमचे भविष्य जे आहे ते कुरमुडे ज्योतिषाला विचारून जमत नाही. तुमचे भविष्य दिल्लीमध्ये बसणाऱ्यांना विचारा. त्यांनी उठ म्हटले की उठायचे बस म्हटले की बसायचे अन् हिंदुत्व वाचवायला शिवसेना सोडून निघाले, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला. दसऱ्याला ठरवलेलं मुंबईबाहेर पहिली सभा बुलढाण्यात घेणार. गद्दारी गाढायची असेल तर जिजाऊंचा आशीर्वाद घ्यायलाच पाहिजे, असे ठाकरे म्हणाले. गद्दारांना बाळासाहेबांचे नाव पाहिजे आणि आशीर्वाद मोदींचा. छत्रपती शिवाजी महाराज जुने आदर्श कसे होऊ शकतात? महाराजांचा अपमान सहन करणार नाही? 92-93 ला बाबरी पाडली तेव्हा तुम्ही कुठे बिळात लपला होतात, असा टोला भाजपला लगावला. सुप्रिया सुळेंवर राजकारणात शिवीगाळ कशी करु शकतात? मी असतो तर लाथ मारुन पक्षाबाहेर केले असते? अब्दुल सत्तारांचा उद्धव ठाकरेंकडून गटार असा उल्लेख करण्यात आला. महापुरुषांचा, महिलांचा अपमान तरीही तुम्ही शेपट्या घालून कसे बसता? आपले सरकार गेल्याने शेतकर्यांचं नुकसान झाले. खोटे बोलून, रेटून सरकार चालवलं जात आहे. छत्रपती शिवजी महाराजांची तलवान आणणार अशी घोषणा करणार आणि राज्यपाल अपमान करणार दिल्लीकरांना काय वाटतं महाराष्ट्रातील मर्दानगी संपली काय? वेळ पडली तर महाराष्ट्र बंद करावा लागेलमाझ्या शेतकऱ्यांचं भविष्य काय? मुख्यमंत्री हेलिकॉप्टरने शेतात जातात.. हेलिकॉप्टरने शेतकऱ्यांच्या शेतात जाणारा दुसरा मुख्यमंत्री दाखवा आणि एक लाख मिळवा... दुखण्यामुळे घरातून मी कारभार



केला तरीही तुम्ही मला मदत केली, त्याबद्दल धन्यवाद यावेळी बैलपोळ असा कळला की बैलांवर लिहिलं होत 50खोके एकदम ओके हे आज अपप्रचार करत होते की यांनी हिंदुत्व सोडले का? आम्ही तर काँग्रेससोबत गेलो पण हे मेहबूबासोबत गेले त्याचे काय...? नामांतराला मी परवानगी दिली होती काय कमी केले होते तुमचे आम्ही, तुम्ही रक्ताची किंमत विसरलात काय? तुमच्यावर गद्दार मरेपर्यंत शिक्का लागलाय.. तो कधीही पुसरणार नाही. निवडणुकीत जिंकणे हरणे आलेच पण हे गद्दार म्हणण्याच्या लायकीचे राहिले नाहीत. जी ताकद पंजाबच्या शेतकऱ्यांनी दाखविली ती तुमच्यात आहे. आता ती सरकारला दाखवा, असे आवाहन ठाकरे यांनी केले.

# अभिनेते विक्रम गोखले काळाच्या पडद्याआड

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रंगभूमी, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिका अशा सर्वच माध्यमांतून आपल्या अभिनय कर्तृत्वाचा ठसा उमटवून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ अभिनेते-दिग्दर्शक विक्रम चंद्रकांत गोखले (वय ७७) यांचे प्रदीर्घ आजाराने खासगी रुग्णालयात निधन झाले.



सीमेवर लढणाऱ्या जवानांना अर्थसाह्य करण्याबरोबरच रोखठोक भूमिका घेणारे पारदर्शी व्यक्तिमत्त्व असा सामाजिक भान जपणारा कलाकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्यामागे पत्नी वृषाली आणि कन्या असा परिवार आहे.

विक्रम गोखले हे गोखले घराण्याच्या अभिनय परंपरेतील चौथ्या पिढीचे प्रतिनिधी होते. त्यांच्या पणजी दुर्गाबाई कामत या भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री अभिनेत्या, तर आजी कमलाबाई गोखले (पूर्वाश्रमीच्या कमलाबाई कामत) या पहिल्या बाल-अभिनेत्री होत्या. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांची निर्मिती आणि दिग्दर्शन असलेल्या १९१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मोहिनी भस्मासुर' चित्रपटात दुर्गाबाई यांनी पार्वतीची आणि कमलाबाईंनी मोहिनीची भूमिका केली होती. ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले यांचा अभिनयाचा वारसा पुढे नेताना विक्रम गोखले यांनी सीमेवरील जवानांसाठी अर्थसाह्य करण्याची परंपरा जीवनाच्या अखेरपर्यंत सुरू ठेवली. रंगभूमी, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिका अशा तीनही माध्यमांतून गोखले यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटविला आहे. अभिनयासोबतच त्यांनी लेखन आणि दिग्दर्शनही केले आहे, त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'आघात' हा चित्रपटाचे समीक्षकांनी विशेष कौतुक केले होते. २०१३ साली प्रदर्शित झालेल्या 'अनुमती' या चित्रपटातील अभिनयासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले, घशाच्या त्रासामुळे २०१६ मध्ये त्यांनी नाटकातील अभिनयातून संन्यास घेतला होता. नवोदित कलावंतांना अभिनय प्रशिक्षण देण्याचे अध्यापन कार्य गोखले सध्या करीत होते. अभिनय क्षेत्रात हयात घालवूनही उपेक्षित राहिलेल्या कलाकारांना त्यांच्या वृद्धापकाळी हक्काचे घर असावे या उद्देशातून विक्रम गोखले यांनी स्वतःची जागा अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाला देऊन दातृत्वाचा मानदंड प्रस्थापित केला. क्षेत्रातील योगदानाबद्दल विक्रम गोखले यांना २०१५ मध्ये विष्णूदास भावे जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. बलराज साहनी-साहिर लुधियानवी फाउंडेशनतर्फे बलराज साहनी पुरस्कार, क्रीडामहर्षी हरिभाऊ साने जीवनौरव पुरस्कार, पुलोत्सव सन्मान यांसह चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार अशा महत्त्वाच्या पुरस्कारांचे ते मानकरी होते.

# लवकरच हिंगोली-मुंबई रेल्वे

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** आंदोलनाला अखेर यश आले आहे. लवकरच हिंगोलीवरुन मुंबईला रेल्वे सुरू होणार आहे. हिंगोली ते मुंबई रेल्वे फेरी सुरू करा, या



मागणीसाठी रेल्वे संघर्ष समिती आणि सर्व हिंगोलीकरांच्या वतीने 23 नोव्हेंबरला रेल्वे रोको आंदोलन करण्यात आले होते. आंदोलकांनी तेव्हा अमरावती-तिरुपती एक्सप्रेस रोखून आंदोलन केले होते. अखेर या आंदोलनाला यश आले असून लवकरच काजीपेठ दादर ही रेल्वे फेरी सुरू होणार आहे. हिंगोलीकरांच्या वतीने 23 नोव्हेंबरला रेल्वे रोको आंदोलन करण्यात आले होते. आंदोलकांनी तेव्हा अमरावती तिरुपती एक्सप्रेस रोखून धरली होती. याबाबत आंदोलकांनी मागण्यांचे निवेदन प्रशासनाला दिले, त्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. आता या आंदोलनाला यश आले आहे. आता काजीपेठ दादर ही रेल्वे फेरी लवकर सुरू होणार आहे. ही रेल्वे फेरी दादर-औरंगाबाद-पूर्णा-हिंगोली-अकोला-वर्धा-बल्लारशाह-बरास्ता-काजीपेट आशा प्रवास करणार आहे. या माध्यमातून हिंगोलीचा आता थेट मुंबईशी संपर्क राहणार आहे.

# ग्रंथ वाचनामुळे समाज ज्ञानसंपन्न : ज्येष्ठ साहित्यिक सुधीर रसाळ

## समाज माध्यमांच्या व माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे समाजातील वाचनक्षमता कमी


आधुनिक केसरी न्यूज

औरंगाबाद : वाचनामुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात व वैचारिक दृष्टिकोन बदलतो. सामाजिक आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी वाचन आवश्यक असून ग्रंथ वाचनामुळे समाज ज्ञानसंपन्न होतो असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक सुधीर रसाळ यांनी केले. ग्रंथोत्सव 2022 उपक्रमांतर्गत उद्घाटन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर, ज्येष्ठ पत्रकार अण्णा वैद्य, ग्रंथालय सहायक संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाहक गुलाबराव मगर, कैलास पब्लिकेशनचे कुंडलिक अतकरे, माहिती अधिकारी मीरा ढास यांच्यासह विविध शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी व नागरिक उपस्थित होते. वाचकांची संख्या वाढविण्यासाठी ग्रंथोत्सवासारखे साहित्यिक उपक्रम महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. समाज माध्यमांच्या व माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामूळे समाजातील वाचनक्षमता कमी झालेली दिसून येते. त्याचप्रमाणे मराठी लेखकांचे लेखन हे पुस्तक स्वरुपात प्रकाशित न होता, समाजमाध्यमातून प्रकाशित झाल्याने पुस्तक वाचणाऱ्यांची संख्या कमी झाल्याची खंत रसाळ यांनी व्यक्त केली. विज्ञान तंत्रज्ञानाच्याबाबतीत अधिक साहत्य निर्मिती न झाल्याने ज्ञान क्षेत्रात योगदान देणारे मराठी साहित्य पाहिजे तेवढ्या प्रमाणात प्रकाशित झाले नाही. येथून पुढे बदललेल्या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी लेखकांनी मराठी भाषा ही ज्ञान भाषा व्हावी म्हणून विज्ञान- तंत्रज्ञानाच्या आधारावर मराठी साहित्य निर्माण करावे, अशी अपेक्षा मराठी साहित्याचे समिक्षक रसाळ यांनी व्यक्त केली. उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी ग्रंथोत्सव मोलाची भूमिका निभावतो. आपल्या व्यक्तीमत्व विकासात वाचनाचे महत्व अनन्यसाधारण असल्याचे कार्यक्रमात सांगितले. ग्रंथ दिंडीस विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद दोन दिवसीय ग्रंथोत्सावाची सुरुवात क्रांती चौक येथून ग्रंथ दिंडीने झाली. ग्रंथ दिंडीच्या





उद्घाटनास अप्पर जिल्हाधिकारी डॉ. अनंत गव्हाणे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. ग्रंथ दिंडीमध्ये पारंपारिक वेशभूषेत विद्यार्थ्यांनी ढोल, ताशा आणि लेझीम या वाद्यांसह सहभाग घेतला. या नादमयी वातावरणात ग्रंथ दिंडीची सांगता विभागीय ग्रंथालय आवारात करण्यात आली. ग्रंथ दिंडीमध्ये डॉ. देसरडा पब्लिक स्कूल, औरंगाबाद, गजानन विद्यामंदिर, रांजणगाव (शें.पु.), बसवंतराव पाटील इंग्लिश स्कूल रांजणगाव, अलमीर सेकंडरी हायस्कूल, औरंगाबाद इत्यादी शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन दोन दिवसीय ग्रंथोत्सवाच्या निमित्ताने शासकीय ग्रंथालय परिसरात ग्रंथप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे . याचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यीक सुधीर रसाळ यांच्या हस्ते करण्यात आले . या ग्रंथ प्रदर्शनात विविध प्रकाशकांनी ग्रंथसंपदा सवलतीच्या दरामध्ये वाचकांना विक्रीसाठी उपलब्ध करुन दिली आहे . या ग्रंथ प्रदर्शनाचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन विभागीय ग्रंथालय, खोकडपूरा आणि जिल्हा ग्रंथालय कार्यालय यांच्यामार्फत करण्यात आले आहे . आज 26 नोव्हेंबर संविधान दिन असल्याने भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन कार्यक्रमात करण्यात आले . यावेळी डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन मान्यवरांनी अभिवादन केले .





# स्वामीकृपा

आधुनिक केसरी



त्यांना असे दिसले की एका लाडवावर एक बदाम खोचलेला होता, तो बदाम आता नाहीसा झाला होता. त्यांनी त्या आजींना सांगितले की आज तुमच्या नैवेद्याचा स्वीकार स्वामींनी केला आहे. हा चमत्कार पाहून सगळ्यांनाच मोठा आनंद आणि आश्चर्य वाटले आणि सगळ्यांनी भक्तिभावाने स्वामींना हात जोडले. रेश्माला वाटले आज आपण लाडू आणले असते तर, आपलाही नैवेद्य स्वामींनी ग्रहण केला असता. या विचाराने मन जरा खट्टू झाले. तिची नाराजी पाहून रंजनाताईंनी तिची समजूत घातली. त्या म्हणाल्या, ' तू सगळे मनोभावे करते आहेस. स्वामी निश्चितच तुझा नैवेद्य स्वीकारतील. तू नाराज होऊ नकोस. ' रेश्मा पुढे आपल्या नियोजित मीटिंगसाठी गेली. ती मीटिंग जरा लांबली पण तिला एका पार्टीची ऑर्डर मिळाली. संध्याकाळच्या मीटिंगमध्ये तिला एका साखरपुड्यासाठी ऐंशी लोकांच्या जेवणाची ऑर्डर मिळाली. त्या आनंदातच ती घरी आली. संध्याकाळी नितीन घरी आल्यावर तिने त्याला सगळी हकीगत सांगितली. नितीन म्हणाला, ' स्वामीकृपेने आपल्याला काम मिळाले आहे ही खूप चांगली गोष्ट आहे. आता आपण जेवणाच्या आधीच घरी स्वामींना नैवेद्य दाखवू. आणि मग जेवण करू या. तिलाही हा विचार आवडला. दोघांनीही शुचिर्भूत होऊन स्वामींना लाडवाचा नैवेद्य दाखवण्यासाठी डबा उघडला आणि काय आश्चर्य..! रेश्माने एका लाडवाला खोचलेला बदाम नाहीसा झालेला होता, त्या लाडवाचा एक घास कोणीतरी खाल्लेला दिसत होता. घरात तर कोणीच नव्हते. मग रेश्माच्या लक्षात आले की रंजनाताईंकडे ज्या आजी मेथीचे आणि डिंकाचे लाडू घेऊन आल्या होत्या, त्या दुसऱ्या तिसऱ्या कोणी नसून त्यांच्या रूपाने स्वामी माऊलीच त्या ठिकाणी आली होती. रेश्माचा राहिलेला नैवेद्य स्वामींनी अशा तऱ्हेने स्वीकारला होता. रेश्माचे डोळे आता भरून आले होते. स्वामींचे आभार कसे मानू असे तिला झाले. आपली श्रद्धा मनापासून असली तर ती स्वामींपर्यंत पोहोचतेच याचा साक्षात्कार तिला झाला होता. भक्तांच्या पाठीशी स्वामी माउली उभी असतेच. तिला फक्त शुद्ध भक्ती हवी असते. मानवसेवा हिच ईश्वरसेवा असते हाही संदेश माउलींनी या घटनेतून दिला होता. रेश्माला स्वामींचे वचन आठवले.



# आनंदी पहाट

## प्रत्येक आर्थिक गुंतवणूक भावनिकतेतून नसावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दैनंदिन खर्चात मोठ्या रक्कमेच्या खर्चासाठी आपल्याला सतत पैसे लागत नाहीत मात्र छोट्या रक्कमेच्या वस्तूंची खरेदी मात्र वरचेवर आपल्याकडून सारखीच होत असते. आणि यातच आपल्याजवळील पैसे किती आणि कसे संपले याचा ताळमेळच काहीवेळा जमत नाही. त्यामुळे एकवेळ मोठ्या खर्चासाठी फार मागेपुढे पाहण्याची गरज नाही परंतु छोट्या खर्चांवर मात्र काटेकोरपणे लक्ष ठेवणं तसेच असे खर्च आपल्या मर्यादेत आणि नियंत्रणात ठेवणं केवळ आवश्यकच ठरतं असं नाही तर बचतीच्या दृष्टिकोनातून फायदेशीर ठरतं. आपल्या घरातल्या लहान मुलांना एक, दोन, पाच रुपयांची नाणी त्यांच्या घरेलू बँकेत ठेवण्यासाठी द्या. आपल्यापेक्षा हि लहान मुलेच बचतीचे काम नेटानं करतात.

थेंबे-थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एक एक रुपयांच्या बचतीतून त्यांच्याच भावी आयुष्यासाठी लाखो रुपयांची बचत होऊ शकते. अनेक प्रकारच्या बिलांची रक्कम आगाऊ भरल्यास अथवा इंटरनेटद्वारे भरल्यास मिळणारी सूट एकप्रकारे काही प्रमाणात आपली बचतच करत असते. प्रत्येक महिन्याची हि एकूण रक्कम अगदी शंभर रुपये असली तरीही वर्षभराची याद्वारे होणाऱ्या आपल्या बचतीची रक्कम एक हजार दोनशेहून अधिक असणार आहे. आपल्या पैशाच्या गुंतवणुकीला भावनांची जोड असते. आपल्या भाव-भावना, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण, चांगले-वाईट अनुभव या सर्वच गोष्टींचा संबंध आपल्या पैशाच्या गुंतवणुकीशी असतो. त्यामुळे आपण करत असलेली "गुंतवणूक भावनांची असते आणि आनंद कोट्यावधींचा असायला लागतो". या आनंदाची अनुभूती अनुभवण्यासाठी निश्चितच काही विशेष खबरदारी घ्यावी लागते. काहीवेळा आपल्या गुंतवणुकीचा विषय भावनेचा असल्यामुळे आपण निर्णय देखील भावनेच्या आहारी जाऊन घेतो. आणि तो भावूकतेत घेतलेला निर्णय आपल्या भवितव्यावरच घाला घालतो.

## उथळ पाण्याला खळखळाट....

आधुनिक केसरी

झऱ्याच्या पाण्याला खळखळाट खूप असतो. पाणी कमी असते .पण पाण्याचा आवाज जास्त येतो. परंतु एक सुंदर संगीत या पाण्याला निर्माण होते. कितीतरी अडथळे त्या पाण्याला पार करावे लागतात.

ती अडथळे येतात म्हणूनच तर झऱ्याच्या पाण्याला सुंदर संगीत तयार होते व पाणीही खूप स्वच्छ असते. स्वच्छ सुंदर पाणी पाहून कोणालाही ते पिण्याची इच्छा निर्माण होते. उपहासाने एखाद्या अल्प ज्ञानी व्यक्तीला उपमा देतात, "उथळ पाण्याला खळखळाट फार ". कारण आपल्याकडे जे काही अल्प आहे ते लगेच लोकांना सांगण्याची, दाखवण्याची घाई असते. तेव्हा त्यांना "उथळ पाण्याला खळखळाट फार."असं म्हटल्या जातं. पण झरा जरी खळखळाट करून वाहत असला तरी वाहतांना त्याला जे अडथळे येतात त्या अडथळ्यांमुळे त्याचा आवाज येतो व एक नादमधुर संगीत तयार होते. झरा कितीतरी लोकांची तहान भागवतो. पशुपक्ष्यांची तहान भागवतो .समुद्र शांत आहे.खोल आहे. सगळ्या गोष्टी पोटात सामावून घेतो. सगळे छान आहे. पण त्सुनामी लाटा आल्यावर सगळं नाहीसं सुद्धा करतो. तेव्हा जंगलात ,शेतात वाहणाऱ्या झऱ्याला उथळ पाण्याला खळखळाट असं नाव ठेवता येणार नाही. जे लोक थोड्याशा संपत्तीचा अल्प ज्ञानाचा गर्व करतात त्यांच्या बाबतीत आपण म्हणू शकतो ,"उथळ पाण्याला खळखळाट". माणूस कितीही मोठा झाला, कीतीही संपत्ती कमावली, कितीही मोठे पद मिळवले तरी त्याचे पाय जमिनीवर असणे गरजेचे आहे. तो हवेत गेला की अहंकार आला, अहंकार आला की मानवाचा दानव झालाच म्हणून समजा. आपल्याला आपल्या मुलांना दानव नाही तर मानव करायचे आहे. एक चांगला आदर्श माणूस जो माणसाशी माणसाप्रमाणे प्रेमाने वागेल. हेच तर आपल्या संस्काराचे फलित आहे.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-50

## संध्याकाळी झाडू मारला तर चालतो का?

संध्याकाळी झाडू मारला तर चालेल का तर, संध्याकाळी घरात का झाडू मारू नये, वास्तुशास्त्र आणि पौराणिक मान्यतेनुसार झाडू आपल्या घरातील केरकचरा, घाणच दूर करत नाही तर आपल्या जीवनात येणाऱ्या दारीत्र्यतेला देखील बाहेर काढत असतो. तो आपल्या घर कुटुंबामध्ये सुख समृद्धी आणतो. झाडू मध्ये धनाची देवी लक्ष्मिमातेचा वास असतो. तुम्ही झाडूचा आदर कराल तर हा लक्ष्मी देवीला प्रसन्न करण्याचा संकेत असतो. जर आपल्याकडून झाडूचा मानसन्मान करण्यात कमी पडते तर याचा परिणाम नीच्छितच आपल्या जीवनावर, कमाई वर आणि कुटुंबाच्या आर्थिक संपन्नतेवर होतो. हा झाडू घरात रहळणाऱ्या व्यक्तींवर नकारात्मक प्रभाव टाकत असतो. झाडूचे महत्व असे देखील सांगितलं जात की रोगांना दूर करणारी शितला माता आपल्या एका हातात झाडूचा वापर करत असते.

झाडूचा वापर करताना काही खास गोष्टींची आपल्याला काळजी घेतली पाहिजे आणि हिंदू परंपरेत अशी अनेक कामे आहेत, ज्यास संध्याकाळी करण्यास मनाई केली जाते. असे म्हटले जाते की असे केल्याने लक्ष्मी तिची कृपा दर्शवित नाही आणि घरात आर्थिक संकट सुरू होतात. वास्तुशास्त्रानुसार दिवसा पहाटे ते संध्याकाळपर्यंत घर स्वच्छ करण्यासाठी योग्य काळ मानला जातो. संध्याकाळी सूर्य मावळायच्याया कामासाठी अयोग्य असल्याचे सांगितले जाते. म्हणजेच सूर्यास्तानंतर एखाद्याने झाडू नये. असे मानले जाते की सूर्यास्तानंतर रात्री झुडूप केल्याने घरात दारिद्र्य येते. आणि संपत्तीची देवी लक्ष्मी रागावते. परंतु कधीकधी अशी परिस्थिती देखील उद्भवते की आपल्याला सूर्यास्तानंतरच झाडू मारायची वेळ येते.

**संध्याकाळी झाडू मारावाच लागला तर हे काम करा :** जर काही कारणास्तव झाडू मारावाच लागत असेल तर आपण काय करू शकता? बऱ्याच वेळा अशी परिस्थिती येते की आपल्याला सूर्यास्तानंतरच झाडू मारायला वेळ मिळतो किंवा कित्येक दिवसांनी कोठेतरी गेल्यानंतर आपण घरी पोचता आणि घरात धूळ स्थिर होते, तर आपल्याला संध्याकाळी झाडू मारावी लागते.

# “निरूपण”

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

### भक्ती

अंबे तुझिया चौकटी। रगडिती जे नाकटी।।
त्यांचिया पाय भूकटी। लावी जो भाळपाटी।।
नुरतसे आडकाठी। त्याचिया मुक्तीपाठी।।
बसता भवाची रट्टी। हास मायेच्या चौकटी।।

## || मुखी नाम, नीतिचे आचरण, हृदयी भगवंताचे प्रेम ||



आधुनिक केसरी

ज्याच्या मुखात नाम आहे त्याच्या हृदयात राम आहे खास. ज्याच्या हृदयात राम आहे, तो राम म्हणूनच मी पाहतो. प्रपंचामध्ये जोपर्यंत आपण भगवंत आणला नाही, तोपर्यंत प्रपंचाला पूर्तता नाही आली. प्रपंचाचे आपण मालक बनू या; प्रपंचाचे गुलाम नाही आपण बनू. जो प्रपंचाचा गुलाम बनेल त्याला समाधान कसे मिळेल ? सुख हे लोकांकडून मिळते. समाधान हे अंतर्यामातून मिळते. लोकांकडून येते ते सुख, आतून येते ते समाधान. समाधान दुसऱ्यावर अवलंबून नसते. ते माझे मला मिळविता आले पाहिजे. समाधान हे देण्यासारखे नाही, आणि घेण्यासारखे नाही. माझी वासना माझ्या ताब्यात असली पाहिजे, ज्याने परमात्म्याला आपला म्हटला, त्याची वासना नष्ट झाल्याशिवाय राहणार नाही. प्रपंच टाका असे मी कधीच सांगत नाही. प्रपंच टाकून परमार्थ मिळत नाही अशी माझी खात्री आहे. प्रपंच असला पाहिजे असेही नाही. प्रपंच नसला तरी चालेल, आणि असला तरी बिघडत नाही. प्रपंच करा, पण समाधान ठेवा. मुखाने भगवंताचे नाम, नीतिचे आचरण, आणि हृदयात भगवंताचे प्रेम ठेवा. इतर कशाने साधता येणार नाही ते प्रेमाने साधेल. आपण जसे आपल्या आई-बापांवर, मुलाबाळांवर, प्रेम करतो तसे भगवंतावर प्रेम करावे. ज्ञानेश्वरांचे जाऊ द्या, ते विद्येचे सागर होते, परमात्मस्वरूप होते; पण तुकारामांजवळ काय होते ? तुकारामांजवळ अशी काय विद्या होती ? पण त्यांनी देवावर किती प्रेम केले ! आज लाखो लोक पंढरीला जातात, ही त्याची साक्ष आहे. तसे प्रेम करायला तुम्हा शिका. घरात असे वळण ठेवा की सर्वांचे भगवंताकडे लक्ष लागेल. भाषा गोड असावी, कधी कडू नसावी; लोण्यासारखी असावी. शिव्या दिल्या तरी त्या भाषेमध्ये गोडी आहे असे वाटावे; रागावला तरी त्यात गोडी आहे असे वाटावे. भाषा गोड व्हायला आपण निःस्वार्थी बनल्याशिवाय नाही येणार. गोकुळासारखे घर असले तर असू द्या, पण गोकुळाला शोभा आणणारा परमात्मा त्यात पाहिजे. गरिबी कितीही असली तरी ते घर सुखरूप दिसेल खास. आम्हाला भगवंताचे खरे प्रेम असेल, तर आम्ही त्याच्याकडून प्रपंचातली काही अपेक्षा करणार नाही. चोराने चोरीचा नवस केला, आणि प्रापंचिकाने प्रापंचिक गोष्टीकरिता नवस केला, काय फरक आहे ? दोघांनाही भगवंत नको आहे ! भगवंताचा विसर यासारखे पाप नाही, भगवंताचे स्मरण यासारखे पुण्य नाही. ते स्मरण आपण अखंड राखण्याचा प्रयत्न करू या. नामात राहू या, म्हणजे आपल्या कर्तव्याची जाणीव आपल्याला बरोबर होईल.

**आजचे बोधवचन :** दुसऱ्यापासून सुख मिळविण्याचा प्रयत्न करणारा मनुष्य प्रपंची होय.

# अध्यात्म आणि विज्ञान

आधुनिक केसरी

आपण महाप्रयासाने उभे केलेले इमले क्षणार्धात कोसळू शकतात, नव्हे ते केव्हातरी कोसळणारच आहेत, एखाद्या लहानशा आकाशस्थ अपघाताने आपली पृथ्वी केव्हाही बेचिराख होऊ शकते, या जाणिवेने तो चिंताग्रस्त होतो. आणि मग या भयावह परिस्थितीवर उपाय आहे काय याचा शोध तो करू लागतो. विज्ञानाकडून या प्रश्नाला मिळणारे उत्तर 'नाही' असेच आहे. कारण विज्ञानाची क्षितिजे जसजशी विस्तारत जातात तसतसे आपले क्षुद्रत्व मनुष्याला अधिकच जाणवू लागते. म्हणून मग अध्यात्माचा जन्म होतो. अध्यात्माची प्रेरणा मनुष्याला दिलासा, आश्वासन देण्याची आहे. आणि म्हणून अध्यात्मविचारातून जे निष्कर्ष निष्पन्न होतात ते मानवाला आश्वासक असेच असतात यात आश्चर्य नाही.

अध्यात्माची कार्यपद्धती कोणती याचा विचार करू लागल्याबरोबर आपल्या लक्षात येते की आध्यात्मिक प्रश्नांची उत्तरे वैज्ञानिक पद्धतीने देता येत नाहीत. ती जर वैज्ञानिक पद्धतीने देता येण्यासारखी असती तर ते प्रश्न विज्ञानाचे प्रश्न झाले असते, आणि त्यांची उत्तरे विज्ञानात समाविष्ट झाली असती. अध्यात्माचे प्रश्न काय आहेत हे पाहिले की हे स्पष्ट होते. आपल्याआत्म्याचे खरे स्वरूप काय आहे? आत्माअमर आहे की नाही? त्याला जन्मपूर्व आणि मरणोत्तर अस्तित्व असते की नाही? या जगाचा निर्माता कोण आहे? त्याचा नियंता कोण आहे? त्याचे आणि आपल्या आत्म्याचे नाते कोणते? जगाचे खरे स्वरूप काय आहे? दिक्कालातीत काही आहे काय? असल्यास त्याचे स्वरूप काय आहे ? इत्यादी. यांपैकी एकाही प्रश्नाचे उत्तर विज्ञान देऊ शकत नाही हे उघड आहे. उदा. विश्वाच्या उत्पत्तीविषयी ते काहीही सांग शकत नाही. पृथ्वीची उत्पत्ती कशी झाली असेल हे ते सांग शकेल; किंवा आपल्या सूर्यमालेची उत्पत्ती केव्हा झाली असेल याचे उत्तर ते देऊ शकेल. पण विश्वाची उत्पत्ती कधी झाली हे ते सांगू शकत नाही. कारण अमुक क्षणी विश्व उत्पन्न झाले असे मानल्याबरोबर त्याच्या पूर्वीच्या क्षणी काय होते? हा प्रश्न उद्भवतो. त्याच्यापूर्वी शून्य होते काय? आणि शून्यातून विश्व उद्भवले काय? ह्या प्रश्नांची उत्तरे देणे अशक्य आहे. तेव्हा समग्र विश्वाविषयीचे प्रश्न विज्ञानाच्या आटोक्यातील नाहीत. तसेच ईश्वरविषयक प्रश्नही विज्ञान सोडवू शकत नाही. आत्म्याच्या अमरत्वाविषयीही त्याला मूकच राहावे लागते. तेव्हा आध्यात्मिक प्रश्नांची उत्तरे वैज्ञानिक पद्धतीने देता येत नाहीत हे उघड आहे. त्यामुळे मग अध्यात्माची पद्धती कोणती? हा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. आध्यात्मिक ज्ञान मिळविण्याची साधने मुख्यतः दोन आहेत : (१) शब्द किंवा आप्तवचन, आणि (२) साक्षात्कार. आप्तवचन म्हणजे ज्ञात्याचे शब्द. आप्त म्हणजे ज्याला ज्ञान झाले आहे आणि जो यथार्थवक्ता आहे, म्हणजे जो खोटे बोलत नाही. आता एका अर्थी शब्द हे ज्ञानसाधन लौकिक व्यवहारात तर आपण वापरतोच, पण ते विज्ञानालाही मान्य करावे लागते. विज्ञानाचे सिद्धांत सामान्य लोक आणि वैज्ञानिकही श्रद्धेने स्वीकारतात, त्यात त्यांची काही चूक आहे असे आपण समजत नाही. याचे कारण विज्ञानात सिद्धांतरूप पावलेली विधाने अनेक अधिकारी वैज्ञानिकांनी वारंवार तपासून ती खरी असल्याची खातरजमा केलेली असते. आणि ती तशी आहेत की नाहीत याची शहानिशा करण्याला कोणालाही मोकळीक असते. विज्ञानाचा ग्रंथ उघडा असतो. त्यात श्रद्धेला आवाहन नसते. त्यातील प्रमेयांची सिद्धी कोणीही तपासू शकतो, त्यांची शहानिशा करण्याला कोणालाही मज्जाव नसतो. फक्त ती शहानिशा करण्याचे सामर्थ्य आपल्याजवळ असले म्हणजे झाले. आणि ते सर्वमान्य उपाय आहेत. त्यामुळे सामान्य लोक आणि बऱ्याच वेळा वैज्ञानिकही प्रस्थापित विज्ञानावर विश्वास ठेवतात, स्वतः न तपासता ते स्वीकारतात हे खरे आहे, आणि याचे वर्णन 'शब्दप्रमाण मानणे असे आपण करू शकतो. परंतु शब्दप्रमाणाचा दुसराही एक अर्थ आहे. या दुसऱ्या अर्थीच अध्यात्मात शब्दप्रमाण अभिप्रेत असते. अध्यात्मशास्त्रातील शब्दाप्रमाणे स्वरूप असे असल्याचे सांगितले जाते की काही शब्द अलौकिक असतात आणि ते खरेच असतात, खोटे असू शकत नाहीत. उदा. वेदांतील वचने. ही खरी कशावरून असा प्रश्न विचारणे गैर आहे असे मानले जाते.

क्रमशः

दि. य. देशपांडे

# शालेय अभ्यासक्रमात भारतीय संविधान अंतर्भूत करावे

## अविनाश महातेकर यांचे मत; 'रिपाइं', सम्यक ट्रस्ट व संविधान समितीतर्फे बाईक रॅली व व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** "संविधानाने भारताचे अखंडत्व जपले आहे. प्रत्येक भारतीयाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणाऱ्या संविधानाला अबाधित ठेवण्याचे दायित्व आपल्यावर आहे. संविधानाचे महत्व आणि त्याबाबत जागृती होण्यासाठी भारतीय संविधान शालेय अभ्यासक्रमात अंतर्भूत करावे," असे मत ज्येष्ठ साहित्यिक व माजी समाजकल्याण राज्यमंत्री अविनाश महातेकर यांनी व्यक्त केले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), सम्यक ट्रस्ट व संविधान सन्मान समितीच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त बालगंधर्व रंगमंदिर पासून बाईक रॅलीचे आयोजन केले होते. पुणे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे बाईक रॅलीचा समारोप महातेकर यांच्या व्याख्यानाने झाला. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

प्रसंगी 'रिपाइं'चे प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, शहराध्यक्ष शैलेंद्र चव्हाण, सचिव महिपाल वाघमारे, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, रोहिदास गायकवाड, एम. बी. वाघमारे, संपर्कप्रमुख अशोक कांबळे, असित गांगुर्डे, ॲड. मंदार जोशी, निलेश अल्हाट, बाबुराव घाडगे, संजय सोनवणे, मोहन जगताप, विरेन साठे, श्याम सदाफुले, संगमित्रा गायकवाड, शशिकला वाघमारे, निलेश रोकडे, अक्षय गायकवाड, आनंद लवटे, जयदेव रंधवे, महादेव साळवे आदी उपस्थित होते.

अविनाश महातेकर म्हणाले, "संविधानाने विषमता, अस्पृश्यता संपवण्याचे काम केले. तळागाळातल्या लोकांना शिकण्याचा, मतदानाचा अधिकार दिला. राजकीय प्रतिनिधित्व करण्याचा हक्क दिला. संविधानाला हात लावण्याची हिम्मत कोणीही करू नये. युनोने देखील संविधानाच्या आधारावर भारताला मदतीला हात दिलेला आहे. त्यामुळे संविधान कोणीही बदलू शकत नाही. संविधानातल्या तरतुदी पाळण्याचे, त्याचे स्थान अबाधित ठेवण्याची जबाबदारी आपली आहे."

शैलेंद्र चव्हाण अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. बाळासाहेब जानराव यांनी प्रास्ताविक केले. महिपाल वाघमारे, दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. श्याम सदाफुले यांनी आभार मानले.

### बाईक रॅलीत हजारोंचा सहभाग

संविधान दिनानिमित्त आयोजित बाईक रॅलीत हजारो लोक सहभागी झाले. बालगंधर्व रंगमंदिर पासून ही बाईक रॅली निघाली. डेक्कन येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून टिळक चौकातून कुमठेकर रस्ता, शनिवारवाडा, जुना बाजार, मालधक्का, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा अशी ही रॅली झाली. संविधान जागृती



करणारा रथ, फलक आणि तिरंगी, निळे झेंडे लक्ष वेधून घेत होते. 'जातीयतेच्या बेड्या तोडू, संविधानाने भारत जोडू', 'सर्वांचा एकच निर्धार, संविधानाचा स्वीकार', 'वंचितांना देई उभारी, भारतीय संविधान लय भारी', 'विवेक पसरवू जनाजनात, संविधान जागवू मनामनात', 'संविधान एक परिभाषा है, मानवता की आशा है' अशा उद्घोषणांनी बाईक रॅलीतून जनजागृती करण्यात आली.

# जब्बार तडवी यांच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी पळसखेडा जाना-या रोडला



पोल वरती स्पार्कींग होऊन तार तुटुन पडला असताना मोठी दुर्घटना टळली NTV न्युज मराठी प्रतिनिधी जब्बार तडवी यांच्या सतर्कतेमुळे मोठ्ठी दुर्घटना टळली. टिटवी पळसखेडा या गावांकडे जानारा रोड नेहमी मोठ्याप्रमानात वाहत असतो याच रोड ने या परिसरातील शेतकरी, व्यापारी, शाळेतील विद्यार्थी ,आणि कर्मचारी या रोड ने मोठ्याप्रमानात प्रवास वापर करत असतात.. लंका डिपी च्या समोरच चालु लाईट च्या पोल वरती स्पार्कींग होऊन तार तुटुन रोड वरती पडलेल्या अवस्थेमधे होता आणि त्या तारामधे चालु लाईट करंट होता हा प्रकार NTV न्युज मराठी वृत्तवाहीनिचे प्रतिनिधी जब्बार तडवी यांच्या लक्षात येताच जब्बार तडवी यांनी या रोडने प्रवास करनारे सर्वांना लांबच थांबायला सांगीतले हा प्रकार सांगीतला आणि सिल्लोड महाराष्ट्र राज्य विज महावितरण मंडळ सहाय्यक अभियंता जाधव आणि सावळदबारा 33 केव्ही चे कर्मचारी घोडके, विजय बावणे यांच्याशी भ्रमणध्वनी द्वारा संपर्क साधून हा गंभीर प्रकार यांच्या लक्षामधे आनुन दिला असता जाधव यांनी त्यांच्या कर्मच्या-यांना त्वरीत लाईट बंद करन्यास सांगीतले आणि तुटलेला तार जोडण्यास सांगितले या गंभीर प्रकारा दरम्यान या रोड वरती पायी जानारे महिला, पुरुष, शेतकरी आणि गुरे, शेळ्या, बैल वाहन धारक कर्मचारी असे अनेक व्यक्तींचे आणि पशुंचे प्राण वाचले वेळेवरती जर खबरदारी झाली नसती तर मोठ्ठी दुर्घटना घडुन जिवीत हानी झाली असती या वेळेस या ठिकाणी मोटार सायकल धारकांची आणि इतर मोठी गर्दी दिसुन आली. यावेळेस सर्वांची धांदाल भांबेरी उडालेली होती लाईट बंद केल्यामुळे सर्वांनी सुटकेचा श्वास घेतला व मोठ्ठी जिवीत हानी टळली जब्बार तडवी यांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार वेळेत आटोक्यात आणला गेला.

# चार तरुणींचा किटवाड धबधब्यात बुडून मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**बेळगाव :** महाराष्ट्र कर्नाटक सीमेवर असलेल्या किटवाड धबधब्यात बुडून बेळगाव शहरातील चार तरुणींचा मृत्यू झाला. किटवाड येथील तरुणांनी तत्परतेने बचाव कार्य केल्याने एका तरुणीला जीवदान मिळाले आहे. या घटनेमुळे किटवाड धबधब्याच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. चंदगड तालुक्यातील किटवाड येथे जलाशयाच्या शेजारी धबधबा आहे.

# व्यवस्थापकीय संपादक व्यापारी यांचा गौरव

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दै. आधुनिक केसरीचे व्यवस्थापकीय संपादक संजय व्यापारी यांचा गौरव करण्यात आला. अभिज्ञान, पुणे यांचा पत्रकारिता क्षेत्रातील २०२२ चा गुणीजन गौरव पुरस्कार संजय व्यापारी यांना घोषित झाला होता. हा पुरस्कार दि. २५ नोव्हेंबर २०२२ रोजी ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांच्या हस्ते छोटेखानी कार्यक्रमात व्यापारी यांना प्रदान करण्यात आला. महावस्त्र, गौरवपत्र, स्वर्णिम पदक आणि ग्रंथभेट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याप्रसंगी अभिज्ञान, पुणेच्या संचालिका मानसी चंद्रहास शास्त्री सोनपेठकर आदी मान्यवर उपस्थित होते. पुरस्काराबद्दल संजय व्यापारी यांचे दै. आधुनिक केसरी परिवारातील लेखक, कवी आदींनी अभिनंदन केले आहे.



# हळदीच्या कार्यक्रमातून परतणाऱ्या महिलांच्या क्रूझर गाडीचा भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** अहमदनगर येथून हळदीचा कार्यक्रम आटोपून औरंगाबादला परतनाऱ्या महिलांच्या क्रूझर गाडीचा जेसीबीला धडकुंन भीषण अपघात झाला. या अपघातात एक महिला जागीच ठार झाली तर सात ते आठ महिलांवर खाजगी रुग्णाल्यात उपचार सुरु आहे.ही घटना मध्यरात्री औरंगाबाद - पुणे महामार्गांवरील गंगापूर येथील कायगाव जवळील कमळीचा पूल येथे घडली. माधुरी मुकुंद कुलकर्णी वय -59 (रा. समर्थनगर औरंगाबाद) असे अपघातात ठार झालेल्या महिलेचे नाव आहे. नातेवाईकाकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, अहमदनगर येथे हळदीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.या साठी औरंगाबदेतील माधुरी यांच्यासह आठ ते नऊ महिलानि क्रूझर गाडी केली होती. शुक्रवारी दुपारी सर्व महिला क्रूझर गाडीने अहेमदनगरला गेल्या होत्या. तेथील हळदीचा कार्यक्रम आटोपून रात्री सर्व महिला परत औरंगाबादला निघाल्या होत्या. दरम्यान औरंगाबाद -पुणे महामार्गांवरील कायगाव येथील कमळीच्या पुलाजवळ येताच क्रूझर आणी जेसीबी चे अपघात झाले. मोठा आवाज झाल्याने शेतात काम करणारे शेतकरी आणी गावकऱ्यांनी अपघातस्थळी धावं घेतली व पोलिसांना घटनेची माहिती दिली. अपघात एवढा भीषण होता की क्रूझर वाहणाचा चुराडा झाला. पोलिसांनी घटनस्थळी धावं घेत जखमीना क्रूझर बाहेर काढत रुग्णवाहिकेच्या मदतीने रुग्णालयात हलविले. मात्र या भीषण अपघातात माधुरी कुलकर्णी यांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद घेण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस सुरु आहे.

# संविधान रॅलीत चिमुकल्याने डॉ. आंबेडकरांची वेशभूषा करत वेधले लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** संविधान गौरव दिनानिमित्त धुळे शहरातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात पक्षाच्या वतीने संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या रॅलीमध्ये भारतीय संविधान जिंदाबाद संविधानाचे रक्षण झालेच पाहिजे अशा घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले. विशेष म्हणजे या संविधान रॅलीमध्ये चिमुकल्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका साकारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

26 नोव्हेंबर संविधान दिन संपूर्ण देशात उत्साहात साजरा केला जातो त्याच पार्श्वभूमीवर आज धुळे शहरातून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात पक्षाच्या वतीने संविधान दिन साजरा करत संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

आपला देश हा भारतीय संविधानाच्या घटनेवर चालतो भारतीय संविधानाची मूल्य सर्व भारतीयांमध्ये रुजावी तसेच भारतीय संविधानाचे रक्षण व्हावे त्यामुळे भारतीय संविधानाची जनजागृती होणे महत्त्वाचे आहे.

म्हणून भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर जुनी महानगरपालिका ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळापर्यंत या संविधान दिनाच्या आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचा समारोप डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्ण कृती पुतळा जवळ करण्यात आला भारतीय संविधानाची प्रास्ताविका वाचन करून भारतीय संविधान चे महत्व प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचावे व त्याचे पालन व्हावे या हेतूने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी या रॅलीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खरात पक्षाचे जिल्हाध्यक्ष विशाल पगारे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष किरण इशी, धुळे शहर अध्यक्ष नागिंद मोरे, लखन साळवे, विनोद केदार, सचिन खरात, भैया खरात, सुगत मोरे, मज्जिद मदारी, दीपक जाधव, अजय पगारे, लोटन वाघ, रोहित म्हासदे, नंदलाल म्हसदे, विशाल मोरे, प्रीतम रामोशी, राज ठाकूर, सुंदर भोई आधी कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अधोगतीचे राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**काँग्रेसला राजकारणाची दीर्घ परंपरा असूनही तो पक्ष स्वतःला सावरण्याइतपत आज मजबूत नसेल तर निश्चितच चिंतेची बाब म्हणायला हवी. स्वातंत्र्यपूर्व काळात एक निश्चित ध्येय आणि महात्मा गांधी सारखे नेतृत्व लाभले असल्याने जनमानसात काँग्रेसबद्दल आपुलकीची भावना निर्माण होणे शक्य झाले, परंतु देश स्वतंत्र झाल्यानंतरदेशाची घडी बसवतानाच विशिष्टांचे लांगूलचालन आणि हितसंबंधी राजकारणाच्या आवर्तात काँग्रेसच्या राजकारणाचे चाक रुतून बसले ते बसलेच. आपल्या सभोवती खूषमस्करी लोकांचे कोंडाळे जमा करून हुजरेगिरीची एक नवी प्रथा जन्माला घालण्याचे श्रेय त्यामुळेच काँग्रेसकडे जाते.**

या भूमीला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ज्यांनी अपार कष्ट केले, प्रसंगी प्राण त्यागले त्या सर्वांच्या प्रती आदरभाव दाखवता आला नाही, ही अधोरेखित करता येण्यासारखी खेदजनक बाब होय. राजकारण नेहमीच विकासाचे असते असे नव्हे, बुडत्याचे पाय खोलात जाण्याचेही राजकारणच असते. तडजोड आणि परिस्थितीनुसार स्वतःत बदल करून घेत पुढे जाण्याचे मार्ग शोधणे ही यशाची गुरुकिल्ली म्हणावी लागेल. काँग्रेसला अलीकडच्या काळात स्वतःत बदल करून घेणे जमलेच नाही. भारत जोडो अभियान आणि त्यामुळे त्याकडे पाहणाऱ्याच्या मनात निर्माण झालेला सहानुभाव टिकवून ठेवायला हवा होता. ज्यामुळे काही वाद निर्माण होतील आणि उत्तरे देण्यातच शक्ती क्षीण होईल असे वर्तन अथवा वचन बाहेर येता कामा नये, एवढी देखील खबरदारी घेता येऊ नये याचे सखेद आश्चर्य वाटते. विचारवंत, लेखक, लोकनेता यांना मानणारा एक वर्ग असतो. तो संख्येने कमी किंवा जास्त असू शकतो. राजकीय मतप्रवाह बनविण्यात आणि लोकांना राजकीय परिस्थिती लक्षात आणून देण्यात त्यांचा मोठा सहभाग असल्याने आपण एखाद्या स्वातंत्र्यवीरासंबंधी काय विधान करतो आहोत, याची नोंद समाज घेत असल्याने आपण किती सांभाळून बोलले पाहिजे, याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. भर सभेत पंतप्रधानांचे निवेदन टराटरा फाडून टाकणे आणि स्वातंत्र्यवीरासंबंधी जनसमुदायासमोर केलेले विधान या दोन्ही प्रसंगी मानसिकता एकच आहे. भाजपाने कित्येक लोकनेते अक्षरशः हायजॅक केले. देशातील जाणत्या अजाणत्या अनेक विरांचा सन्मान करत, जनमत आपल्याकडे कसे वळेल याची खबरदारी घेत भाजपा पुढे जात आहे. अशावेळेस काँग्रेसमध्येच लहानाचे मोठे झालेले अनेक नामवंत मात्र आपल्याच नेतृत्वावर नाखूष आहेत, ही काही चांगली बाजू म्हणता येत नाही. देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल जणू भाजपातच होते असे चित्र का निर्माण होऊ शकले किंवा त्यात भाजपाला यश कसे आले, याचा विचार काँग्रेसजनांनी करायला हवा. महापुरुषांच्या नावे फक्त त्या त्या जातींचे सेल निर्माण करून राजकारण करायचे हे दिवस संपले आहेत, याची साधी जाणीव येऊ नये यास काय म्हणावे? उद्या नरसिंहरावांचा उल्लेख पदोपदी भाजपा करेल तेव्हा काँग्रेसची स्थिती अतिशय दयनीय झालेली असेल. राष्ट्र सेवादल बुडवून आरएसएस वर तासनतास बोलत राहिल्याने काँग्रेस मजबूत होईल, हा भाबडेपणा म्हणावा लागेल. सत्तास्थानी आपणच राहिले पाहिजे आणि आपल्या भोवतीच राजकारण फिरत राहिले पाहिजे, ही अपेक्षा लोकशाहीत अवाजवी ठरते. आचार्य जावडेकर म्हणतात त्याप्रमाणे बुद्धी हे सर्व इंद्रियाहून श्रेष्ठ असे इंद्रिय मानवापाशी असले तरी ते इंद्रिय जर सर्वहितासाठी अथवा सर्वोदयासाठी उपयोगात आणिले नाही व त्याचा उपयोग केवळ स्वहितासाठीच केला तर त्या मानवाला असूर असेच म्हणावे लागेल. देशाचे राजकारण आज विचित्र परिस्थितीतून जात आहे, असे अनेकांचे म्हणणे असले तरी ही विचित्र परिस्थिती म्हणजे काय? याचा उलगडा मात्र होत नाही. भाजपा सत्तास्थानी असणे जर विचित्रपणाचे वाटत असेल तर त्याला काही इलाज नाही. कारण नकारात्मक




मतदानातून एकवेळ पर्याय नाही म्हणून निवडून येणे आपण समजू शकतो. परंतु सत्तेत असतानाही पुन्हा तेच निवडून येत असतील तर केवळ मतदान मशीनचा दोष किंवा त्यात काही हातचलाखी केली असा आरोप लावणे बिनबुडाचे आहे. निवडणूक आयोगाने यासंदर्भात देशातील राजकीय पक्षांना आवाहन केले होते आणि आव्हानही दिले होते तेव्हा त्यात काही बिघाड होऊ शकतो, हे कोणीही दाखवू शकले नाही. मात्र राजकीय व्यासपीठावरून नेहमी यासंदर्भात आगपाखड सुरूच असते. भारत जोडो यात्रेच्या दरम्यान पोटनिवडणुकीत काँग्रेस पिछाडीवर राहिली हे कशाचे द्योतक आहे. असाच संदर्भ नोटाबंदीच्या काळातला देता येईल. नोटबंदीच्या नंतर उत्तरप्रदेशच्या विधानसभेसाठी मतदान झाले आणि भाजपा प्रचंड मताधिक्याने निवडून आली. या दोन्ही उदाहरणातून आपणांस जनमानस दिसून येते. हे जनमानस भाजपाच्या मागे आहे. कारण काय त्याचे आत्मपरीक्षण काँग्रेस जणांनी करावे. राहूल गांधी आणि कार्यकर्त्यांनी भारतीय इतिहास आणि येथील महनीय व्यक्तींबद्दल पूज्यभाव दाखवायला हवा.

कोण, कधी, कशासाठी माफी मागितली आणि त्यामुळे काय झाले हा भाग आता अप्रस्तुत आहे. वर्तमानात त्याचे औचित्य नसले तरी मने मात्र दुरावतात. हीच दुरावलेली मने आपल्या विरोधात जातात, हे समजले पाहिजे. राजकारण सर्वांना सोबत घेऊन चालणारे असले तर सकारात्मकता वाढते आणि प्रगती होते. देशाला आज सशक्त विरोधी पक्षाची गरज असताना काँग्रेसने नवीन काही विवाद्य विषयास वाचा फोडून आपलेच नुकसान होईल, असे वर्तन करू नये. आज खरे तर जगण्याचे प्रश्न तीव्र झाले आहेत. बेरोजगारी, भाववाढ या समस्या गंभीर असताना आपला फोकस फक्त आणि फक्त त्यावरच असला पाहिजे.

# 26/11 ला शहिदांना श्रद्धांजली म्हणून व्हावे वृक्षारोपण



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**26नोव्हेंबर 2008 मुंबईला हादरा देणारा दिवस ठरला व यांचे पडसाद भारतासह संपूर्ण जगात दिसून आले.आतंकवाद्यांच्या क्रूरतेमुळे ही भयावह घटना घडली.26/11 ची घटना जर आपण डोळ्यासमोर आणली तर अंगावर शहारे येतात एवढी भयावह घटना होती.त्यामुळे आजही वेदनादायी व कटु आठवणी मुंबईसह भारतीयांच्या मनात कायम आहेत. भारत स्वातंत्र्यानंतर देशात अनेक आतंकवादी हल्ले झालेत परंतु 26 नोव्हेंबर 2008 हा दिवस मुंबई सह भारतासाठी काळा दिवस ठरला व आज या घटनेला 14 वर्षे पूर्ण होत आहे.**

परंतु जखमा अजुनही ताज्या आहेत.कारण या भ्याड हल्यात 197 भारतीय, 34 विदेशी नागरिकांचा मृत्यू झाला तर 800 पेक्षा अधिक लोक जखमी झाले होते त्याचप्रमाणे आतंकवाद्यांनी एकाच वेळी एकुण 12 ठिकाणी हल्ले केले होते. यामध्ये भारतीय जवानांनी 9 आतंकवाद्यांना कंठस्नान घातले व एकट्या कसाबला जिवंत पकडण्यात यश आले व यामुळेच पाकिस्तान कट्टर आतंकवादी समर्थक देश असल्याचे जगाला भारतानी दाखवुन दिले.यानंतर 21 नोव्हेंबर 2012 लाख कसाबला फाशी देण्यात आली.
या हल्ल्यात मुख्यत्वे करून भारतीयांसह अनेक विदेशी नागरिक सुध्दा होते त्यांचाही यात मृत्यू झाला.त्यामुळे या घटनेने संपूर्ण जग हादरले.26 नोव्हेंबर 2008 रोजी पाकिस्तानमधुन लष्करे तोयबाचे 10 आतंकवादी समुद्राच्या मार्गे दक्षिण मुंबईत घुसले होते.पाकिस्तानी आतंकवाद्यांनी मुख्यत्वे करून विदेशी नागरिक असलेल्या हॉटेलला टार्गेट केले होते यात हॉटेल ताज, नरिमन हाऊस, होटेल ओबेरॉय, लिओपोल्ड कॅफे,सीएसएमटी,कामा रूग्णालय याशिवाय अनेक रेस्टॉरंटवर आतंकवाद्यांनी एकाच वेळी अंधाधुंद गोळीबार केला होता.अतिरेक्यांचा खात्मा करण्यासाठी सुरक्षा यंत्रणेला तब्बल तीन दिवस लागले.म्हणजेच जवळपास 60 तास दहशतवादी आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये चकमक सुरू होती.
या दहशतवादी हल्ल्यात अनेक पोलिसांसह व वरिष्ठ अधिकारी शहिद झाले यात मुख्यत्वे करून हेमंत करकरे, विजय साळसकर, अशोक कामटे, संदीप उन्नीकृष्णन इत्यादींसह अनेक होते.10 दहशतवाद्यां पैकी एका दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात यश आले हा दहशतवादी म्हणजे अजमल आमीर कसाब होय.शहिद तुकाराम ओंबळे यांनी आपल्या जिवाची पर्वा न करता व आपल्या अंगावर अनेक गोळ्या झेलुन अजम कसाबला जिवंत पकडले.परंतु तुकाराम ओंबळे



शहिद झाले.तुकाराम ओंबळे यांनी अजमल कसाबला जिवंत पकडल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानचा खरा चेहरा समोर येण्यास मदत झाली.यानंतर कसाबला 2010 मध्ये विषेश कोर्टाने दोषी ठरवून मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावली. यानंतर 21 नोव्हेंबर 2012 ला सकाळी साडेसात वाजता कसाबला पुण्यातील येरवडा कारागृहात फासावर लटकविण्यात आले व 26/11 च्या आतंकवादी कारवायांचा सरकारने शेवट केला.परंतु आजही 26/11 जखमा प्रत्येक मुंबईकरांच्या व भारतीयांच्या मनात व ह्रदयात कायम आहे.26/11 च्या हल्ल्यानंतर महाराष्ट्रासह संपूर्ण राज्ये आणि केंद्र सरकार सतर्क झाली व अशा पद्धतीच्या घटना पुन्हा उद्भवणार नाही याची काळजी घेवून देशाची संपुर्ण सुरक्षा यंत्रणां अत्याधुनिक पद्धतीने सज्ज करण्यात आली आहे.त्यामुळे आता आतंकवाद्यांची घुसखोरी किंवा कोणत्याही कारवाईला मुतोड जवाब देण्यास भारतीय सुरक्षा यंत्रणां पुर्णपणे सज्ज आहे.त्यामुळेच आतंकवाद्यांच्या मुसक्या आवळण्यात यश येत आहे.याचे उदाहरण म्हणजे जम्मू काश्मीर मधील आतंकवाद्यांचा होत असलेला खात्मा.जोपर्यंत सुर्य-चंद्र आहे तोपर्यंत शहिदांना कोणीही विसरणार नाही.कारण त्यांच्या पुंण्यायीनेच आज आपण मोकळा श्वास घेत आहोत व सुरक्षित आहोत.26/11 ला शहिदांना श्रद्धांजली अर्पण करतांना देशवासीयांनी लक्षात ठेवले पाहिजे की शहिदांची आठवण अनेक युगापर्यंत रहावी या करीता प्रत्येकांनी शहिदांच्या नावांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे शहिदांची आठवण दिर्घकाळ पर्यंत अवश्य राहीलच.त्याचप्रमाणे पर्यावरणाला या वृक्षाचा मोठा फायदा सुध्दा होईल.यामुळे गुरांना चारा, पशुपक्ष्यांना रहाण्यास घर व सर्वत्र शुध्द हवा मिळण्यास मोठी मदत होईल.हे सर्व शहिदांच्या नावांनी लावलेल्या वृक्षांनी सफल होवु शकते.यामुळे आपल्याला झाडाच्या पानांत, फुलात, फळात,जळा-मुळात आपल्या शहिदांचे दर्शन अवश्य होईल.त्यामुळे 26/11 चे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करावी व अनंत काळापर्यंत शहिदांची आठवण जागृत रहावी. हीच शहिदांना खरी श्रद्धांजली राहील असे मला वाटते.मातृभुमिची रक्षा करणाऱ्या देशाच्या शहिद शुरविरांना माझा कोटी-कोटी प्रणाम.जय हिंद!

## लय भारी सुगरण



सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आधुनिक केसरी

# बीट, गाजराचे पराठे

हिवाळ्यात यंदा खूपच वातावरणीय बदल होताना दिसत आहेत, थंडी पडते त्यानंतर मध्येच पाऊस पडतो, त्यामुळे आजारी पडण्याचे प्रमाण वाढते. या काळात आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. यासाठी तुम्हाला प्रतिकारशक्ती मजबूत ठेवणं गरजेचं आहे. रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्यास अनेक प्रकारचे आजार होतात. अशा स्थितीत आरोग्य सुधारण्यासाठी तुम्ही बीट-गाजरचा आहारात समाविष्ट करू शकता. या दोन्ही भाज्यांमध्ये अनेक पोषक घटक असतात. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होतेच आणि आरोग्यासही एक नाही तर अनेक फायदे मिळतात. (गुगल तात्यांच्या खजिन्यातली माहिती).

**साहित्य :** गव्हाचे पीठ दोन मध्यम वाट्या,दोन तीन गाजर, एक बीट,बारीक किसलेले आलं, लाल तिखट - अर्धा चमचा जिरे,धणे,चाट मसाला एक चमचा,साखर,मीठ,चवीनुसार,तुप, तेल , पाणी आवश्यकतेनुसार.

**कृती :** गाजर आणि बीट चांगले धुवून सोलून घ्या आणि किसून घ्या.आता एका कढईत चमचाभर तेल गरम करून त्यात बारीक किसलेले आले घाला.
नंतर किसलेले गाजर आणि बीट घाला.
थोडा वेळ शिजू द्या आणि मग त्यात एक एक करून मीठ, तिखट, चाट मसाला, जिरेपूड, धणेपूड, साखर इत्यादी घालून चांगले मिक्स करा.या मिश्रणातील सर्व पाणी सुकून ते कोरड्या मिश्रणात बदलले की गॅस बंद करा.
पसरट भांड्यात पिठ घेऊन त्यात हि भाजी घालून तेल ,चवीनुसार मीठ घालून पराठ्याची कणिक भरपूर मळून घ्या.गरज लागली तर पाणी वापरा. तुमच्या आवडीप्रमाणे गोल, चौकोनी, त्रिकोणी पराठे लाटून दोन्ही बाजूंनी तेल किंवा तूप लावून ते चांगले मध्यम आचेवर खमंग भाजा. गरमागरम सर्व्ह करा तुमच्या आवडीच्या दही, कोशिंबीर किंवा चटणीसोबत गरमागरम सर्व्ह करा.नक्की कळवा.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कथासंग्रह - प्राजक्तची शाळा



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आपण साजरा केला व करीत आहोत त्यानिमित्ताने "व्यास क्रिएशन" ठाणे यांनी अमृतमहोत्सवाचे निमित्ताने त्रिखंडात्मक अर्थातच तीन खंडात "अमृतगाथा स्वातंत्र्याची" हे स्वतंत्र तीन खंड प्रसिद्ध केले आहेत. गेल्या 75 वर्षात भारताने जी प्रगती केली आहे त्याचा आढावा अर्थातच निरनिराळ्या लेखातून आणि निरनिराळ्या विषयातून तो वाचकांपुढे आलेला आहे त्यात बरेच क्षेत्राचा आढावा आहे किंबहुना सर्व क्षेत्र त्यात आलेली आहे असे म्हणायला हरकत नाही. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्ताने त्यांची ही कामगिरी गौरवस्पद आहे. पहिल्या खंडात चार विभाग आहेत त्यात स्वातंत्र्य चिंतन- यात अमोल स्वातंत्र्य, राष्ट्रीय स्वतंत्र्याचा अन्वयार्थ, स्वातंत्र्य दिन ते प्रजासत्ताक दिन, भारतीय स्वातंत्र्य सर्व स्पर्शी सर्वव्यापी, आणि भूमिका परदेशस्थ भारतीयांची, असे लेख आहेत तर कृषी विकासाची लाईफलाईन- यात कृषी विकास नवतंत्राच्या दिशेने धवल क्रांतीची विकास चिन्हे, फुल्ल कुसुमित भारत, रेशमाची शेती, हरितक्रांती, कृषी विकास साठी भूसंवर्धन आणि भू व्यवस्थापन, हवामान विचार आणि सकारात्मक पाऊल, जलसंपदा आणि जलव्यवस्थापनाचा प्रवाह, जैवविविधतेने नटलेला समृद्ध भारत, सागरी मासेमारीचे योगदान, सेंद्रिय मातीचा सुगंध, आणि पशुसंवर्धनाचा हातभार, असे लेख आहेत.**

प्रकाशयात्रा- विभागात भान पर्यावरणाचे, सूर्याची सोनेरी झालर, आणि सर्वांकश विज निर्मिती, याबाबतीत माहिती मिळते तर चौथ्या अर्थशक्ती विभागात बँकिंग- अर्थव्यवस्थेचा मजबूत कणा, शेअर बाजारतील स्थित्यंतरे, भारतीय अर्थव्यवस्था विकासाच्या दिशेने, भारत आणि विमा क्षेत्र, आणि अर्थव्यवस्था या संदर्भातील लेख वाचायला मिळतात. या खंडात श्रीराम शिंदे शशिकांत घासकडवी, अविनाश कोल्हे, राहुल कुलकर्णी, डॉक्टर गणेश कदम, सुरेश कुलकर्णी, दीपक करंजीकर ,डॉक्टर विनायक गोविलकर, शशांक गुळगुळे, आदींचे लेख आहेत

खंड दोन मध्ये - उद्योगविश्व, दळणवळण विकासाची संपर्क साधने, संशोधन भरारी, असे विभाग आहेत.

उद्योग विश्व विभागात कापूस आयात निर्यात, सौंदर्य प्रसाधन, जैवतंत्रज्ञानाचा विकास, परदेशी व्यापार, हस्तकला उद्योग, अन्नप्रक्रिया उद्योग, पेट्रोल केमिकल चे बदलते स्वरूप, आदी उद्योग विषयक आणि त्यातील विकासाचे टप्पे याविषयी, तर दळवळण विकासाची साधने या विभागात रेल्वे, विमान वाहतूक, दूरचित्रवाणी, जलभरारी, दूरसंचार उद्योग, इलेक्ट्रॉनिक माध्यम आदी संबंधित लेख वाचायला मिळतात आणि त्यातील होत असलेली प्रगती समोर येते तर संशोधन भरारी या विभागात अंतराळ अणु कार्यक्रम, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र, पुरातत्त्व संशोधन ,याविषयीचे प्रगतीचे टप्पे आणि कामगिरी समोर येते. या विभागात राजीव जोशी, धनंजय गांगल, सुभाषचंद्र जाधव, अच्युत राईलकर, भालचंद्र देव, उमा दीक्षित शिबानी जोशी, जयश्री देसाई, डॉक्टर गिरीश पिंगळे, आदींचे लेख वाचला मिळतात.

अमृत गाथेच्या तिसऱ्या खंडात- कला आणि क्रीडा अभिव्यक्तीची उत्तुंगता, जनविकास प्रगतीपथाकडे, संरक्षण राष्ट्रीय सुरक्षा मिशन, विश्व आणि भारत असे, चार विभाग आहेत. कला आणि क्रीडा मध्ये साहित्याचे बदलते प्रवाह, भारतीय संगीतातील स्पंदने, रंगभूमी, भारतीय कलेचा वारसा, चित्रपट, लोककला, क्रीडाक्षेत्र ,आणि गिर्यारोहण याविषयीचे लेख आहेत. तर जनविकास प्रगती पदाकडे या विभागात शिक्षण प्रशिक्षण, भारतीय न्यायव्यवस्था, 75 वर्षे स्त्रीसामर्थ्याची, बालविकासाची दिशा, विकासामध्ये युवकाचे स्थान, प्रदूषण नियंत्रण, वनवासी समाज, सहकार, ग्रामीण विकास, नागरी विकास, आरोग्यवस्था, आणि ग्राहकसंरक्षण विभाग यासंबंधी सविस्तर माहिती मिळते. दहाव्या भागात पोलीस दलाची भूमिका, सशस्त्रदलाचा प्रवास,, वायुदल, सीमा सुरक्षा, अकराव्या विभागात- राजकीय नेतृत्वाची 75 वर्ष, परराष्ट्रीय धोरण ,आंतरराष्ट्रीय संघटना आणि भारत, शाश्वत विकासाची कल्पना, हे लेख आहेत. या तिसऱ्या खंडात रामदास खरे, दिलीप ठाकूर, डॉक्टर प्रकाश खांडगे,रेणू दांडेकर, न्यायमूर्ती प्रीतम कुलकर्णी, प्राध्यापक सरस्वती कांबळे, आणि दिलीप देशपांडे, यांचे माहितीपूर्ण लेख वाचायला मिळतात. व एकूणच या क्षेत्रातील प्रगती पथा कडील वाटचाल समजते.

स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीत प्रेरणा देणारे नेतृत्व महत्त्वाचे आहे. त्यात भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चाफेकर बंधू, चंद्रशेखर आझाद, अनंत कान्हेरे ,लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, यांचे स्मरणही आपण ठेवणे आवश्यक आहे त्यांच्या बलिदानातूनच आपण आता हे स्वातंत्र्य 75 वर्ष उपभोगत आहोत .त्या दृष्टीने त्यांच्या स्वातंत्र्यसंग्राम हा खूप महत्त्वाचा आहे. त्यासाठीच त्यांच्या स्मरणार्थ आपण आपण सर्वांनी घरोघरी तिरंगा हे अभियान राबविले.

या तीनही खंडात जवळपास 85 विषय आहेत त्या दृष्टीने खरोखरच हा ग्रंथ म्हणजे स्वातंत्र्याची अमृतगाथाच आहे.

यासाठी संपादक आणि संयोजकांनी निरनिराळ्या मान्यवरांशी लेखकांशी, अभ्यासकांशी संपर्क साधून त्यांनी माहितीपूर्ण लेख संकलित केले आहेत. यासाठी त्यांना बराच वेळ द्यावा लागला . आणि त्यातूनच ह्या संदर्भ ग्रंथाची निर्मिती झाली.

हे अमृतगाथेचे तीनही खंड विद्यार्थी, संशोधक यांना, आणि सगळ्यांनाच मार्गदर्शक असे ठरतील असा विश्वास व्यक्त केला आहे. या अमृतगाथेचे संपादक निलेश गायकवाड आपल्या संपादकीय प्रस्तावनेत म्हणतात-.




" या 75 वर्षात जमिनीपासून अवकाशापर्यंत नदीच्या उगमापासून समुद्राच्या अथांगते पर्यंत, मानवी जीवनाला जे जे क्षेत्र स्पर्श करीत आहे त्या त्या क्षेत्रात भारताची प्रगती होत आहे. देश बदलत आहे. हे सार इथल्या प्रत्येक व्यक्तीला समजावं यासाठी "स्वातंत्र्याची अमृतगाथा" या त्रिखंडात्मक संदर्भ ग्रंथाची निर्मिती केली आहे. हे एकच कारण- या देशाने आपल्याला भरभरून दिला आहे आता आपण देशासाठी काय करू शकतो याचे चिंतन व्हावं. प्रत्येकाने आत्मपरीक्षण करावं. हा एकमेव उद्देश आहे. देशासाठी जगण्याची, काही करण्याची खूप सुंदर संधी आपल्याला मिळाली आहे. त्याचं सोनं कसं करायचं हे ठरण्याची वेळ आली आहे,म्हणूनच हा सारा शब्दप्रपंच ! असे ते म्हणतात.

स्वातंत्र्य चळवळीतच प्रजासत्ताक दिनाचे मुल्ये निश्चित झाली होती. स्वातंत्र्य संमता,बंधुता, न्याय, प्रज्ञा,शील, करुणा, व मैत्री या मूल्यांची राज्यघटनेत बीजे रोवून भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यात आली. सामान्य माणसाचा स्तर उंचावण्यासाठी संविधानाची मदत झाली.

आज जर परिस्थिती बघितली तर ही सर्व बीजे आपण लक्षात ठेवण्याची. त्याचा बऱ्याच प्रमाणात विसर पडत चाललेला आहे माणसाने माणसाशी माणसासम वागणे हे तत्त्वच विसरत चाललो आहे. त्यामुळे खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे... या साने गुरुजींच्या प्रेमयम,

संदेश वजा कवितेचे मनापासून आपण चिंतन करावे पालन करावे तसेच स्वातंत्र्याच्या 75 वर्ष पूर्ण निमित्त जी अमृतगाथा प्रकाशित करण्यात आली आहे त्याचे वाचन जरूर करावे. त्यातून आपणाला बरच काही मिळणार आहे.

या गाथेचे संपादन निलेश वसंत गायकवाड यांनी केले असून संकल्पना- डॉक्टर अनुप्रिता देशपांडे यांची आहे संपादकीय समन्वयक- प्रतिष्ठा सोनटक्के या आहेत. गाथेचे मुखपृष्ठही आकर्षक असून त्या त्या विषयाशी संबंधित आहे. तीनही खंड हाती पडल्यानंतर कोणता आधी वाचावा अशी परिस्थिती निर्माण होते. संकल्प करा आणि या स्वातंत्र्याच्या अमृतगाथेचे तिनही खंड वाचा आणि आपल्या संग्रही ठेवा.नववर्षात भेट द्या.

"अमृतगाथा स्वातंत्र्याची"
व्यास क्रिएशन. ठाणे.
संपादक- निलेश गायकवाड.
एकत्रित तीन खंड. रुपये 2100
संपर्क.-०२२-२५४७०३८
-मो.९९२०९४९१७७

# मोहम्मद अजीज; मखमली आवाजाचा गायक



आधुनिक केसरी

अमिताभ बच्चन यांच्या 'मर्द टांगेवाला' या चित्रपटातून नावारुपास आलेले मोहम्मद अजीज हे बॉलिवूडमधील एक नामांकित गायक म्हणून ओळखले जातात. जवळपास तीन दशकं त्यांनी आपल्या सुरेल आवाजाच्या जोरावर प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. आज अजीज यांचा आज स्मृतीदिन आहे. त्या निमित्तानं जगभरातील चाहत्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. तुम्हाला वाचून आश्चर्य वाटेल एक काळ असाही होता जेव्हा ते मुंबईच्या रेल्वे स्टेशनवर झोपून रात्र घालवत होते. अजीज यांचा जन्म 1954 साली कोलकातामधील एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचं पुर्ण नाव सईद मोहम्मद अजीज असं होतं. ते मोहम्मद रफी यांचे प्रचंड मोठे फॅन होते. परंतु घरात गाणी ऐकण्याची सोय नव्हती. दोन किलोमीटर अंतरावर त्यांचे एक नातेवाईक राहायचे. त्यांच्याकडे जुना रेडियो होता. त्यावर गाणी ऐकता यावी यासाठी जेव्हा संधी मिळेल तेव्हा ते त्यांच्या घरी जायचे. रेडियोवरील गाणी त्या गायकांच्याच शैलीत गाण्याचा प्रयत्न करत त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात केली. दरम्यान मंदिरात होणारी किर्तनं, सार्वजनिक कार्यक्रम यांमध्ये देखील ते मोठ्या उत्साहाने गाणी गात. पुढे शिक्षण पुर्ण झाल्यावर बॉलिवूडमध्ये काम करण्यासाठी ते मुंबईत आले. इथे आल्यावर त्यांनी अनेक संगीतकार आणि दिग्दर्शकांच्या घराच्या पायऱ्या झिजवल्या. अनेकांना ऑडिशन्स वगैरे दिली. याच दरम्यान मुंबईतील एका रेस्तरॉमध्ये त्यांना नोकरी मिळाली. यामध्ये सुरुवातीला ते वेटरचं काम करायचे. परंतु त्यांना गाणं गाता येतं हे कळल्यावर मॅनेजरनं त्यांना ग्राहकांचं मनोरंजन करण्यासाठी गाणी गाण्याचं काम दिलं. या रेस्तरॉमध्ये अनेक नामांकित कलाकार देखील यायचे. 1984 साली जयंत देसाई यांची त्यांच्यावर नजर गेली. त्यांच्या गाण्याची शैली त्यांना आवडली. त्यामुळं अंबर या चित्रपटाची ऑफर त्यांना मिळाली. अर्थात अजीज यांनी देखील ती ऑफर स्विकारली. अन् पुढे त्या चित्रपटानंतर त्यांचं बॉलिवूड करिअर सुरु झालं. आपल्या या प्रवासात त्यांनी प्रचंड संघर्ष केला. वेळप्रसंगी फुटपाथ आणि रेल्वेस्टेशनवर देखील ते झोपले. पण प्रयत्न सुरुच ठेवले. परिणामी आज ते बॉलिवूडमधील एक यशस्वी गायक म्हणून ओळखले जातात. आज या महान गायकाचा स्मृतिदिन.

# वाढत्या वाहनांना लगाम घालण्याची गरज



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**मुंबईत वाहनांची संख्या इतर शहरांच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत प्रति किलोमीटर ५३० चार चाकी वाहन आहेत. त्याचा वाहतुकीवर मोठा परीणाम होत आहे. तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थाही विस्कळीत होत आहे. गेल्या तीन वर्षात मुंबईतील चार चाकी वाहनांची घनता २३ टक्क्यांनी वाढली आहे. इतर कोणत्याही शहरांच्या मानाने मुंबईत वाहनांची संख्या अधिक आहे. मुंबईत चारचे प्रमाण दिल्लीच्या तीनपट आहे. एव्हढ्या मोठ्या संख्येने वाढलेल्या वाहनांमुळे पार्किंगचा प्रश्न जटिल झाला आहे. मुंबईत दुचाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या ३५ लाखांच्या पुढे आहे.**

त्या तुलनेत गाड्या पार्क करण्यासाठी फक्त १५ वाहनतळ असून त्यात ९ हजारांच्या आसपास वाहने पार्क करता येतात. परिणामी रस्त्यांवर अवैध पार्किंगची संख्या वाढली असून त्याचा फटका शहरातील नागरिकांना बसत आहे. या अवैध पार्किंगवर न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. रस्त्यांवर असणाऱ्या अवैध पार्किंगमुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. लहान रस्त्यांपासून पूर्व आणि पश्चिम दृदगती महामार्गावर सकाळ, दुपार, संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेस प्रचंड वाहतूक कोंडी होते. ज्या ठिकाणी जायला १५ मिनिटे लागतात त्या ठिकाणी वाहतूक कोंडीमुळे ३५ मिनिटे लागतात. मुंबई हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शहर असले तरी वाहतूक कोंडीचे शहर अशी मुंबईची नवी ओळख निर्माण होत आहे. वाढत्या वाहन संख्येसोबतच रस्त्यांवर कुठेही पार्क केलेली तसेच छोट्या रस्त्यांवर दुतर्फा पार्क केलेली वाहने कोंडीचे मोठे कारण ठरत आहे. मुंबईतील रस्त्यांवरील वाहतूक कोंडी रोखण्यासाठी अधिकाधिक वाहन तळांची आवश्यकता आहे. सरकारने त्या दृष्टीने पावले टाकायला हवीत. वाढत्या वाहनांमुळे मुंबईत प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. यावर्षी मुंबईतील हवा सर्वाधिक निकृष्ट श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीपेक्षाही मुंबईची हवा अधिक दूषित असल्याचा एक अहवाल प्रदूषण नियंत्रण मंडळाने नुकताच जाहीर केला आहे. मुंबईतील हवा प्रदूषित असण्यामागचे महत्वाचे कारण म्हणजे मुंबईतील वाढती वाहनांची संख्या. जर वाहनांच्या संख्येत अशीच वाढ होऊ लागली तर मुंबई जी महाराष्ट्राची राजधानी आहे ती प्रदूषणाचीही राजधानी बनेल आणि लोकांना श्वास घेणे मुश्किल होईल. त्यामुळेच वाहनांच्या वाढत्या आळा घालणे अवश्यक आहे. जर मुंबईकरांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीतजास्त वापर केला तर ही समस्या सुटण्यास मदत होईल. सरकारनेही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी. जर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल. वाहनाची संख्या कमी झाली की इंधन बचतही होईल आणि प्रदूषणालाही अटकाव होईल तसेच पार्किंगचा प्रश्नही सुटेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम होणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली की वाढत्या वाहनांना आपोआप आळा बसेल.



# महात्मा फुलेंचे स्त्री उत्थानासाठी कार्य



जयश्री सोनकवडे
संपर्क क्र. 7798547744

आधुनिक केसरी

**महात्मा फुले यांचा 28 नोव्हेंबर हा स्मृतिदिन. त्यांनी महिलांच्या उत्थानासाठी केलेल्या कार्याची आठवण समस्त भारतातील स्त्रियांनी ठेवण्याची अत्यंत गरज आहे. महात्मा फुले यांचा जन्म 11 एप्रिल 1827 रोजी झाला तर त्यांचा मृत्यू 28 नोव्हेंबर 1890 रोजी झाला. त्यांना मिळालेल्या 63 वर्षाच्या आयुष्यामध्ये समस्त भारतीय स्त्रियांसाठी आणि इथल्या पीडित, शोषित समाजासाठी त्यांच्या उत्थानासाठी ऐतिहासिक काम महात्मा फुले यांनी केलेले आहे. ज्याची सुवर्ण अक्षरात नोंद घेण्याची आवश्यकता आहे.**

भारतीय संस्कृतीतील मनुवादी संस्कारातील पुरुषी वर्चस्ववाने स्त्रियांना हीन आणि दुय्यम दर्जा दिलेला होता. महात्मा फुले यांना जेव्हा भारतातील स्त्रियांची दयनीय अवस्था लक्षात आली तेव्हा भारतीय समाजातील स्त्रियांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले तरच त्यांच्यावरील अन्याय आपण दूर करू शकतो. त्या आत्मनिर्भर आणि आत्मसन्मानाने जीवन जगू शकतात. स्त्रियांवरती अनेक प्रकारचे अन्याय मनुवादी संस्कृतीकडून होत होते, स्त्रियांना माणूस म्हणून जगण्याचा कुठलाही हक्क मनुवादी विचारसरणीने दिलेला नव्हता.जसे पतीच्या मृत्यूनंतर तातडीने सती जाणे बंधनकारक होते, लहान वयातील मुलींचा विवाह जरठ पुरुषांशी लावणे ही प्रथा होती, विधवा विवाहास बंदी, शिक्षणास बंदी, असे अनेक निर्बंध भारतीय पुरुष व मनुवादी व्यवस्थेने स्त्रियांवरती अनेक वर्षांपासून लादलेले होते. स्त्रियांना गुलामगिरीच्या साखळदंडातून मुक्त करायचे असेल तर त्यांना शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे हे महात्मा ज्योतिबा फुले यांनी हेरले होते. त्यामुळे महात्मा फुले यांनी सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले. त्यानंतर 1 जानेवारी 1848 ला पुण्यामध्ये भिडे यांच्या वाड्यामध्ये पहिली भारतातील मुलींची शाळा सुरू केली. मुली हळू हळू शाळेत येत होत्या, त्या वेळेस सावित्रीबाई फुले यांना दगड माती आणि शेणाचा सामना करावा लागला. त्यांची अतिशय विचित्र भाषेमध्ये प्रतारना करण्याचे काम मनुवादी संस्कृतीने सुरूच ठेवलं होतं. सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी न डगमगता स्त्री शिक्षणाचे कार्य पुढे चालूच ठेवले. अल्पावधीतच शाळेच्या शाखा इतरत्र अनेक ठिकाणी महाराष्ट्रभर सुरु झाल्या. फातिमा शेख यांच्या मदतीने मुस्लिम मुलींसाठी सुद्धा शाळा सुरू केली. तसेच 1852 साली दलितां साठी शाळा सुरू केली . त्यामुळे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दलित समाज, मुस्लिम महिला,आणि सर्व समस्त समाजातील महिला येण्यासाठीचे त्यांचे मार्ग खुले झाले. महात्मा फुले एवढ्या वरतीच न थांबता त्यांनी "साक्षरता अभियानाची" सुरुवात 1854-55 मध्ये केलेली होती. त्याचबरोबर "नेटिव्ह लायब्ररीची" पहिली स्थापना सुद्धा महात्मा फुले यांनी केलेली होती. महिलांची सांस्कृतिक आणि शैक्षणिक चळवळ उभी करून शिक्षणाचे कवाडे दलितांसाठी,महिलांसाठी उघडे



करणारे महात्मा फुले हे एक महान क्रांतिकारी होते असं म्हणायला आपल्याला हरकत नाही. त्यामुळेच "द पुना ऑब्झर्व्हर अँड डेक्कन विकली " या वृत्तपत्रात लिहिले गेले होते, हे काम म्हणजे "हिंदू संस्कृतीच्या इतिहासातील एका नव्या युगाचा आरंभ होय "हेच आधुनिक भारतीय स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनाची अत्यंत महत्त्वाची सुरुवात शिक्षणाच्या माध्यमातून झालेली होती. म्हणूनच महात्मा फुले यांनी 19 ऑक्टोबर 1882 रोजी शासनाच्या "हंटर शिक्षण आयोगाला "साक्ष देऊन मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून दिलेले होते. प्रथम वार्षिक परीक्षा पाहण्यासाठी जवळपास हजारो लोक तिथे जमलेले होते हा एक ऐतिहासिक क्षण महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्यकर्तृत्वामुळे भारतीय समाजाला पाहायला मिळाला व इतिहासात सुवर्णाक्षरात नोंद घ्यावा असाच तो क्षण ठरलेला आहे. आता यावरतीच न थांबता महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या विविध इतर प्रश्नांवरती काम करण्यास सुरुवात केली. समाजामध्ये स्त्रियांची अनेक प्रकारची हेटाळणी सुरू होती. त्यावरती काम करण्यासाठी चा निर्धार त्यांनी केला. यामध्ये त्यांनी 1863 साली "बालहत्या प्रतिबंध गृह "सुरू केले. ज्या विधवा स्त्रियांना फसवून त्यांच्या घरातील इतर पुरुष त्यांच्यावर शारीरिक अत्याचार करत होते, आणि त्यातून त्या महिला प्रेग्नेंट राहत होत्या. त्यावेळी त्यांच्यापुढे आत्महत्या करणे हा एकच पर्याय राहत असे त्यामुळे सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांनी अशा विधवांसाठी आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये व त्यांच्या बाळांना वाचवावे यासाठी "बाल हत्या प्रतिबंध गृह" त्यांच्या घरी सुरू केले. सत्यशोधक पद्धतीने कमी खर्चात विवाह लावणे ही नवीन पद्धती 24 सप्टेंबर 1873 पासून ते सत्यशोधक समाजाची स्थापना करून त्यांनी सुरू केली. यामध्ये गरीब घरातील मुलीचे लग्न सहजपणे होऊ लागले. कुठल्याही पुरोहिताशिवाय लग्न लावण्याची चांगली पद्धत सुरू केली. एवढ्या वरतीच न थांबता महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांनी काशीबाई या विधवा ब्राह्मण स्त्रीचा मुलगा यशवंत यास दत्तक घेऊन त्याला डॉक्टर करून त्याचा सत्यशोधक पद्धतीने विवाह लावल्याचे दाखले सुद्धा इतिहासात उपलब्ध आहेत.1877 च्या दुष्काळामध्ये ""व्हिक्टोरिया बालाश्रम "सुरु करून संकटात सापडलेल्या महिला,मुली,पुरुष आणि बालकांना स्वतः या जोडप्यांनी जेवण तयार करून त्यांच्या जेवणाची सोय उपलब्ध करून दिली. विधवा पुनर्विवास प्रोत्साहन देण्याचे काम करून अनेक विधवा पुनर्विवाह या जोडप्यांनी घडवून आणले यामध्ये महात्मा फुले यांनी अनेक विधवा स्त्रियांना परत माणूस म्हणून जीवन जगण्याची एक संधी उपलब्ध करून दिली. ज्या स्त्रिया सती जात होत्या, त्या स्त्रियांना सती जाण्यापासून रोखण्यासाठी विशेष अशी मोहीम राबवून महिलांमध्ये सुद्धा जाणीव जागृती निर्माण करण्याचं काम त्यांनी केलेला आहे. विधवा महिलांचे केशवपण करून त्यांना विद्रूप बनवलं जात होतं. महात्मा फुले यांनी न्हावी समाजातील लोकांना सांगितलं की, तुम्ही हे केशवपण का करता हे तुम्ही थांबवा आणि न्हावी समाजाचा संप स्वतः घडवून आणून एक ऐतिहासिक क्रांतिकारक निर्णय घेऊन समस्त विधवा महिलांचे केशवपण करण्याच्या प्रक्रियेला छेद देऊन ते तिथे थांबवण्याचे काम महात्मा फुले यांनी केलेला आहे.स्त्रियांना स्त्री स्वातंत्र्याचे मूल्य काय आहे याची जाणीव करून दिली. मानवी मूल्यांचे महत्त्व स्त्रियांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम महात्मा फुले यांनी केलेले आहे. धर्माच्या नावावरती स्त्रियांचा अनादर करणाऱ्या मनुवादी रूढी, परंपरा मानणाऱ्या समाजास भानावर आणण्याचे काम महात्मा फुले यांनी केलेले आहे. मानववंश शास्त्राचा आधार घेत आधुनिक विचारसरणी स्त्रियांच्या मनामध्ये निर्माण करण्याचं काम शिक्षणाच्या माध्यमातून महात्मा फुले यांनी केलेले आहे. शतकानू शतकाच्या रूढी, परंपरा जुगारून क्षमता समस्त भारतीय स्त्रियांमध्ये निर्माण करणारा एकमेव महापुरुष म्हणजे महात्मा फुले हे होत. अपरिवर्तनवादी स्वरूप असणाऱ्या घटकांचा संस्कृतीचा ऱ्हास करत धर्मसंस्था आणि धर्मतत्त्वज्ञान यांना तिलांजली देत शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना त्यांचे मूलभूत अधिकार आणि हक्क कळावेत यासाठी शिक्षण देऊन त्यांना वैचारिक दृष्ट्या सक्षम करण्याचं काम महात्मा फुले यांनी केलेला आहे. पुरुषी वर्चस्व असलेल्या एकाधिकारशाही, अधिकाऱ्यांचे केंद्रीकरण असणाऱ्या समाज व्यवस्थेला झुगारून देऊन स्त्रियांवरती जुलमी,अन्यायी प्रथांचा नायनाट करण्याचे काम महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांनी केलेले आहे. महात्मा फुले यांचे महान कार्य लक्षात ठेवून त्यांनी स्त्री उत्थानासाठी केलेल्या कार्याची सातत्याने भारतीय स्त्रियांनी जाणीव ठेवण्याची आवश्यकता आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुले यांना गुरु मांडलेले होते. महात्मा फुले यांच्या विचारांमध्ये गौतम बुद्धाचा मानवतावादी विचार असल्याचे आपणास प्रकर्षाने येथे जाणवत आहे. या आधुनिक भारतातल्या स्त्रियांनी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे उपकार विसरता कामा नये पण आपण पाहतोय की आजची आधुनिक शिकली सवरलेली स्त्री दैववाद, कर्मकांड आणि अंधश्रद्धेच्या खाईत आज परत त्या गुलामगिरीच्या साखळदंडामध्ये अडकण्यासाठी जात आहे की काय ही भीती मात्र सातत्याने असते. महात्मा फुले यांनी आपल्या गुलामगिरी,शेतकऱ्यांचा आसूड, व इतर पुस्तकातून सामाजिक न्यायचं सामाजिक समतेचा संदेश दिलेला आहे. म्हणूनच महात्मा फुले स्मारक समितीच्या प्रयत्नातून जुलै 1982 मध्ये शासनातर्फे "महात्मा फुले गौरव' ग्रंथ प्रकाशित करण्यात आलेला आहे. महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्त्रियांसाठी केलेल्या उत्थानाची कार्याची प्रकर्षाने नोंद घेणे आवश्यक आहे.

# लोकसंख्या हा प्रगतीच्या मार्गातील प्रमुख अडसर!

आधुनिक केसरी

**संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या अंदाजानुसार २०२३पर्यंत भारत लोकसंख्येच्या बाबतीत चिनला सुद्धा मागे टाकत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश होऊ शकतो.अशी माहीती दिली आहे.याचबरोबर जगाच्या लोकसंख्यने ८०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे यामध्ये भारताचा वाटा १३५ कोटीहुन अधिक असल्याचे संयुक्त राष्ट्रसंघटननेने माहीती दिल्याचे समजते. लोकसंख्या वाढ ही आपल्या देशालाच नाही तर तर संपूर्ण जगामध्ये लोकसंख्या वाढीचा प्रश्न भेडसावत आहे. ही गंभीर समस्या असुन लोकसंख्या वाढ अक्राळविक्राळ रूप धारण करू लागली आहे. आज खऱ्या अर्थाने समाजामध्ये लोकसंख्येबाबत लोकजागृती होण्याची आवश्यकता आहे. सध्या लोकसंख्या बाबत चीन एक नंबरवर आहे तर भारत दोन नंबरवर आहे. परंतु संयुक्त राष्ट्रसंघाच्या माहीतीनुसार आपण २०२३ पर्यंत लोकसंख्येत बाबतीत प्रथम क्रमांकावर असु मात्र असे असले तरी ही गंभीर बाब आहे.**

देशाच्या प्रगतीकरता आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील व्यवस्थेकरता ही चिंताजनक बाब बनली आहे. वाढत्या लोकसंख्येचा संपूर्ण जगाला सामना करावा लागतो आहे. वाढत चाललेली महागाईने जनता हैराण झाली आहे सर्वसामान्य जनतेचे बजेट कोलमडले आहे. गरीब, मध्यमवर्गीय, नोकरदार, रोजंदारीवर काम करणारे, छोटे दुकानदार, व्यापारी वर्ग यांचे कंबरडेच मोडले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी, कुपोषण, भ्रष्टाचार, आदी समस्यांना सामोरे जावे लागते आहे. वृक्षांची संख्या कमी कमी होत चालली आहे. वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर होत आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळला आहे. तरूणांमध्ये वैफल्याची भावना निर्माण झाली आहे. परीणामी व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढले आहे. पैशासाठी वाममार्गाने गुन्हेगारी सारख्या क्षेत्राला खतपाणी मिळत आहे. श्रीमंत श्रीमंतच होत चालला आहे. तर गरीब गरीबच होत चालला आहे. लोकसंख्येमुळे अन्नधान्याच्या टंचाईचे संकट वाढत चालले आहे. त्यामुळे उपासमार, अशिक्षितपणा, आरोग्याच्या अपुर्या सोई, या समस्येला सामोरे जावे लागते आहे.

आज लोकसंख्या वाढीचा वेग खुप आहे. जगात गरीब देशांची लोकसंख्या फार मोठी आहे. अशा देशांमध्ये लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. त्यामुळे गरीब राष्ट्रांना विकासाच्या मार्गात अडथळे येताना दिसत आहे. त्यासाठी सर्वच स्तरावर लोकसंख्येच्या बाबतीत नियंत्रण आणणे गरजेचे आहे. १९६० मध्ये जगाची लोकसंख्या ३०० कोटी होती. १९८७ पर्यंत हा आकडा ५०० कोटींच्या घरात गेला.आणि आजमितीला पाहीले तर जगाच्या लोकसंख्येने ८००कोटींची मजल मारली आहे. देशाला स्वतंत्र मिळाले खरे अनेक क्षेत्रांत प्रगती झाली. परंतु त्या प्रगतीचे सुख आपल्या उपभोगता आले नाही. ही वस्तुस्थिती आहे.कारण लोकसंख्या हा आपल्या प्रगतीच्या मार्गातील प्रमुख अडसर आहे. लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी कुटुंब नियोजनाचे उपाय अमलात आणावे लागतील. कुटुंबाना नियोजनाबाबत जागृत बनवणे ही काळाची गरज आहे. केंद्र सरकारने देखील लोकसंख्या बाबत खंबीर धोरण आखायला हवे. ज्यांचे छोटे कुटुंब अशा व्यक्तींना सवलती दिल्या पाहिजेत. संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ वर्षात भारत लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकून भारत पुढे जाईल अशी माहिती दिली आहे . त्यामुळे



आपण लोकसंख्या बाबत गांभीर्याने विचार केला पाहिजे.लोकसंख्या वाढीची कारणे शोधुन त्यावर उपाय याविषयी नैसर्गिक, शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. लोकसंख्या वाढ हा आपल्या प्रगतीच्या मार्गातील अडथळा आहे. त्यावर विचार मंथनाची आवश्यकता आहे.

संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. 7721045845

# “कहीं दूर जब...”

आधुनिक केसरी

**लताचे मधाळ सूर ल्यालेलं बागेश्री रागातलं गूढ असं ‘आजा रे परदेशी...’ हे एकल गीत असो वा, किशोर’दांच्या फ्री-स्टाईल गायकीची मेलोडी सांगणारं, ‘चील चील चिल्लाके कजरी सुनाये...’ हे धमाल गाणं, आपल्या डोळ्यांसमोर नकळत उभे राहतात ते या गाण्यांना अनुपम संगीत देणारे कवी, गीतकार, लेखक आणि महान संगीतकार सलील चौधरी!**

लताचं ‘आजा रे परदेशी...’ तर मी कितीदा ऐकलं असेल प्रत्येक वेळी काही तरी नवीन मला त्यातून गवसतं. डोंगर-दऱ्यांचं सौंदर्य लाभलेल्या वैजयंतीमालाचा निखळ, निरलस अभिनय बघता बघता हळूच आपलं मन, माणसाला खिळवून ठेवणाऱ्या माधवीच्या त्या नाट्यमय कथानकामध्ये गुंतून पडतं. एक आगळी-वेगळी असोशी आहे त्यातल्या गीत-संगीतात! अवखळ, तरल असा त्यातला प्रीत रस नदीच्या खळाळासोबत बघणाऱ्यालाही वाहवत नेतो. आपल्या गेल्या जन्मीच्या प्रीतमशी नातं सांगणारं ‘मधुमती’चं अतृप्त मन मग आपल्यालाही दिसू लागतं. वारा होऊन मग वाजत राहतात तिच्या काळजातल्या त्या अनघड संगीत लहरी! आपणही प्रवाही होतो, नदीच्या वळणावळणानं तिच्यासोबत गात गात विहरतोही! दाट धुक्यात विरण्याआधीची नायिकेची ती गडद छाया, पावलापावलातलं ते हळुवारपण ‘मधुमती’ची नायिका माधवी मग नुसतीच नायिका न राहता आपलीच कुणी जीवलग होऊन जाते. आणि या सगळ्यांचं श्रेय आहे ते बिमल रॉय सारख्या ग्रेट दिग्दर्शकासोबत त्या चित्रपटाला संगीत देणाऱ्या सलील चौधरी या महान संगीतकाराचं!

दऱ्या-खोऱ्यातून निनादणाऱ्या ‘मधुमती’च्या संगीताने चाहत्यांना त्या वेळी कसं झपाटून टाकलं होतं. अकरा गाण्यांपैकी त्यातली सात गाणी सुपर हिट ठरली होती. अचाट प्रतिभेच्या सलील’दांना फिल्मफेअरचा त्या वर्षीचा सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शकाचा पुरस्कार तर मिळालाच, शिवाय राष्ट्रीय पुरस्कारासह आणखीही आठ पुरस्कार या चित्रपटाला मिळाले. दऱ्या-खोऱ्यातून निनादणाऱ्या ‘मधुमती’च्या संगीताने चाहत्यांना त्या वेळी कसं झपाटून टाकलं होतं. अकरा गाण्यांपैकी त्यातली सात गाणी सुपर हिट ठरली होती. अचाट प्रतिभेच्या सलील’दांना फिल्मफेअरचा त्या वर्षीचा सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शकाचा पुरस्कार तर मिळालाच, शिवाय राष्ट्रीय पुरस्कारासह आणखीही आठ पुरस्कार या चित्रपटाला लाभले. आणि हा रेकॉर्ड सदतीस वर्ष ‘मधुमती’च्या नावावर होता. आणि ‘मधुमती’चीच नाही तर, कितीतरी चित्रपटांची सुंदर सुंदर गाणी आहेत जी सलील’दांच्या संगीताचा बाज लेवून हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात अजरामर होऊन गेलीयेत. मग ते ‘माया’ चित्रपटातलं राग भैरवातलं ‘जा रे; जा रे उड़ जा रे पंछी...’ असेल, वा ‘काबुलीवाला’ चित्रपटातलं ‘ऐ मेरे प्यारे वतन...’! सलील’दांची आगळी-वेगळी छाप त्या गीतांमधून डोकावतांना आपल्याला दिसते. सलील’दा हे निव्वळ संगीतकारच नाही तर कवी, गीतकार आणि लेखक सुद्धा होते. प्रामुख्याने त्यांनी बंगाली, हिंदी आणि मल्याळम चित्रपटांसाठी रचना केल्या. त्यातही बंगाली भाषेत लिहिलेल्या रचनांवरती त्यांचं विशेष प्रभुत्व राहिलंय. त्यांच्या बंगाली भाषेतील कवितांचा एक व्यापक चाहता वर्ग आहे. पण सलील’दांची ओळख ही त्याही पलीकडचीये!

तेरा विविध भाषांमध्ये संगीत देणाऱ्या या प्रतिभाशाली फनकाराने पंच्याहत्तरहून अधिक हिंदी चित्रपट, एक्के चाळीस बंगाली, सत्तावीस मल्याळम तसेच आसामी, तामिळ, तेलगू, कन्नड, उडियां, गुजराथी, या भाषेतील चित्रपटांनाच नाही तर, १९६२ला आलेल्या ‘सुनबाई’ या मराठी चित्रपटाला सुद्धा संगीत दिलं होतं. कुशल संगीतकारांसोबत, बांसरी, हार्मोनियम, पियानो आणि एस्ट्रजसह अनेक वाद्य वाजविणारे




ते एक मल्टी इंस्ट्रुमेंटलिस्टही होते. चतुरस्त्र अशा या कलाकाराचा जन्म स्वातंत्र्यपूर्व भारतातील पश्चिम बंगालच्या चोवीस परगण्यातील गाजीपूर या छोट्याशा खेड्यात १९ नोव्हेंबर १९२२ला झाला होता. त्यांचं बालपण मात्र आसाममधील चहाच्या मळ्यांमध्ये गेलं. हरिनवी डी.व्ही. एस. हायस्कुलमधून सलील’दांनी आपलं प्राथमिक शिक्षण घेतलं. शालेय वयातच त्यांना संगीताची जबरदस्त आवड होती. त्यावेळीच वेगवेगळी वाद्य वाजविण्याचा त्यांनी कसून रियाज केला. वयाच्या सहाव्या वर्षीच आपल्या मोठ्या भावाकडून ते पियानो वाजवायला शिकले. त्यांचे वडील हे एक फिजिशीयन तर होतेच शिवाय संगीतकारही होते, ज्यांना वेस्टर्न क्लासिकल संगीत ऐकण्याचा


‘सलील चौधरी’

मोठा छंद होता.

लहानपणापासून पाश्चिमात्य संगीत ऐकण्यात आल्याने सलिल’दांवर त्या सगळ्यांचा प्रभाव मनावर होता. पुढे; बंगाबासी महाविद्यालयातून पदवी संपादन करण्यासाठी ते जेव्हा कलकत्त्याला गेले तेव्हा त्यांना माहिती झालं की आपले मोठे भाऊ; निखिल चौधरी हे सुद्धा एका ऑर्केस्ट्रा ग्रुपशी जुळलेले आहेत. आपल्या भावासोबतच मग त्यांनी संगीतकलेचं प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली. या सरावा दरम्यानच्या मिटिंगांमध्ये आपसूकच त्यांच्या ओळखी देश-विदेशातील कलाकारांशी झाल्या. या काळात त्यांच्या संगीत संयोजनांमध्ये बऱ्यापैकी परिपक्वता आली. ‘परिबोरतन’ हा १९४९साली त्यांनी संगीतबद्ध केलेला पहिला बंगाली चित्रपट, आणि १९९४चा ‘महाभारती’ हा शेवटचा. ‘बीचरपूती तोमर बिचार...’ हे त्यांचं पहिलं बंगाली गाणं! वयाच्या एकविसाव्या वर्षी एकोणीसशे त्रेचाळीसला, आपल्या मामांसोबत राहण्यासाठी परगण्यातील आपल्या गावी ते परत गेले, त्यावेळी एका मोठ्या उठावाचे ते साक्षीदार ठरले. त्या उठावात सामील होऊन त्यांनी शेतकरी चळवळीसाठी गाणीही लिहिली. एकोणीसशे चौऱ्हेचाळीसमध्ये एम.ए.ला असताना ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या मानव निर्मित दुष्काळात, कलकत्त्याच्या रस्त्यावर जवळजवळ तीन लाख बंगाल्यांना मरताना त्यांनी प्रत्यक्षात पाहिले. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी विस्थापितांचे, भुकेल्यांचे आयुष्य त्यांना जवळून बघता आले. विक्रेत्यांनी आणि दुकानदारांनी त्यावेळी केलेला तांदुळाचा काळा बाजार, ज्यामुळे स्थानिकांची झालेली गळचेपी, डोळ्यांसमोर घडलेल्या अशा प्रत्यक्ष घटनांनी त्यांची लेखणी समाजासाठी जणू धगधगती मशाल ठरली. त्यावेळी ते इंडियन पिपल्स थियेटर असोसिएशन (इप्टा) आणि कम्युनिष्ठ पक्षाचे पूर्ण वेळ सभासद होते. भूमिगत होऊन सलिल’दा सुंदरबनच्या भात शेतात जाऊन लपून बसले होते. तशाही परिस्थितीत त्यांनी; नाटकं आणि गाणं लिहिणं सोडलं नाही. इप्टाच्या नाट्यसंस्थांनी त्यांची गाणी गावोगावी सर्वसामान्यांपर्यंत पोहचवली. त्या अनुषंगाने गाव-खेड्यातून, शहरातून सलिल’दांनी प्रवास केला. निषेधाची त्यांची ती सामूहिक गाणी स्वातंत्र्य चळवळीचा भाग बनली. सामाजिक न्यायाबद्दलच्या त्यांच्या भावना खूपच तीव्र होत्या. त्या भावनांचं प्रतिबिंब चैतन्य होऊन त्यांच्या गीतातून सळसळायचं जसं काही! सलिल’दांच्या गाण्यांनी आधुनिक बंगाली संगीताचा संपूर्ण अभ्यासक्रम बदलला. पन्नासच्या दशकात त्यांनी लिहिलेल्या ‘ज्ञानेर बोधू’ सारख्या गाण्यांनी बंगाली संगीत क्षेत्रात नवीन लाट आणली. त्यावेळी पश्चिम बंगालमधील जवजवळ प्रत्येक गायकानं सलिल’दांचं किमान एक तरी गाणं गायलं होतं.

सलिल’दांचे संगीत समजून घेण्यासाठी त्यांचे दोन्ही टप्पे अभ्यासणे गरजेचे आहे. पहिला टप्पा चाळीसच्या दशकाच्या स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सुरु होतो आणि चोपन्न-पंचावन्न पर्यंत जातो. तो टप्पा एका प्रतिभाशाली कवी, गीतकार आणि लेखकाचा होता, जो व्यावसायिक नव्हता. आणि दुसरं चरण हे त्यानंतरचं आहे. त्या टप्प्यात ते एक अतिशय परिपक्व आणि प्रतिभाशाली संगीतकार म्हणून नावारुपास आले. सृजनशीलतेची एक अभेद्य उंची या टप्प्यात त्यांनी गाठली.

सलिल’दांचं एकोणीसशे त्रेपन्नला मुंबईत येणं हा एक नशीबाचा भाग होता असं त्यांनी, ऑल इंडिया रेडिओला दिलेल्या एका मुलाखतीत स्वतःच सांगितलं होतं. ‘दो बिघा ज़मीन’ ची पटकथा त्यांनी आधी ‘रिक्शावाला’ या नावाने बंगालीत लिहिली होती. ज्या पटकथेवरुन महान दिग्दर्शक बिमल रॉय यांनी तो चित्रपट मोठ्या पडद्यावर आणला. चाहत्यांच्या काळजाला हात घालणाऱ्या या चित्रपटाच्या कथानकाने त्यावेळी फिल्मफेअरचा पहिला पुरस्कार तर पटकावलाच, शिवाय ‘कान्स’ फिल्म फेस्टिवलमध्ये ‘कान्स’ पुरस्कारावर आपल्या सृजनाची मोहोरही उमटवली. बलराज साहनी अभिनीत या चित्रपटाने सलिल’दांना एका वेगळ्या उंचीवर नेवून ठेवलं. त्यानंतर एकापेक्षा एक सुंदर गाणी त्यांनी चित्रपटसृष्टीला दिली. ‘धरती कहे पुकार के...’, ‘हरियाला सावन ढोल बजाता आया...’, दो बिघा ज़मीन १९५३ / ‘जागो मोहन प्यारे...’ जागते रहो १९५६ / ‘ओ सजना...’ परख १९६० / ‘आँखों में मस्ती शराब की...’, ‘इतना ना मुझसे तू प्यार बढ़ा...’ छाया १९६१ / ‘जा रे, जा रे उड़ जा रे पंछी...’, ‘तस्वीर तेरी दिल में...’, ‘कोई सोने के दिलवाला...’ माया १९६१ / ‘ऐ मेरे प्यारे वतन...’, ‘गंगा आये कहाँ से...’ काबुलीवाला १९६१ / ‘आके सीधी लगे तेरी...’ हाफ टिकट १९६२ / ‘कहीं दूर जब...’, ‘मैंने तेरे लिए ही...’, ज़िन्दगी कैसी है पहेली...’ आनंद १९७४.

या व्यतिरिक्त बंगाली, आसामी, मल्याळम, तामिळ, कन्नडा, या भाषेतील शेकडो गाण्यांना त्यांनी कुशलतेनं संगीतबद्ध केलं. बॉम्बे युथ कॉयरचे संस्थापक असलेले सलिल’दा कथानकाच्या मूड नुसार सूर तयार करीत असत. पूर्व आणि पाश्च्यात्य संगीत कलेचा मिलाफ त्यांच्या संगीत रचनांमध्ये दिसून येतो. एकदा ते म्हणाले होते - मला अशी शैली निर्माण करायचीये जी देशांच्या सीमा ओलांडेल. चित्रपट, कविता, कथा, नाना तऱ्हेची वाद्य... या पैकी कोणत्या माध्यमातून आपली सृजनशीलता व्यक्त करावी याबद्दल कधी कधी त्यांचा गोंधळ उडायचा. मात्र; निर्मिती या एकाच ध्यासाने ते पछाडलेले असायचे. मोझार्ट, बिथोव्हेन, तचैकोव्स्की, चोपिन या संगीतकारांना ते रोजच ऐकायचे. मोझार्ट हा त्यांचा अतिशय आवडता संगीतकार. जंगलाचा आवाज, पक्षांची किलबिल, बांसरीची धून, आसामी लोक संगीत आणि दैनंदिन जीवनातलं नाविन्यपूर्ण संगीत या सगळ्यांनीच सलिल’दांचं जीवन व्यापलं होतं. चित्रकार ज्योती चौधरी यांच्याशी जुलै, एकोणीसशे त्रेपन्नाला सलिल’दा विवाहबद्ध झाले होते. जिच्यापासून त्यांना तीन मुली होत्या. नंतर, महान गायिका सबितांशी त्यांनी विवाह केला. जिच्यापासून त्यांना चार मुलं होती. त्यातले; संजॉय चौधरी हे सुद्धा एक यशस्वी संगीतकार आहेत. अनेक वाद्य वाजविणारा माणूस अशी ओळख असलेल्या सलिल’दांना पुरस्कारही अमाप मिळाले. नऊ फिल्मफेअर पुरस्कार, भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार, कान्स फिल्म फेस्टिवल, बंगाल फिल्म जर्नालिस्ट, उत्तर प्रदेश फिल्म पत्रकार संघ, संगीत नाटक अकादमी, महाराष्ट्र गौरव असे कितीतरी मानाचे पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासाचं सोनेरी पान असलेला हा चतुरस्त्र कलाकार वयाच्या त्र्याहत्तराव्या वर्षी ५ सप्टेंबर १९५५ला हे जग सोडून गेला.

जेव्हा जेव्हा आता सूर्य मावळतीला जातो तेव्हा मावळत्या सूर्याच्या त्या रंगबिरंगी आभेत मला सलिल’दांचा चेहरा दिसू लागतो. आणि मनात रेंगाळत राहतं राजेश खन्नाच्या ‘आनंद’ चित्रपटातलं ते श्यामल, सुंदर गीत - **कहीं दूर जब दिन ढल जाये सांझ की दुल्हन बदन चुराये, चुपके से आये...’**

**संदर्भः विकिपिडीया, यु-ट्युब, www.salilda.com**

**Highlited Lines-** ‘मधुमती’चीच नाही तर, कितीतरी चित्रपटांची सुंदर सुंदर गाणी आहेत जी सलील’दांच्या संगीताचा बाज लेवून हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात अजरामर होऊन गेलीयेत. मग ते ‘माया’ चित्रपटातलं राग भैरवातलं ‘जा रे; जा रे उड़ जा रे पंछी...’ असेल, वा ‘काबुलीवाला’ चित्रपटातलं ‘ऐ मेरे प्यारे वतन...’! सलील’दांची आगळी-वेगळी छाप त्या गीतांमधून डोकावतांना आपल्याला दिसते.

## स्मृतींचा अमीट ठसा


निनादेल उजाळा कर्तृत्वाचा घेऊनी कार्यसिद्धीचा वसा
सोबत ज्योती चिकाटीची प्रत्यक्षेल स्मृतींचा अमीट ठसा

प्रत्यक्षेल स्मृतींचा अमीट ठसा कार्यघडण प्रज्वलेल
नक्की घेऊनी वसा ध्येयविचाराचा
खूणगाठ मनाशी पक्की

आमुचे स्कंध हे बलवान त्यासी धारिष्ट्याचा मुलामा
आम्ही न डगमगू कधीही हे ऐकून घे तू गगना

असे धुंद आम्ही धेयमार्गात आता न घेणे विचलन
वळसा निश्चित उंचावू कर्तव्य ठसा
प्रत्यक्षेल स्मृतींचा अमीट ठसा

मनोज शोभाबाई प्रकाश
अग्रवाल, औरंगाबाद.



## मनमोहिनी

मनमोहिनी तू मनमोहिनी
सुबक सुंदरी तू सुबक सुंदरी
चाहूल मनाला तुझी का लागली
नयन-नयन का वाट पाही तुझी
गंध प्रेमाचा घेऊनी तू आली
मनमोहिनी तू मनमोहिनी
चाहूल मनाला तुझी का लागली
झुळझुळ करीत वाहू लागले
प्रेम निरंतरी ध्वनित पैंजणांच्या
मंत्रमुग्ध झालो तरी
गेले-गेले हृदय जोडल्या,जोडल्या
तुझ्या अंतरी मनमोहिनी तू
मनमोहिनी चाहूल मनाला तुझी
का लागली
क्षणोक्षणी आता आठवण ही
छळाया का लागली ग
सैरावैरा हा जिव कधी कोठे-कधी
कोठे भटकू का लागला ग
ओढ तुझी लागली ग
शोधायला तुला हा जीव बेधुंद
कसा झाला ग
मनमोहिनी तू मनमोहिनी
चाहूल मनाला तुझी का लागली ग
वेड लावल तुझ्या गोजि-या रुपान
तुझ्या गोड स्मित हास्याने
लळेस लावला हा जिव
घाव खोलवर गेला आता निघुन
निस्तब्ध निजला वाट तुझी पाहुन
मनमोहिनी तू मनमोहिनी
सुबक सुंदरी तू सुबक सुंदरी
चाहूल मनाला तुझी का लागली

लक्ष्मण वाल्डे-कन्नड
मो.नं-8888606068

## असंही प्रेम करून बघावं...

स्वार्थाच्या पलिकडचं
एक नातं जपून बघावं?
निरपेक्ष देता-देता कधी
असंही प्रेम करून बघावं...


तिनं द्यावा स्पष्ट नकार
अन् तिरस्कार खूप सारा,
त्याची मात्र निष्पाप भक्ती
विसरून द्वेषमय पसारा...

तिनं जगावं तिच्या धुंदीत
क्षण-क्षण त्यानं जळावं,
तिच्या एका शब्दांतूनही
त्याला स्वर्गसुख मिळावं

पहिली भेट नि पहिली नजर
दोन्हीनी खूप-खूप छळलं
त्याने मात्र कणखर होऊन
त्या निराशेतही सुख
शोधलं?

तिच्या असण्याचा सोहळा
स्मृतींना मनोमनी जपावं,
नकारात होकार शोधणारं
एकदा असंही प्रेम करून
बघावं!
असंही प्रेम करून बघावं...

जया विनायक घुगे-मुंडे
जिल्हा परिषद शिक्षिका, गावंदरा
ता. परळी (वै.), जि. बीड



## ग्रंथराज संविधान

जगी दुजा ना महान।
शोध घेऊन पहा हो।
भारतीय संविधान।
पैजा याशी लावा हो।१।

हाचि खरा ग्रंथ राज।
जशी जगी सूर्यप्रभा।
गमे शिरी ग्रंथां ताज।
कवे घेई साऱ्या नभा।२।

न्याय स्वातंत्र्य समता।
द्रवे दया वाक्योंवाक्यी।
ऊर विशाल बघा हो।
दाटी औदार्य हृदयी।३।

प्रिय व्हावे नारी नर।
मानवता ठाई ठाई।
सुखे नांदवी जनता।
सण तोचि लोकशाही।४।

सर्व धर्म समभाव।
देश रमो पुष्पमाला।
मुभा भाष्य व्यवसायी।
सम दंड ज्याला त्याला।५।

सार कलमोंकलमी।
नटे वधू मानवता।
किती भाग्यवंत आम्ही।
सुखे वर्तती वर्तती।६।

दिन राती कष्टियले।
भीम बाबा शिल्पकार।
कैसे फेडिशी 'कृगोनि'।
पांग सांग सारासार।७।

-कृष्णकुमार निकोडे

## ॥ ठेवा ॥

जीव शिव ज्यांनी, मानिले
ग्रंथास
तयांच्या पंथास, स्वीकारिले
॥

वाचूनिया ग्रंथ, करू माथा
शांत
नवे नवे प्रांत, धुंडाळीत ॥

सारस्वता थोरं, घेऊ उमजून
होऊनिया लिन, विचारांशी ॥

आपुलेही थोडे, मांडू
लेखणीत
असो कथा गीत, स्फूरलेले ॥

मर्यादांचे भान, वेळी मला
येवो
टिटवीचा टाहो, काय कामी
॥

अंतःकाळी ठेवा, ग्रंथांचा
उरावा
तोच एक पुरावा, सारसिद्ध ॥

-भानुदास धोत्रे
परभणी
7972625086



## विनयभंग



विनय भंग केला हो
अचानक हो तक्रार
तपासावे सत्य काय
कसा घडला प्रकार

कधीकधी खोटेपणा
ख-याचा घेईआधार
बडवत राहे ढोलकी
पुरावे जरी निराधार

सावज राहे बाजूला
तिसरा होतो शिकार

प्रसिद्ध होण्याकरता
वाढे प्रकार चिक्कार

खरा आवाज दबेल
कोण ऐकेल चित्कार
अन्याय हो कुणावर
कोण ऐकेलं फुत्कार

असल्या क्रूरकर्माचा
कधी ना हो सत्कार
खोटे नाटे आरोपांनी
काय होईल साकार

आला आला लांडगा
चालत राही झंकार
खरोखर संकट येता
मदतीला मिळे नकार

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

## संविधान...।

आमच्या देशाचे संविधान
आहे खूप-खूप महान,
साऱ्यांना त्याचा अभिमान
त्याच्यामुळे वाढे देशाची शान.
देशात समाजवादी लोकशाही
सगळ्यांना समान न्याय देई,
स्वातंत्र्य हे आबाधित राही
प्रत्येकाला इथे प्रतिष्ठा येई.
संविधानात राष्ट्रीय एकात्मता
इथे नांदत राहती बंधुता,
त्यामुळे अखंडित आहे एकता
संविधानाने चोहीकडे समानता.
संविधान अंगीकृत करू या
तत्वनिष्ठा मनात धरू या,
न्यायाने सत्याची ओटी भरू या
संविधानाचे सारे सन्मान करू या.

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४

## संविधानाचे शिल्पकार (डॉ. बाबासाहेब आंबेडकर)

राज्यघटना भारत देशाची
सर्वोच्च असा त्यास बहुमान,
कायदे कानून शिकवते आम्हा
अनमोल हे देशाचे संविधान.!

सांभाळण्या देशाचा कारभार
उपयुक्त हक्क एक मतदान,
निवडावा कारभारी आम्हीच
असेच सांगतेय हे संविधान.!

करारीबाणाभीमाअंगी
अद्भूतआत्मसातकेले ज्ञान,
देशचालवितोआज कारभार
तेचत्यांनीलिहले संविधान.!

अवघड घटना मांडली पुस्तकी
भीमा तुझा आम्हा अभिमान,
कायद्यास मिळाली बळकटी
नमूद हेच झाले या संविधान.!

कलमांचा गोषवारा भीमाचा
विचारांनी त्यास केले परिधान,
आदर्श या भारत देशासाठी
यांनीच लिहिले हे संविधान.!

स्वातंत्र्य, न्याय, मूलभूत,
अधिकारांचा आत्मसन्मान,
कायद्यांचे असे हे पुस्तक
जगी मोठे हेच संविधान.!

सत्य-असत्याने वाढली ही
कायद्यांची एकमेव शान,
सर्व सामांन्यानी जाणले
मौल्यवान असे हे संविधान.!

आभारही मानायला हवेत
बाबासाहेबांचा हा एक मान,
चालते देशाची सारी मदार
घेऊन तो आधार संविधान.!

© भूषण सहदेव तांबे
मुंबई ९०२९२५८०३८

## निसर्गाचे नियम

हिरव्यागार झाडावर
करू नका वार
उन्हाळ्यात आपणास
सावली देते गार

पाणी म्हणजे जीवन
असू द्या ध्यानी
पाण्याचा दुरुपयोग
करू नका कुणी

कचरा टाकण्यासाठी
वापरा कचरा पेटी
प्रदूषण वाढले की
होईल दमदाटी

पशुपक्षी आपले सोबती
करा त्यावरी दया
आपल्यावरही करतील ते
जीवापाड माया

पाळा निसर्गाचे नियम
मानव कल्याणासाठी
अन्यथा संकटरूपी राक्षस
धावून येईल पाठी

- रवींद्र व्ही. चालीकवार
मो.9011559106



## ज्ञानियाचा राजा ज्ञानोबा माझा

जगी पाजवाया गोड अमृताचे ज्ञान
भूतलावर जन्म घेतला संत ज्ञानेश्वर
अडकली होती संस्कृततात वेद पुराण
मराठीत खुले केले तुम्ही ज्ञानभंडार
धर्माच्या ठेकेदारांच्या नयनी घातले अंजन
चालवली निर्जीव भिंत आपल्या सामर्थ्यातुन
रेड्यामुखी वेद बोलविले मराठीस दिला मान
सर्व जीवासी आहे धर्मज्ञान दाखविले जगास
सर्व जग एकच संदेश महान माऊलीचा
भागवत धर्माचा पाया रचिला तुम्ही माऊली
प्रतिष्ठान आपेगावी चरणस्पर्श झाला ज्ञानोबांचा
जनतेचे बनले माऊली तुम्हीच आमची सावली
अलंकाराने माऊलीने मराठीत गीता सजविली
काव्यमय लिखाणाने उपदेशाची गंगा वाहीली
गोरगरीब जनतेस नवी दिशा दाखविली
वारकरी धर्मास तुम्ही नवी आशा हो दाखविली
माऊली माऊली भजन गातो आज आनंदाने
ज्ञानोबा जीवन जगतो महाराष्ट्र तुमच्या तत्वाने
इंद्रायणी तीरी जमतो वैष्णवांचा मेळा
जात भेद विसरूणी होती भक्तजन आज गोळा
- संदीप वाकडे पाटील, 9766992776



## भारत जोडो यात्रा

झूठ घमंड से छुटकारा देने,
भाईचारे को दोहराने.
जन गन मन साथ लेकर,
दूसरा गांधी निकल पडा है.
भारत जोडो का नारा है।।१।।
न डरेगा न मिटेगा,
वह आखिर तक चलेगा.
'गांधी' एक विचार धारा हैं,
वो धारा ही 'अमर धारा' हैं.
दूसरा गांधी निकल पडा है,
भारत जोडो का नारा हैं ।।२।।
गांधीजी की सफेद खादी,
अंदर बाहर सें 'सफेद'हैं.
सौ बार झूठ बोलनेवालो सें,
गांधीवाद की बाते अच्छी हैं.
दूसरा गांधी निकल पडा हैं,
भारत जोडो का नारा हैं ।।३।।
हार के बाद भी 'फिनक्स' बनी,
वो इंदिरा एक 'दुर्गा' महान थी.
खुद अटलजी ने ही बोला हैं,
उनके पथ पर चलनेवाला.
दूसरा गांधी निकल पडा हैं,
भारत जोडो का नारा हैं ।।४।।
युवकोंके सपने पुरे करने,
मजदूरों की मजबूरी मिटाने.
कामगारों का दिल जीतने,
किसानों को हक् दिलाने.
दूसरा गांधी निकल पडा हैं,
भारत जोडो का नारा हैं।।५।।
भारत माँ का पदस्पर्श करके,
मस्तकाभिषेक करने चल पड़ा
हैं.
भीड यात्रा की देख देखकर,
यु ही ऊँगलियाँ चबाते रहोगे.
दूसरा गांधी निकल पडा हैं,
भारत जोडो का नारा हैं ।।६।।
©®दत्ता तरलगट्टी
पंढरपुर, महाराष्ट्र

# छत्रपती शिवरायांना 'राजकारणात' ओढू नका !




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. ते उत्कृष्ट योध्दा,आदर्श शासनकर्ता, प्रजाहितदक्ष, त्यांना कल्याणकारी राज्य म्हणून जागतिक इतिहासात अत्युच्च स्थान आहे. शिवरायांनी सर्व जातीच्या धर्माच्या लोकांना सोबत घेवून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यांचे विषयी 'शिवरायांचे आठवावे रूप। शिवरायांचा आठवावा प्रताप। शिवरायांचा साक्षेप भूमंडळी! उगाच म्हटले जात नाही. महाराष्ट्रातच नव्हे, संपूर्ण देशच छत्रपती शिवरायांचा आदर्श मानतो. छत्रपती शिवरायाच्या राजमुद्रेवर सस्कृंतमध्ये म्हटले आहे 'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनो : शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते' याचा अर्थज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो.**

तशीच शहाजींचे पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल. ते खरे ठरलेले आहे. तेंव्हा शिवराय जगासाठी मार्गदर्शक आहेत. पण आजत्यांचा आदर्श घेवून राजकीय किती नेते वागतात? केवळ छत्रपती शिवरायांचे नाव घेवून राजकारण केले जात आहे. महाराष्ट्रात छत्रपती शिवरायांबद्दल केलेल्या कथित विधानावरून गोंधळ घातला गेला. खरच त्या व्यक्ती शिवरायांचे व्देषी आहेत. हे कोण ठरविणार? यातून राजकीय गोंधळ, झाला. आरोप- - प्रत्यारोप झाले, मग कारवाई झाली का? केवळ 'कालचा गोंधळ बरा होता'असे म्हणायचे का. अशा प्रकरणात व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करता आली पाहिजे? याचाही विचार केला गेला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापनेला स्वकीयांनेही विरोध केला होता.त्यात सरमंजदार काही मराठे व सनातनी ब्राह्मणांनी केला होता, हे ही तितकेच सत्य आहे.आज पुरोगामी महाराष्ट्रात आज तरूण वर्ग मग तो, मराठा, ब्राह्मण, मुस्लिम इतर कोणत्याही जाती- धर्माचा असो तो गुण्या गोविंदाने नांदतो आहे. ते एकमेकांचे मित्र आहेत. पण राज्यात जाती-जातीत, धर्मात भांडणे लावण्याचे राजकीय नेते करत आहेत ? छत्रपती शिवाजी महाराजांना एका समाजापुरते मर्यादीत ठेवण्याचे काम केले जात आहे. ती एका पक्षाची मक्तेदारी नाही. त्यांच्या संकुचितवृत्तीमुळे वाद निर्माण होत आहेत. याच राजकारणातून राज्यात ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर वादाला खतपाणी घातले गेले. यातून तरूणांचे माथे भडकवून राजकीय पोळी भाजून घेण्याचा इरादा आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस १९९९ सत्तेत आल्यानंतर जातीयतेची बीज जाणीवपूर्वक बीज पेरत आहे, हे मनसे नेते राज ठाकरे जाहीरपणे म्हणाले आहेत. शिवरायांचा इतिहास केवळ ब्राह्मणांनी लिहिला व तो चुकीचा लिहिला, असे म्हटले गेले. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने ब्रिगेडी संघटनेला हाताशी धरले व उघडपणे विरोध सुरू केला. मग दादोजी कोंडदेव हे शिवरायांचे गुरूच नव्हते, यावरून वाद उभा केला. नंतर दादोजी यांचे पाठ्य पुस्तकातून उल्लेख वगळण्यात आला. नंतर २०१७ मध्ये परदेशी 'मूर्ख लेखक जेम्स लेन्स' च्या लिखाणावरून कोंडदेव यांचा पुतळा हलविला गेला, तो एका कचऱ्याच्या गाडीतून नेला. तसेच स्वामी रामदास महाराज हेही गुरू नव्हते. त्यांचाही विरोध केला गेला. कारण काय तर, ते ब्राह्मण होते म्हणूनच ना! ते गुरू असतील किंवा नसतील, तो वाद संपणारा नाही पण ते नक्कीच शिवराय प्रेमी होते ना! मग त्यांचा अवमान का केला गेला? मूठभर ब्राह्मण समाज काही करू शकणार नाही,हे गृहीत करून केले जात आहे. तसेच साहित्यकार, इतिहासकार, पद्मभूषण बाबासाहेब पुरुंदरेंनी आयुष्यभर शिवाजी महाराजांच्या गडकिल्यांचा शोध घेतला. त्यांनी ऐतिहासिक शिवकालिन दस्ताऐवजांचा सखोल अभ्यास केला. त्यांनी 'जाणता राजा' या महानाट्याचे लेखन केले व प्रयोग केले. त्यांनी शिवचरित्र घरोघरांत पोहचविले. त्यांचाही हयातभर व्देष केला गेला. ते केवळ ब्राह्मण होते म्हणूनच! यात खुद राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचा पुढाकार होता. तोच अजेंडा राष्ट्रवादी पक्षाचे इतर नेते पुढे नेत आहेत. पक्षाचे नेते ब्राह्मण समाजावर अभद्र टिप्पणी करत आहेत. तरी पण ब्राह्मण समाजाचे काही नेते निर्लज्जपणे पवारांना भेटावयास गेले होते. हिंदुधर्माची टिंगल टवाळी करणाऱ्या राहूल गांधी यांची 'भारत जोडो' नांदेडात आली होती तेंव्हाही काही ब्राह्मणवृदांनी त्यांचे स्वागत केले, त्यांना थोडीशीही लाज वाटलेली नाही.एखादा व्यक्ती दोषी असूशकते शकतो,पूर्ण समाज नाही,तेंव्हा समाजालाच दोषी ठरवणे,लक्ष्य करणे हे कितपत योग्य आहे?तसेच नाटकार राम गणेश गडकरी यांचा पुतळा तोडला गेला.कारण 'आम्ही म्हणतो तोच तुम्ही इतिहास खरा! तो मानला गेला पाहिजे,अशी दडपशाही सुरु झाली,वैयक्तीक हल्ले होऊ लागले. तेंव्हा इतिहासकारांनी मौन पाळणे पसंत केले.हे राजकारण इतक्यावर थांबलेले नाही. आता जातीच्यानंतर राजकीय स्वरूप दिले जात आहे. कारण विरोधी पक्षाला केंद्रातील भाजपाच्या विरोध करून सत्ता मिळवायची आहे. त्यासाठी भाजपा व आर.एस.एस. हे शिवरायांचे व्देषी आहेत,असा समज पसरविण्याचा राजकीय खेळ सुरु आहे. यातून किमान मराठा समाज संघटीत होईल व एक गठ्ठा मते मिळतील, अशीच रणनीती आहे. काँग्रेस नेते राहूल गांधी यांचा स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विषयी व्देष आहे! ते ठरवून टीका करता आहेत. ते पक्षाचे धोरण झाले आहे. भारत जोडोत यात्रच्या शेवटच्या टप्प्यात त्यांनी सावरकरांच्या विरोधात जी टिप्पणी केली, त्यात तेच फसले! यात काँग्रेस 'बॅकफूटवर' आली, तेंव्हा त्यावर पडदा टाकण्यासाठी काँग्रेसने नवीन वाद उभा केला. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. यांच्या तंबूत ठाकरे आता शिवसेना शिरली आहे. या तिन्ही पक्षांना भाजपाच्या विरोधात वादाचा मुद्दा पाहिजेच होता, तो शोघ सापडला! तो म्हणजे, औरंगाबाद येथे कार्यक्रमात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजाबद्दल वक्तव्य केले,त्यावरून वाद निर्माण केला गेला. त्याच व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार व भाजपाचे नेते नितीन गडकरी होते.




गडकरी भाजपा नेते तेंव्हा त्यांच्याकडून विरोधाची अपेक्षा तरी कशी करणार?पण तेथे "जाणता राजा' शरद पवारांच्या कानावर शब्द पडले होते ना! मग ते चिडले नाहीत, ते गप्प,शांतपणे बसून राहिले. त्यांनी डी,लिट. पदवी तेथेच फेकून बहिष्कार का टाकला नाही? त्यांचे मौन सुध्दा शिवरायांचे अवमान करणारे नाही काय? खर तर! राज्यपाल कोश्यारी हे आर.एस.एस. व भाजपा नेते होते, म्हणून लक्ष्य केले जात आहे. ते शिवरायांचा अवमान करण्याच्या उद्देशाने बोलले नाहीत, ते शिवाजी महाराजांचा व्देष करणारे मुळीच नाहीत, हे वास्तव आहे .कारण उतार वयात शिवरायांच्या प्रेमापायी ते शिवनेरी किल्याचा गड चढून जातात.तेथे शिवरायांसमोर नतमस्तक होतात. या घटनेचा विसर पडतो आहे. देशात राज्यपाल हे संवैधानिकपद आहे, या पदाचा अवमान होणार नाही, याची सर्वांनीच मर्यादा पाळवयाला पाहिजे.त्यात खुद्द राज्यपाल कोश्यारींनी मर्यादीत आणि प्रशासकीय लिखीतच भाषण करावयास पाहिजे होते. त्यांना शब्दाची योग्य मांडणी करता येत नाही, त्यातून वाद उद्भवतात,हे माहित असताना ते वारंवार राजकीय नेत्या- प्रमाणे भाषण का करता आहेत ? त्यांनी अशी भाषणाचा मोह टाळला पाहिजे.राज्यपालांच्या त्या वक्तव्याबाबत राज्यभवनातून तातडीने खुलासा केला गेला असता तर हा वाद चिघळला नसता.या घटनेतून राज्यपाल या संवैधानिकपदाची प्रतिमा डागळली गेली आहे. त्याला ते स्वतः जबाबदार आहेत.यावरून राज्यात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसने गोंधळ घातला.त्यांनी संवैधानिकपदावर असलेल्या व्यक्तीला प्रतिमेला जोडो मारणे,तसेच एकाला धोतर व काळी टोपी घालून धोतर फेडण्याचे कृत्य केले.राज्यपालांच्या विधानाचा निषेध करावयाचा होता तर त्यांना राष्ट्रपतीकडे पत्र पाठविले व भेट घेतली असती. लोकशाहीत हा सनदशीरमार्ग आहे,पण तो न स्विकारता आंदोलनाचा पोरकटपणा केला गेला.तो मुळीच शोभणारा नाही.देशात काँग्रेस पक्षाने तर राज्यपालपदाचा राजकारणासाठी अधिक गैरवापर केलेला आहे.११६६ मध्ये मोरारजी देसाई यांच्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने राज्यपाल हे राजकीय व्यक्ती नसावी, अशी शिफारस केली होती.तामीळनायडू राज्य सरकारने १९७० मध्ये राजमन्नार समितीने राज्यपालांच्या निवडीत राज्यांचा सहभाग असावा, अशी सूचना केली होती.तसेच घटनेतील कलम ३६५ चा विरोधी पक्षांचे सरकार बरखास्त करण्यासाठी वापर केला जात होता, तेंव्हा १९८० सरकारिया आयोगाची नेमला गेला. तेंव्हा केंद्र व राज्यातील सत्ता संघर्षामुळे राज्यपाल नियुक्तीचे अधिकार केंद्राकडे असावेत,हे काँग्रेस सरकराने ठेवणे पंसत केले. तेंव्हा काँग्रेसने राज्यपालाच्या विषयावर मते मांडण्याचा नैतिक अधिकार गमावलेला आहे.काँग्रेसचे सावरकारांची बदनामी व अवमान करणे धोरण ठरलेले आहे. भाजपाचे शिवरायांचा अवमान करणे पक्षाचे धोरण नाही आणि भविष्यात नाही. पण संशयावरुन,शब्दावरून शिवरायांचे व्देषी ठरविण्यासाठी राजकीय नाटक रचणे, हे दुर्दैव आहे! दुसरी घटना म्हणजे, भाजपाचे प्रवक्ते सुधांशु त्रिवेदी यांना एका हिंदी वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत अँकरने राहूल गांधीनीं सावरकर माफीबाबत केलेल्या आरोपाबाबत प्रश्न विचारला होता.त्याचे उत्तर देताना, त्यांनी त्याकाळी शिक्षेच्या सुट मिळण्याचा फार्मुला होता. त्यानुसार सावकरकर यांनी पत्र दिलेले होते,असे सांगितले.तसेच तेंव्हा इतिसकालीन उदाहरण दिले ,त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी पाच पत्रे दिली होती.मग त्याला काय म्हणणार ? असा प्रतिसवाल केला.शिवरायांची ती पत्रे म्हणजे गनिमीकाचा भाग आहे. त्रिवेदींनी तर माफी या शब्दाचा वापर केलाच नाही,त्यांनी केवळ पत्राचा उल्लेख केला होता,हे नीट ऐकावे.पण काँग्रेस व ठाकरे गटाचे 'अर्धवट'राव व केवळ मराठी वृत्तवाहिन्यांनीच 'ध' चा 'मा' करत त्यांनीच यात नेमका माफी हा शब्द घुसविला.त्यातून टीकेची झोड उठविली. भाजपा विरोधी सर्वच जण एकत्र आले. त्रिवेदी हे भाजपा अभ्यासू प्रवक्ते आहेत, ते काँग्रेस नेत्याप्रमाणे बडबडणारे करणारे प्रवक्ते नाहीत.त्यांची छ. शिवाजी महाराराजांच्या शौर्याचे पराक्रमावरील भाषणे असून त्याचेअनेक व्हिडीओ क्लिप आहेत, तेंव्हा ते शिवरायांचा अवमान करण्यापैकी मुळीच नाहीत.पण केवळ शब्दांचा खेळ करून राज्यपाल व सुधांशू या दोघांना भाजपाचे म्हणून लक्ष्य केले जात आहे,असेच दिसतेय. यात विरोधी पक्ष नेत्यांचा अज्ञाणपणाही दिसून येतो.त्यांनी इतिहासाची पाने कधी चाळलेली, वाचलीच नाहीत, असे दिसतेय. वासुदेव कृष्ण भावे यांनी १९८२ मध्ये 'युगप्रर्वतक शिवाजी महाराज' पुस्तक प्रकाशित केले आहे, यात शिवरायांचे एक पत्र आहे. पण महाराजांचे ते पत्र औरंगजेब बादशहांची बतावणी करण्याचा भाग होता, असे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. त्याला रियासत पुस्तकातील खंड १ पृष्ठ २९० आधार दिला आहे. रियासतकार गो. स. सरदेसाई यांचे १८२४ व १९०२ मध्ये रियासत पुस्तक मराठीतून प्रसिध्द झाले असून त्याचे आठ खंड आहेत. त्यात १६०० ते १८८८ पर्यत शहाजी राजे ते छ. शिवाजी महाराजांची माहिती दिलेली आहे. तसेच शिवकथाकार विजयराव देशमुख यांनी 'शककर्ता शिवराय'चे दोन खंड प्रकाशित केले आहेत. यातील दुसरा खंड १९८२ मध्ये प्रकाशित आहे,यात शिवाजी महाराजांनी औरंगजेबाला पाठवलेली पत्रे दिलेली आहेत. तो शिवरायांच्या मुसद्दीगिरीचा भाग होता, हे लक्षात घेतले गेले पाहिजे. स्वातंत्र्यानंतर इंग्रजाच्या काळात नेहरू व म.गांधी तसेच सावरकरांनी शिक्षेत सूट मिळावी, म्हणून पत्रे दिली होती, ती पत्रे म्हणजे माफीचे मुळीच नाही, असे अभ्यासकांचे स्पष्ट मत आहे. शिवाजी महाराज व छ.संभाजी महाराजांचा छळ करणाऱ्या धर्मांध, क्रूर मोगल सम्राटांच्या नावाने काँग्रेस राजवटीत त्यांच्या सत्तेच्या छातावर दिल्ली राजधानीतील रस्त्यांना नावे दिली गेली.ती नावे काँग्रेस सरकार ला खुपसली का नाहीत? याच धर्मांध राज्याचे औरंगाबाद हे नाव दिले गेले.त्या 'औरंगाबाद'शहराचे 'संभाजीनगर' असे नामांत्तर करण्याचा निर्णय घेतला,तेंव्हा काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात व अशोक चव्हाण यांनी विरोध का केला?,तेंव्हा तो शिवरायांचा अपमान वाटला नाही ? तेंव्हा या नेत्यांची कोणाविषयी सहानुभूती होती?काँग्रेस तुष्टीकरणाच्या नादात हिंदुना लक्ष्य करत आहेत. पुरोगामी महाराष्ट्रात भिवंडीत कित्येक वर्षे शिवाजी महाराजांची जयंती मिरवणूक काढता आलेली नाही.तेंव्हा कोणाचा विरोध होता? मग छ. शिवाजी महाराजांचा विरोध,व्देष कोण करतोय? हे माहित असून तोंडे मतासाठी गप्प आहेत.तसेच छ. शिवाजी महाराजांच्या गणवेशातील एक नट राजकीय नेत्याला मुजरा घालत असतानाचे छायाचित्र सोशल मिडीयावर व्हायरल झाले होते. तेंव्हा त्याचा कोणाला राग आलेला नाही.औरंगाबाद येवून ए.आय एम,आय एम.च्या नेत्यांनी औरंगजेबाच्या कबरीवर फूले वाहिली,त्याबद्दल संताप नाही. प्रतापगडाच्या पायथ्याशी आदिलशहाचा सरदार अफझलखानची कबरी आहे, त्याचे सुशोभिकरण केले,ती उखडून टाकावी, असे वाटले नाही ?, क्रूर व धर्मांध औरंगजेबाला एका नेत्याने शहीद म्हंटले.तसेच अफझलखान तर राज्याचा विस्तार करण्यासाठी आलेला होता,अशा शब्दात त्याचे कौतूक केले,तो शिवरायांचा अवमान वाटत नाही ? केवळ भाजपा व आर.एस.एस. हेच शिवाजी महाराजांचे व्देषी आहेत काय? वास्तविक भाजपा व आर.एस.एस.चे छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल विरोधी धोरण नाही, त्यांच्या रक्तातही नाही. केवळ काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला भाजपाची बदनामी करून मुस्लिम समाजाची सहानुभूती आणि एकगठ्ठा मते मिळवायची आहेत,हेच राजकीय गणित आहे. नुकतेच गद्दार भास्कर कुलकर्णीत त्यांनी ब्राह्मण शोधला गेला. त्याला गद्दार म्हणून गाडले ना!मग चांगले झाले. शिवाजी महाराजांच्या अष्ट प्रधानमंडळात इतरही ब्राह्मण होते.त्यांचे व शूर बाजीप्रभू देशपांडे नाव घेतले जात नाही. तसेच शिवरायांच्या राज्यात न्यायाधिश निराजी रावजी नाशिककर हे ब्राह्मण होते. शिवरायांचा विरोध करणाऱ्यात स्वकीयात बाजी घोरपडे, चंद्रकांत मोरे, त्र्यंबकजीराजे भोसले, एकोजीराव तसेच भोसले,खोपडे निंबाळकर, हे मराठा नव्हते काय? तेंव्हा शिवराय प्रेमी व विरोधक दोन्ही समाजात होते. पण यातून समाजाला व्देषी ठरविणे उचित नाही. राज्यात इतका गोंधळ घालून कारवाई झाली का? पूर्वी गृहविभागामार्फत नेत्याच्या भाषणांची गुप्तपणे नोंद केली जात असे. त्या भाषणात आक्षेपार्ह व चिथावणी वक्तव्य असेल तर कारवाई केली जात असे. अश्या प्रकरणाची निःष्पक्ष तपासणी करण्याची गृहविभागामार्फत भाषा, इतिहासकार. कायदा तज्ज्ञांची चौकशी समिती नियुक्त करावी. या समितीचे विधानाची तपासणी करावी व त्यात आक्षेपार्ह अथवा अवमानकारक विधान केलेले निष्पन्न झाले तर कायदेशीर कारवाई केली जावी. भा.दं.वि.च्या कलम १५३,१५३(अ) तसेच २९५ व २९८ प्रमाणे कारवाई करता येवू शकते. यामुळे भविष्यात कितीही मोठी व्यक्ती असो, त्याचेवर कारवाई होईल व कोणी चुकीचे व अवमान करण्याची हिमंत तरी करणार नाही,असे मला वाटते. राज्यात केवळ शब्दांचा खेळ करून केवळ राजकीय गोंधळ घातला गेला.यातून समाजाच्या भावना भडकविणे,त्यांचे मते मिळण्याचा प्रयत्न होत आहे.तसेच भाजपाचा पराभूत करता येते व विरोधी पक्षाला सत्ता मिळविण्याचा उद्देश आहे.तेंव्हा भाजपा व संघाने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बोलतांना दक्षता घ्यावी,कारण २०२४ मध्ये लोकसभेची सार्वत्रिक व महाराष्ट्र विधानसभा निवडणूक होणार आहेत.देशातील व महाराष्ट्रातील राजकारणाला आता 'गाढवांचा गोंधळ, लाथाचा सुकाळ' असे स्वरूप आलेले आहे, तेंव्हा, यात छत्रपती शिवाजी महाराजांना तरी ओढू नये, अशी जनभावना आहे.

# रेल्वे प्रवासातील अनुभवांचे प्रांजळ कथन



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**आपल्या नियमित दैनंदिन कामकाजाच्या व्यतिरिक्त कोणत्या ना कोणत्या कारणास्तव प्रवास हा घडतोच. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी आपण रिक्शा, बस किंवा रेल्वे या साधनांचा आधार घेतो. कोणाचा प्रवास कमी कालावधीचा असतो तर कोणाचा प्रवास हा जास्त कालावधीचा असतो. प्रवासाचे हे क्षण आपल्याला आजुबाजुला घडणाऱ्या घडामोडींकडे पाहण्याची दृष्टी देतात. कमीतकमी वेळेत जलद गतीने प्रवास करण्यासाठी जास्तीतजास्त लोक रेल्वेला पसंती देतात. रेल्वेचे ते डबे, प्रवाशांची प्रचंड गर्दी, प्रत्येकाला आपल्या ठिकाणी पोहचण्याची लगबग , रेल्वे स्टेशनवर होणारी घोषणा, प्लेटफार्मवरील धावपळ हे दृश्य नेहमीचेच... रेल्वे स्टेशन म्हणजे गजबजलेले ठिकाण.**

या रेल्वेचे लहानपणापासून प्रत्येकाला कुतूहल वाटत असते. 'झुक झुक झुक झुक आगीनगाडी' हे गाणं ऐकले की आजही मन बालपणात जाऊन रमायला लागते.या झुक झुक गाड़ीतून आपण मामाच्या गावाला जावे, असे लहानपणी प्रत्येकाला वाटले असेल. याच रेल्वे प्रवासातील क्षण आयुष्याला एक वेगळं वळण देऊ शकतं, विश्वास बसत नाही ना ! हे खरेच आहे. पूर्णपणे रेल्वे प्रवासातील अनुभवांना प्राधान्य देऊन आयुष्यातील जास्तीतजास्त काळ ज्या गाडीमध्ये व्यतीत केला, तेव्हा आलेल्या अनुभवांची शिदोरी पुस्तकरुपात वाचायला मिळाली. लेखक सुनील पांडे लिखित 'पुणे - सातारा पॅसेंजर' हा कथासंग्रह रेल्वे प्रवासातील अनुभवांचे कथन करणारे आहे. नोकरीच्या निमित्ताने लेखकाने पुणे - सातारा पँसेंजर गाडीतून खूप प्रवास केला. नेहमीचा, सवयीचा हा प्रवास लेखनाचा विषय होईल, असा विचार तरी सामान्य व्यक्तिच्या मनात येणार नाही. पण लेखकाने या प्रवासातील कितीतरी बारीक - सारिक गोष्टीचे निरीक्षण केले, प्रवासात जी माणसे भेटली त्यांना वाचण्याचा प्रयत्न केला. आपण कितीतरी वेळा प्रवास करतो, पण एवढ्या बारकाईने आपण आजुबाजुला पाहत नाही, विचारमंथन करत नाही. 'आपले काम आणि आपण ' या चौकटीच्या बाहेर जाऊन विचार करणारी माणसे सुद्धा असतात, ही जाणीव या पुस्तकामुळे झाली. एकाच वेळी कितीतरी प्रवासी गाडीतून प्रवास करतात, पण सूक्ष्म निरीक्षणशक्ती, आकलनाची वृत्ती ही संवेदनशील आणि सजग लेखकाकडे असते, ही निरीक्षणशक्ती, उत्तम स्मरणशक्ती लेखक सुनील पांडे यांना लाभलेली आहे.



या कथासंग्रहात ३२ कथा आहेत. प्रत्येक कथेत वेगळे प्रसंग, आठवणी मांडलेल्या आहेत. प्रथमपुरुषी निवेदनशैली, सहज- सोपी वाक्यरचना, ओघवती आणि प्रवाही लेखनशैली त्यासोबत काही हसवणारे तर काही काही हळवे क्षण या कथासंग्रहात अनुभवायला मिळतात. पुणे - सातारा पॅसेंजर प्रवासात लेखकाला वेगवेगळ्या स्वभावाची, विचारांची माणसे भेटली, त्या माणसांच्या भेटीचा अनुभव किंवा दुरुन पाहिलेल्या व्यक्तिच्या आठवणी यात विशद केलेल्या आहेत. या पुणे - सातारा पॅसेंजर गाडीने लेखकाला अनुभवसंपन्न करणारे क्षण दिले. या पुणे - सातारा पॅसेंजरमधील प्रवासामुळे लेखकाला जो वेळ मिळायचा , त्या वेळेचा सदुपयोग करून लेखकाने इंद्रायणी एक्सप्रेस या महाकादंबरीचं बरेचसे लेखन प्रवासात केले, हे वाचून अचंबित व्हायला होतं. रेल्वेमध्ये कितीतरी लोक विविध खाण्याचे पदार्थ, वस्तू विकून आपला चरितार्थ चालवत असतात. काही तर अंध - अपंग असूनही मेहनत करतात तर काही जण धडधाकट असूनही भिक मागतात. अशा भिन्न प्रकारच्या व्यक्ती या प्रवासात लेखकाने पाहिल्या. ह्या अनुभवलेखनातून एक प्रकारे त्या त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. रेल्वेचा पास असूनही लेखकाची उडालेली तारांबळ, चुकीच्या प्लेटफॉर्मवर उतरल्यामुळे टीसीने केलेली चौकशी हे प्रसंग वाचताना आपसुक हळूच हसू येतं पण त्या क्षणी लेखकाच्या झालेल्या अवस्थेची कल्पना न केलेली बरी ! लॉकडाउनमध्ये ही गाडी बंद झाली आणि या गाडीतील प्रवास थांबला. 'पुणे - सातारा पॅसेंजर' मधील प्रवासामुळे विभिन्न अनुभव मिळाले, काही चांगली माणसे भेटली, ओळखी झाल्या. ऋणानुबंध निर्माण झाले. त्या व्यक्ती ठराविक काळासाठी आपल्यासोबत प्रवास करतात आणि पुढे प्रत्येक जण आपल्या पुढच्या प्रवासाला निघून जातो. या काही वेळेच्या प्रवासात अनोळख्या व्यक्ती सुद्धा आठवणी देऊन जातात, गंमत आहे ना ! आपल्या लाडक्या झुक झुकगाडीतील प्रवासातील गमतीजमती पुन्हा अनुभवण्यासाठी 'पुणे - सातारा पॅसेंजर' या कथासंग्रहाच्या गाडीत नक्की स्थानापन्न व्हा आणि प्रवासाचा आनंद घ्या.

**(पुणे - सातारा पॅसेंजर - कथासंग्रह / लेखक सुनील पांडे / स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे / मूल्य : १८० रुपये)**

# महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर : एक अनुबंध



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्या कार्यामध्ये एक अनुबंध आहे.अनुबंध म्हणजे परस्पर संबंध. एप्रिल महिन्यामध्ये म. फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा कार्यक्रम येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुलेंना आपल्या गुरुस्थानी मानत असत. दोघांचेही कार्य मानवतेसाठी म्हणजे मानवी कल्याणासाठी आहे.त्यांची जयंती म्हणजे अनेकांची उर्जा आणि प्रेरणा देणारी शक्ती असते. कोरोना प्रादुर्भावामुळे ती साजरा करता येणे शक्य नाही. परंतु त्यांनी केलेले कार्य,दिलेले विचार हे आजच्या परिस्थितीही फार उपयुक्त आहेत.**

आजही आम्ही जाती,धर्माच्या नावाखाली माणसांना तुच्छ लेखतो, अंधश्रद्धा,रूढी,परंपरा, कर्मकांड, करतो मात्र ते सारे कोरोनाने उजेडात आणल्याने वैज्ञानिक दृष्टिकोन किती महत्त्वाचा आहे, शिक्षण,शाळा,संशोधन किती महत्त्वाचे आहे हे फुले, शाहू, आंबेडकरांनी अगोदरच सांगितले होते. दोघांतील कारल्याचा कअनुबंध काही मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**शैक्षणिक धोरण**

महात्मा फुले यांनी मानवाची मती,नीती,गती नष्ट होण्याचे कारण अविद्या हे सांगितले आहे. अविद्येने फार नुकसान होते. त्याचबरोबर मनुष्यातीलज पशुत्व जर हटवायचे असेल तर शिक्षण महत्त्वाचा मार्ग आहे .म्हणून म. ज्योतिबा फुले ,सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाच्या कार्याला त्याच्या प्रसाराला झोकून दिले होते. महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण विषयक विचार सांगताना ते म्हणतात की, " यास्तव सरकारने शूद्रांना शैक्षणिक सवलती देऊन त्यांचे अज्ञान आणि पूर्वग्रह दूर करावे अशी सरकारला ज्योतिरावांनी विनंती केली.सरकारने कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाची सोय करावी. असे करणे सरकारचे कर्तव्य आहे.कारण रयतेच्या घामाचा आणि कष्टाचा सरकारला महसूल मिळतो. सरकारी महसूल यापैकी मोठा भाग वरिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणावर खर्च करणे हे न्याय्य इष्ट नाही. कारण वरिष्ठ वर्गातील लोक आपल्या शिक्षणाची व्यवस्था स्वतः करू शकतील. शिक्षण खाली झिरपत जाईल हे तत्त्व जोतीरावांच्या मते चुकीचे होते. त्यांना ती स्वप्न सृष्टीतील एक कल्पना वाटे. जनतेची नैतिक आणि बौद्धिक सुधारणा करण्यासाठी त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हाच खरा मार्ग होईल असे ज्योतिराव पुन्हा पुन्हा आक्रोश करून सांगत होते." अगदी त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका! संघटित व्हा! संघर्ष करा !हे शिक्षणाचे सार सांगितले होते. शिक्षण शोषण मुक्तीची पायवाट आहे असे बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही असेही ते म्हणत होते. म्हणून माणसाने शिक्षण घेणे गरजेचे आहे. शिक्षणाचा अभावी माणूस गुलाम होतो असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणत.आजही हे विचार शिक्षणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासनाला जागे करणारे आहेत.

**आदर्श संस्थाचालक**

म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आदर्श संस्था चालक होते.संपूर्ण देशात मुलींची पहिली शाळा काढणारे म.ज्योतिबा फुले हे होते. स्वतः शाळा काढून समाजासमोर आदर्श निर्माण केला होता. काही शिक्षण संस्था सुरू केल्या होत्या. त्याचप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 8 जून 1945 साली पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.मुबंई येथे सिद्धार्थ महाविद्यालय औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय महाड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाची स्थापना करून माणसाच्या जीवनामध्ये उन्नती होण्यासाठी शिक्षणाची गंगा उपलब्ध करून दिली.केवळ समाज सुशिक्षित व्हावा, त्यांच्या हातून समाजसेवा,देशसेवा व्हावी,माणुस प्रगतीपथावर जावा ,शोषण मुक्तीची वाट निर्माण व्हावी म्हणून ते संस्थाचालक झटत होते.आज ते शोषणाचे केंद्र बनले आहे.

**क्रांतिकारक शिक्षक**

शिक्षक अनेक आहेत पण क्रांतिकारक शिक्षक फार कमी आहेत. क्रांतिकारक शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये आमूलाग्र असा बदल घडवून आणून योग्य मार्गाने,सत्य मार्गाने,वैज्ञानिक मार्गाने त्याला घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो तो शिक्षक.आज फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचे अनेक शिक्षक आहेत पण ते क्रांतिकारक दिसत नाहीत.महात्मा फुलेंनी मुलींच्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून काम केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीही सिडनेहॅम कॉलेज मुंबई येथे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरम्हणतात की शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक व विद्यापीठातील प्रोफेसर करू शकतो.त्यामुळे मानवी जीवन आणि सामाजिक जीवन सुखकर होण्यास मदत होते. शिक्षण देण्याचे आणि शासनाचे कार्य याकडेही शिक्षकांनी लक्ष देणे गरजेचे आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की," प्रोफेसरांनी अध्ययनाच्या आणि अध्यापनाच्या कामी स्वतःला इतके वाहून घ्यावे की आपल्या घराकडे बघायला त्यांना मुळीच सवय मिळता कामा नये.हे काम संपूर्णपणे त्यांच्या पत्नीवर सोपविण्यात आले पाहिजे.प्रोफेसर लोकांनी भलती कामे अंगावर घेऊन आपल्या जबाबदाऱ्यांचे क्षेत्र वाढवीत जावे ही गोष्ट मला मान्य नाही. अध्ययन आणि अध्यापन यामध्ये संशोधन हे आलेच. या तीन गोष्टी खेरीज ओके सर आणि दुसरे कोणतेही काम करता कामा नये."

**सामाजिक विषमतेची चिरफाड**

म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक विषमतेची योग्य चिरफाड करण्याचा प्रयत्न केलेला आहे. महात्मा फुले यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन करून अनेक प्रकारची सामाजिक आंदोलने निर्माण करून धार्मिक परंपरांना नष्ट करून सामाजिक गुलामगिरी हद्दपार करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मनुष्य जातीने नव्हे तर कर्माने मोठा ठरत असतो असे महात्मा फुले यांचे म्हणणे होते. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही 'बहिष्कृत हितकारणी सभे'ची स्थापना करून त्याच्या माध्यमातून वस्तीगृह उघडणे ,शिक्षणाचा प्रसार करणे, वाचनालय, समाज केंद्रे ,अभ्यास मंडळे उघडून दलित वर्गात संस्कृतीच्या प्रसाराचे प्रचालन करणे त्याचबरोबर दलित वर्गाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे 'शेड्युल कास्ट फेडरेशन'च्या माध्यमातून सामाजिक राजकीय रूढींचा नायनाट करणे,अस्पृश्यता निवारण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळे, काळाराम मंदिर सत्याग्रह ,पर्वती मंदिर सत्याग्रह अशी कामे करून सामाजिक विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. याविषयी डॉ.प्रल्हाद लुलेकर म्हणतात की," आधुनिक मूल्यांची आग्रही भूमिका नव्या विचारातून येते. परिणामी नव्या-जुन्या मूल्यांचा संघर्ष होतो. मूल्य संघर्षाचा परिणाम मानवाच्या जीवन जाणीवेवर,संवेदनेवर आणि जीवनदृष्टी वर होतो.त्यातूनच संपूर्ण समाज आणि संस्कृती परिवर्तनासाठी तयार होत असते. हे परिवर्तन मूलगामी असते.समाजव्यवस्था आणि व्यवस्था मुल्यच बदलून जातात. विषमता नाकारली जाते. प्रस्थापितांचे समाजातील विशेष स्थान आणि विशेष हक्क नाकारले जातात. प्रस्थापितांविरुद्ध नवा संघर्ष करण्यासाठी बहुसंख्य सामान्य वर्ग सिद्ध होतो. करायला तो सर्व सामर्थ्यानिशी रणांगणात उतरतो. या काळात नव्या मुल्यासह नवा समाज निर्माण होणे अटळ असते.मानवी हक्कासाठी हे स्थित्यंतर घडविले जाते. आधुनिक भारताचा इतिहास असे युग परिवर्तन महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवून आले."

**स्त्रीमुक्ती आंदोलनाचे प्रणेते**

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. स्त्रियांना वैदिक संस्कृतीने गुलाम बनविले होते. त्यांचे अनेक अधिकार नाकारले होते.चूल आणि मूल एवढेच काम त्यांच्या हाती सोपवले होते. लहानपणी वडील तरुणपणी पती म्हातारपणी मुलगा यांनी त्यांचा सांभाळ करावा हे सांगितले होते. हे सारे नाकारून महात्मा ज्योतिबा फुले यांनी मुलींसाठी शाळा, बालहत्या प्रतिबंधक गृह,विधवा पुनर्विवाह साठी मोलाचे कार्य केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांसाठी हिंदू कोड बिल मांडले. मनुस्मृतीचे दहन केले. 1916 साली 'भारतातील जाती' हा ग्रंथ लिहिला. 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती 'काही शोधनिबंध लिहिला. 16 जून 1936 च्या मुंबई येथील दामोदर हॉलमध्ये झालेल्या सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, " स्त्री जात हा समाजाचा अलंकार आहे.प्रत्येक समाज स्त्रियांच्या चारित्र्याला अधिक मान देतो.आपली गृहिणी होणारी स्त्री उत्तम कुळातील असावी अशी प्रत्येक जण



अपेक्षा करतो. तशी पत्नी मिळावी म्हणून खटपट करतो. कारण त्याला माहित असते की आपल्या कुटुंबाचा व कुळाचा नावलौकिक स्त्रियांच्या शीलावर अवलंबून आहे. इतकी थोरवी स्त्रीवर्गाला प्राप्त झालेली आहे. काही वेश्यांनी आणि मुरुळ्यांनी बाबासाहेबांच्या मार्गदर्शनानुसार आपली स्वतंत्र संसार उभे केले. पोट भरणे एवढाच प्रश्न नसतो इज्जत अब्रू या गोष्टींचे मूळ कोणी करू शकत नाही. दलित स्त्रियांना साधी चटणी-भाकर ही मिळत नाही पण त्या इज्जतीने राहतात.असे बाबासाहेबांनी स्वाभिमानाचे शीलाचे आणि स्त्रीच्या महान व्यक्ती त्याचे वर्णन केले आहे." स्त्रियांच्या उन्नतीसाठी हिंदू कोड बिल मांडले होते. स्त्रियांच्या अधिकारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदा मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

कामगार आणि शेतकऱ्यांचे कैवारी

म. ज्योतिबा फुले यांनी शेतकऱ्यांच्या शोषणाची कहाणी सांगितली आहे.'तृतीय रत्न' नावाचे नाटक लिहून व इतर ग्रंथ लिहून महात्मा फुले यांनी शेतकरी दिन ,दलित ,गरीब यांचे ही व्यवस्था कशा प्रकारचे शोषण करते ;त्याचे दाखले देऊन ब्राह्मणी व्यवस्थेचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न केला. निराधारांना आश्रय देणे,अपंगांना सहाय्य करणे, विद्यार्थ्यांना जेऊ घालणे हाच खरोखर नीतिधर्म ज्योतिराव सांगत ज्योतिराव लिहितात,

***"स्त्री पुरुष सर्व कष्टकरी व्हावे|***
***कुटुंबा पोसावे | आनंदाने ||***
***नित्य मुली मुला शाळेत घालावे |***
***अन्नदान द्यावे | विद्यार्थ्यास ||***
***सार्वभौम सत्य स्वतः आचरावे |***
***सुखे वागवावे |पंगु लोकां ||***
***अशा वर्तनाने सर्वा सुख द्याल |***
***स्वतः सुखी व्हावं | ज्योती मनी ||***

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही आपला पीएच्.डी. चा प्रबंधात शेतकऱ्यांच्याविषयीची भूमिका स्पष्ट करून विकासाचे मार्ग खुंटले आहेत हे सांगितले आहे. अलिबाग येथे चारी गावात शेतकऱ्यांसाठी परिषद घेतली होती. चिपळूण येथे ही त्यांची जाहीर सभा झाली होती. आमदार असताना खोती निर्गुण संदर्भातील विधेयक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले होते.

**पत्रकारिता**

महात्मा फुले यांनी ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश ,दीनबंधू, सत्सार च्या माध्यमातून आपले वैचारिक मंथन घडवून आणून दीनदलितांच्या समस्यांना वाचा फोडलेली दिसून येते त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक प्रश्नांना,दुःखांना वाचा फोडायची असेल तर वृत्तपत्राची गरज फार मोठ्या प्रमाणावर असते म्हणून त्यांनी बहिष्कृत भारत, मूकनायक, प्रबुद्ध भारत, जनता हे वृत्तपत्र काढून सामान्याच्या प्रश्नांना पुढे आणून क्रांती करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉबाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकारिता क्षेत्रांमध्ये फार मोठे योगदान आहे याविषयी डॉक्टर सुखराम हिवराळे म्हणतात की,"मराठी भाषिक पत्रकारितेतील तिसऱ्या प्रवाहाची ही दलितांची पत्रकारिता भक्कम करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचे योगदान फार महत्त्वपूर्ण आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही केवळ नागरी जीवन आणि संस्कृतीच्या आणि ग्रामीण जीवन आणि संस्कृतीचाच प्रश्नांची पोटतिडकीने दखल घेणारी नव्हती, तर ती समग्र भारतीय जीवनाच्या आणि संस्कृतीच्या परिवर्तनाची पत्रकारिता होती आणि म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही लोक पत्रकारिता होती.'

**ग्रंथालय चळवळीचे प्रणेते**

महात्मा फुले यांच्या शाळेतील विद्यार्थ्यांनीना बक्षीस ज्यावेळी मिळाले होते त्यावेळी त्या म्हणाल्या मला बक्षीस नको ग्रंथालय हवे.त्याच प्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अठरा अठरा तास अभ्यास करायचे .त्याचबरोबर त्यांनी आपल्या पुस्तकासाठी 'राजगृह 'बांधले होते .हीच प्रेरणा घेऊन आज अनेक ठिकाणी ग्रंथालय उभे केले जात आहेत. अनेक जण वाचनाकडे शिक्षणाकडे वळतो आहे.

**साहित्यातून क्रांती**

साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो. समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. म. फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साहित्याअगोदर अगोदर सामान्याचे प्रतिबिंब मनावे तेवढे आणि परखडपणे साहित्यातून आलेले नव्हते .म्हणून म. ज्योतीबा फुले यांनी शेतकऱ्यांचा असूड, ब्राह्मणाचे कसब, गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म, तृतीय रत्न नाटक ,छत्रपती शिवाजी महाराज पोवाडा इ. ग्रंथ लिहून साहित्यातून क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य मूळचे कोण? जातीसंस्थेचे उच्चाटन, प्रॉब्लेम ऑफ रुपी अशी विविध ग्रंथ लिहून फार मोठी क्रांती घडवून आणली आहे. आजच्या साहित्यातून तसे लेखन दिसत नाही.त्या साहित्यातून समाजक्रांती होताना दिसत नाही.हे आजच्या साहित्याकापुढे त्यांचे साहित्य आदर्श आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की,"" मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की, उदात्त जीवनमूल्य आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कृत करा. आपले लक्ष आकुंचित,मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखनी आपल्या प्रश्नापुरती बंदिस्त करू नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या देशात उपेक्षितांचं, दलितांचं, दुःखितांचं फार मोठे जग आहे हे विसरू नका. त्यांचं दुःख,त्यांची व्यथा समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा त्यातच खरी मानवता आहे."

**धर्मचिंतन**

म. ज्योतिबा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म सत्यशोधक अनुयायांना मार्गदर्शन करण्यासाठी मानवतावाद निर्माण करण्यासाठी निर्माण केला त्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला.ज.वि.पवार म्हणतात की," क्रांतिबा फुले यांनी नवा विचार पेरायला सुरुवात केली तेव्हा त्यांना विरोध झाला तो परंपरा पुष्ट लोकांकडूनच. आगरकर, लोकहितवादी सारख्यांचे मर्यादित कार्य सुरू होते.परंतु धर्माला आव्हान देण्याचे धैर्य त्यांच्यात नव्हते. ज्योतीबांनी हे धैर्य दाखविले, शिवाय 'आमच्या दुरावस्थेला आपण जबाबदार आहात.या भाषेत इंग्रजांनाही खडसावले. जेव्हा समस्त उच्चवर्णीय इंग्रजांचे पाईक झाले होते. तेव्हा हे दारिद्र्य ज्योतीबाने दाखविले.कारण जोतिबा हे कालापुढे चालले होते.' त्याचपद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्म नाकारून बुद्ध धम्माचा स्वीकार केला व धम्माच्या माध्यमांमधून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय ही मूल्ये देण्याचा प्रयत्न केला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की," काही मनुष्यांना वाटते की, समाजाला धर्माची आवश्यकता नाही, या मताशी मी सहमत नाही, समाजाच्या जीवनाचा मी व्यवहाराचा पाया धर्मावर अधिष्ठित असण्याची आवश्यकता आहे असे माझे मत आहे. हिंदू समाजाचा पाया मनुस्मृति प्रणित धर्मावर अधिष्ठित असल्यामुळे हिंदू समाजातील सामाजिक विषमता काढून टाकने शक्य आहे असे मला वाटत नाही. हिंदू समाजाचा पायाच मनुस्मृति प्रणित धर्मावर आधारलेला आहे. तो कडून त्याऐवजी अधिक विशाल आणि न्याय्य पायावर हिंदू समाज आपली पुनर्घटना करील. याविषयी मी अगदी निराश झालो आहे. अशा प्रकारे आजच्या काळातही फुले,शाहू, आंबेडकरी विचार फार महत्त्वाचा आहे.हे आम्ही कुठलाही भेदाभेद न करता मान्य करायला हवे.तरच समाहित व देशहित साधले जाईल.

**संदर्भ :**

१) नरके हरी (संपा),महात्मा फुले साहित्य आणि चळवळ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले आणि राजश्री शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन, मुंबई प्रथमावृत्ती 2006
२) लुलेकर प्रल्हाद, भूमिकांचा ऐवज, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद प्रथमावृत्ती 2020
३) मनोहर यशवंत,आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन,नागपूर, पुनर्मुद्रण 2012
४) कीर धनंजय,महात्मा ज्योतिबा फुले, पाप्युलर प्रकाशन,मुंबई, पुनर्मुद्रण 2000
५) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरः लेखन आणि भाषणे,खंड -18 भाग -3
६) हिवराळे सुखराम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई. पुनर्मुद्रण 1999.
७) पवार ज.वि., विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, मेत्ता प्रकाशन, घाटकोपर ,मुंबई, प्रथमावृत्ती 26 जून 2013.
८) कीर धनंजय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई, तिसरे पुनर्मुद्रण 2003.

# प्रीतभावनेची उत्कट कविता चांदणस्पर्श : कवी - नंदू सावंत

**रसिक हो नमस्कार**

माझे मित्र नंदू सावंत हे पोलीस खात्यात नोकरी करीत, पण पोलिसी खाक्या " या माणसात कुणाला कधीच दिसला नाही तर तो जाणवणार तरी कसा ? या माणसाच्या व्यक्तीमत्वात एक अस्सल कलाकार आहे ...

रंगभूमीवरील हा कसबी आणि कुशल अभिनेता " फेसबुक ाध्यमातून मित्र झालाय. आमच्या मैत्रीची,स्नेह-प्रवासाची दशकपूर्ती झालेली आहे. या दरम्यान नंदू सावंत यांच्यातील कवीचे दर्शन होणे ही प्रोसेस ", माझ्यासाठी "कले कलेने - चंद्रकोर ते पूर्णचंद्र " असा आहे. त्याचे उदाहरण म्हणजे एप्रिल २०२२ मध्ये कवी नंदू सावंत या मित्राचा "पहिला कविता संग्रह - चांदणस्पर्श " प्रकाशित झाला . प्रचंड मित्र-परिवार असेलेल्या या मुंबईकर कवीच्या चांदणस्पर्श "संग्रहाचे स्वागत कौतुकपूर्ण उल्हासात झाले आहे " हे सांगणे न लगे. चांदणस्पर्श "संग्रहाची प्रस्तावना आणि ब्लर्ब मजकूर हे दोन्ही कविवर्य अशोक बागवे सरांचे विवेचक शब्द आहेत. म्हणजे " नंदू सावंत या कवीची कविता ..वाचकांना आनंद देणारीच आहे " याची खात्री बागवेसरांनी त्यांच्या विवेचनातून करून दिली आहे.

**बागवे सर म्हणतात** - प्रीतीतील हुरहूर, कातरता, स्तब्धता, निबोल निःशब्दता, विराहार्तता, सुखनिधानता, ऋतूमग्नता ,आणि विलगता अशा अनंत किरणांचे इंद्रधनुष्य त्यांच्या कवितांच्या आकाशात उमटलेले आहे.. असा प्रतिभावान कवी ..नंदू सावंत माझ्या मित्रपरिवारात आहे खूप छान वाटते. कुबेर समूहाच्या पुणे भेटीत या कवी मित्राने आवर्जून "चांदणस्पर्शची "प्रत सप्रेम भेट दिली. या संग्रहातील कविता वाचून ..प्रेम , प्रीती " या दोन्ही भावनांचे अनेक रंग उलगडत गेले , या कविता मनाला सुखद भावनेचा स्पर्श करणाऱ्या आहेत.



**कवी त्याच्या मनोगतात म्हणतो-**

" शिशिरातल्या पानगळीला वसंत ऋतूचा झाला हर्ष
हाय , सुखावूनी गेला बघ पालवीला तो चांदणस्पर्श ! ( थोडसं मनातल ..पृ.८ ),

चांदणस्पर्श "संग्रहात ६५ कविता आहेत . बहारदार अशा या प्रेमकविता वाचून रसिक मनोमन दाद देतील .

पाऊस आणि प्रेमीजन ..यांचे तर अतूट असे प्रेमाचे नाते .., निसर्ग , ऋतूपर्व ", भावविश्व , त्याचे मन , तिचे मन , दोघांचेही मन ..." याचे मोहक प्रेम-रूप म्हणजे कवी नंदू सावंत यांच्या कविता असे मला म्हणावेसे वाटते आहे.

कवी म्हणतो... "अगदी तसाच ..तस्साच ...
पाऊस कवेत घेतांना मला प्रेयसीचा भास होतो , ती
दरवळणारा मृदगंध
नि मी श्रावणमास होतो ...( पाऊस कवेत घेतांना ..पृ..७० ),

कवीसाठी कविता मनातून कागदावर उतरवणे काय असते ..तो असतो एक "आनंद सोहळा " याची ही कविता ...

" शब्द मांडता मांडता आली सजून कविता प्राप्त भावनाना झाले गूढ अर्थ काही वेगळे ... (आनंद सोहळे ..पृ..६० ),,

तो आणि ती ..." या कवितेतील त्याचा आणि तिचा "प्रेममय प्रवास वाचण्याजोगा आहे..

"तो प्रियकर झाला मी प्रेयसी झाले तो राऊळीचा कळस मी पायथ्याची वीट झाले ... ( तो आणि ती ..पृ..१७ ),

काही कवितांची शीर्षके- " मनीचे हे गुज ( पृ.२६ ), " मन चांदण (पृ.२९ ), श्वासाचं गणित " (पृ.३५ ), सांग गुपित मनीचे (पृ..४९ ), दिवाळी (पृ.६३ ), मनाचे हितगुज (पृ.७३ ), राधाकृष्ण (पृ.७९ ). बहरदार कवितांच्या या संग्रहाचे मुखपृष्ठ तितकेच आकर्षक आणि देखणे आहे. चित्रकार अरविंद शेलार यांचे आभार मानू या. संवेदना प्रकाशनाने हा सुरेख कविता संग्रह रसिकांना भेट देऊन कवी नंदू सावंत या मित्रांची कविता रसिकांच्या समोर आणली आहे.यांनाही धन्यवाद.

जरूर वाचावा असा हा चांदणस्पर्श. कवी- नंदू सावंतच्या लेखन प्रवासास शुभेच्छा.

**स्नेहांकित - अरुण वि. देशपांडे, कवी-लेखक पुणे- 850177342**

तुकारामनीती
भाग 35

# पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**दुःखाचा हिमालय समोर उभा असतांना जे शांत-संयम ठेवून त्याला धीरोदत्तपणे सामोरे जातात तेच खरे संत! संत म्हणजेच शांती! संत म्हणजेच प्रज्ञा, शिल, करुणा, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, रसाळ वाणी, दयार्दभाव आदि ज्याच्या अंतःकरणातून नित्य नित्य द्रवतात तेच खरे संत! बाह्य वेषाने अथवा संतांसारखे वस्त्र परिधान करणाऱ्या लोकांना आधुनिक फिल्म थेअरीच्या भाषेत कलावंत संबोधले जाते. याच अनुषंगाने "भगवे तरी श्वान । सहज वेश त्याचा ॥ तेथे अनुभवाचा । काय पंथ॥" असे जळजळीत शब्द लिहून बहुरूपी-कलावंत वेषधारी संतांना तुकोबांनी सतराव्या शतकात उघडे पाडले. तुकोबांचा हा विचार केवळ एखाद्या धर्म अथवा पंथातील व्यक्तीला नसून जे जे लोक जिथे जिथे असे अवडंबर माजवून सामान्य लोकांची भावनिक-बौद्धिक आणि अध्यात्मिक पिळवणूक करतात त्या सर्वच धर्म-पंथातील खिसेकापूंना उद्देशून तुकोबाराय असे अभंग लिहिते झाले. आद्य कवी मुकुंदराज, सर्वज्ञ चक्रधर स्वामी, संबोधि महात्मा गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत कबीर, संत रविदास, संत तुकोबाराय किंवा अन्य कुणी संतवृत्ती व्यक्ती असो, यांचे वाङ्मय अभ्यासल्यानंतर त्यातून नित्य नित्य त्यांचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित होत असते.**

हे प्रतिबिंब व्यक्तिमत्व त्यांच्यातील संत प्रवृत्तीचे द्योतक असते. ते नेहमी शांत स्वरूप असतात. त्यांच्या अंतःकरणातील जनसामान्याबद्दलची आंतरिक तळमळ सहजतेने ते लोकभाषेतून प्रकट होत असतात. तमाम समाजजीवनाचा सर्वांगीण अभ्यास करून सम्यक भाव प्रकट करतांना त्यांच्यासमोर समाजातील उपेक्षित-दुर्लक्षित घटक असतो, ज्याचे समाजातील सर्वच प्रस्थापित घटक शोषण करत असतात. जनसामान्यातून असामान्य अवस्थेला पोहोचलेली सामान्य माणसेच खऱ्या अर्थाने सामाजोत्थानाचे महत्कार्य करत असतात. त्यासाठी हे प्रज्ञावंत वैयक्तिक अडीअडचणी, अनुकूल-प्रतिकूलता, अशा-आकांक्षा याचा तसूभरही विचार न करता सामाजोद्धाराचे कार्य करत करत आपले विचार पेरत असतात.

या महान समाजसुधारक आणि सामाजोद्धारक संतांच्या मांदियाळीतील कलशस्थानी विराजमान असलेले नाव म्हणजे जगद्गुरू तुकोबाराय! तुकोबाराय म्हणजे सर्वकालीन आदर्श संसारिक आणि पारमार्थिक व्यक्तिमत्व! महत्प्रयासाने बोल्होबा-कनकाईच्या पोटी आलेले हे नररत्न नंतर संतपरंपरा आणि मराठीवाङ्मयाच्या कलशावर आरूढ होतील(!) असे कुणालाही वाटले नसेल! परंतु शेतकरी कुळात जन्मलेल्या या कुणब्याच्या पोराने आपल्या भजन, अभंग-कीर्तनाने सगळीकडे हाहाःकार माजवला! प्रस्थापितांना विचार करायला भाग पाडले. ज्यांच्या विचारांची उंची कमी पडली त्यांनी तुकोबांच्या शब्दांना शस्त्राने, लाठ्या-काठ्यांनी उत्तरे दिली. तरीही तुकोबा आपल्या कार्य आणि उद्दिष्टापासून तिळभर डगमगले नाहीत. अंगावर चिखल-शेण-गरम पाणी-लाठ्याकाठ्या झेलत इथल्या थोतांड, मानवधर्म विरोधी विचारांना मुळासकट उपटून टाकण्याचे कार्य चालूच ठेवले. संत तुकोबाराय 'ये हृदयीचे ते हृदयी' असा सरळ संवाद साधतांना स्वतःला एका उच्चतम वैचारिक-सैद्धांतिक-अध्यात्मिक पातळीवर नेऊन समाजातील अनिष्ठ बाबींची चिरफाड करतांना कुणाचीही भीडभाड ठेवत नाहीत. तुकोबा स्वतः भजन-कीर्तन करतांना समाजातील 'बुडणारे जण डोळ्यांनी पाहावेसे वाटत नसल्यामुळे' त्यांच्या नित्य जागृतीसाठी ते अभंग लिहितात आणि बोलतात. त्यांच्या भोवताल अनेक वेषधारी, भोंदू, समाजाची लुबाडणूक करणारे अनेक तथाकथित संत पाहून तुकोबांना त्याची प्रचंड चीड येते आणि मग सहजतेने ते

मुखें बोले ब्रम्हज्ञान । मनीं धन अभिमान ॥१॥
ऐशियाची करी सेवा । काय सुख होय जीवा ॥ध्रु.॥.
पोटासाठीं संत । झाले कलींत बहुत ॥२॥



विरळा ऐसा कोणी । तुका त्यासि लोटांगणी
॥३॥ (शा.अ.गाथा अ.क्र.६००)

असे अभंग लिहून जातात.

ही तुकोबांची रोखठोक तुकाराम नीती वाचकांना आणि संत-महंत, महाराज, विचारवंत, प्रबोधनकारांना विचारप्रवण करून जाते. हेच तुकोबांच्या लेखणीचे वैशिष्ट्य आहे जिथे ते कुणाचीच भीडभाड ठेवत नाहीत. अवडंबर, लोकांची फसवणूक-लुबाडणूक करणाऱ्या लुटारूंना तुकोबाराय संत म्हणायला तयार नाहीत. काही लोक मुखाने उच्च तत्वज्ञान-ब्रह्मज्ञान सांगतात आणि आपल्या मनात धन आणि अभिमान नावाचे मोठे शत्रू निवास करून ठेवतात. अशा लोभी, लोचट, अभिमानी लोकांची सेवा केल्याने कधीही आणि कोणताही लाभ होणार नाही. हे सर्व समाजसुधारक संत नसून हे केवळ आपल्या पोटाच्या तुंबड्या भरण्यासाठी तयार झालेले खोटारडे संत, समाजातील पोटार्थी जंत म्हणजेच एक प्रकारची कीड आहेत. असे संत म्हणजेच समाजाला झालेला एक रोगच आहे, परंतु जे कुणी यापलीकडे जाऊन कार्य करतात, प्रबोधन करतात अशा एखाद्या दुर्मिळ माणसांना तुकोबाराय मात्र शरण जातात. तुकोबांचा हा अभंग म्हणजेच तमाम थोतांडांच्या श्रीमुखात सणसणीत चपराक आहे. याशिवाय तुकोबाराय संताविषयी अनेक अभंग लिहून या लुटारुंचे कारनामे वेशीवर टांगतात. "संतांचे आप्त नव्हती ते संत" हा अभंग लिहून तुकोबाराय संतांचा वसा-वारसा सांगणाऱ्यांच्या पायाखालची माती काढून घेतात. बरेच मठ आणि फड आहेत जिथे वंशपरंपरेने त्या त्या संतांचे आप्त-नातेवाईक धनावर बसलेल्या नागोबासारखे बसून त्या त्या मठ अथवा फडाच्या संपत्तीचे शोषण करत आहेत. या सर्वच थोतांडांना तुकोबाराय त्यांची जागा दाखवून देतात. अशी रोखठोक भाषा लिहिणे साधी बाब नाही. असे कुणीही लिहू शकत नाही. 'अधिकार तैसा दावियेला मार्ग' किंवा 'आधी केले मग सांगितले' या प्रमाणे ते केवळ बडबड करत फिरले नाही. आपली कीर्तन-भजनाची निरपेक्ष सेवा श्री पांडुरंग चरणी अर्पण केली, स्वतःमध्ये अनंत बदल करून घेतांना त्यांनाही अनंत समस्या आणि संकटांचा सामना करावा लागला. तत्कालीन धर्ममार्तंडांनी तुकोबांना अतोनात छळले, तरीही तुकोबाराय आपल्या कार्यापासून तसूभरही ढळले नाही. त्यांनी आपले काम नेटाने पुढे नेतांना समाजाच्या उत्थानाचे महान कार्य केले.

आपल्या अभंगातून लोकांशी संवाद साधतांना अनेक गोष्टींचा उहापोह त्यांनी आपल्या अभंगात केला आहे. त्यांचे जीवनदर्शनानुभावाची बैठक मोठी आव्हानात्मक मार्गांने जातांना वाचकांना अंतर्मुख करून जाते. त्यांचा कालखंड मोठा खडतर! एकीकडे मुस्लिमांनी संपूर्ण समाजावर आपले प्रभुत्व गाजवलेले असतांना आपले प्रबोधनाचे काम करणे एवढे सोपे नव्हते, तर दुसरीकडे वर्णव्यवस्थेने शूद्रांचा लेखन-कीर्तनाचा अधिकार नाकारलेला असतांना दहा-पाच लोकांना एकत्र करून आपला वारकरी धर्म सांगणे, कीर्तन करणे आणि अभंग म्हणणे म्हणजे अगदी सुळावरील पोळीच! याही परिस्थितीत त्यांनी आपले कार्य चालूच ठेवले. हिमालय उचलण्याचे हे कार्य त्यांनी त्याही अवस्थेत मोठ्या ताकदीने पेलवून आपल्या वारकरी धर्मावरील निष्ठा ढळू दिली नाही. याचा परिणाम म्हणजे हळहळू तुकोबा लोकांना कळायला लागले. लोक त्यांचे ऐकायला लागले. हे सुद्धा इतरांना पचले नाही. त्यामुळे त्यांच्यावर अनंतवेळा हल्ले झाले, तर कित्येकवेळा विषप्रयोग करून मारण्याचा प्रयत्न केला. परंतु तुकोबा या सर्व संकटांना लीलया पेलून सर्वच शत्रूंना पुरून उरतात. एवढे आघात होऊनही तुकोबा आपल्या कार्यापासून ढळत नाहीत ही केवळ आणि केवळ त्यांच्या निष्ठा आणि भक्तीची शक्ती आहे. त्यामुळे संत तुकोबाराय काळाच्या माथ्यावर पाय देऊन कलशस्थानी विराजमान आहेत. तुकोबांना त्यांच्या लेखनाची ताकदच त्यांची रसद झाली. ही सगळी उदाहरणे इथे देण्याचे कारण म्हणजे आज माणसांसमोर अनेक आव्हाने उभी असतांना, माणूस त्या आव्हानांना घाबरतो आहे. परंतु आव्हाने ही माणसाची आंतरिक शक्ती तपासण्यासाठी येत असून त्यातून माणसाने तावून सुलाखून निघाले पाहिजे. आलेल्या आव्हानांचा लीलया सामना करून आपली सिद्धता सिद्ध केली पाहिजे. असे झाल्यास खऱ्या अर्थाने तुकोबाराय आपले नित्य काळातील मार्गदर्शक ठरतील.

त्याशिवाय वरील प्रकारच्या संकटांनी घेरलेले असतांना तुकोबा आपले परखड लेखन थांबवत नाहीत. त्यांना त्यासाठी मार खावा लागला असला तरी, त्यांनी आपले लेखन थांबवले नाही. आज तुकाराम नीती लिहितांना आणि तुकोबांच्या अभंग-जीवनाचे अवलोकन करतांना अनेक प्रश्न समोर उभे आहेत. वारकरी संप्रदायाची बैठक मोठी मजबूत आहे. तरीसुद्धा काही मुलभूत गोष्टींकडे सांप्रदायातील लोकांनी डोळेझाक करता कामा नये. वाढलेले कार्यक्रम, विविध माध्यमाद्वारे होणारा प्रचार-प्रसार, त्यातून होणारी मोठी आर्थिक उलाढाल आणि त्याविषयी समाजात होणाऱ्या उलट-सुलट चर्चा या बाबींचा विचार होणे अगत्याचे आहे. त्याचबरोबर कार्यक्रम जरी वाढले असले तरी त्याची परिणामकारकता घटली आहे हे ही दुर्लक्षून चालणार नाही. त्यामुळे आजच्या अभंगाचे काहीप्रमाणात का होईना महाराज-प्रबोधनकार मंडळींनी अवलोकन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. वारकरी सांप्रदायातील वाढती व्यापारी वृत्ती उद्यासाठी नक्कीच धोक्याची घंटा आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. तुकोबाराय आज असते आणि एवढे रोखठोक लिहून कीर्तन करायला लागले असते तर काही लोकांचा धंदा बुडाला म्हणून त्या तथाकथित महाराजांनी त्यांना आजसुद्धा मारले असते का काय (?) असा अनामिक प्रश्न मला कधी कधी पडून जातो आणि मी अंतर्मुख होतो. सज्जनहो, माणसाने किती धन-पैसा-संपत्ती कमावली यापेक्षा माणूस किती माणसांची प्रेरणा झाला? किती माणसे जोडली? किती माणसांचा आनंद द्विगुणीत केला यावरून त्या माणसाचे मूल्यमापन होत असते, झाले आहे हे सर्वश्रुत आहे. तेंव्हा चला व्यवहार-व्यापारापेक्षा मानवी मुलभूत मुल्यांची रुजवणूक-जपणूक करून माणसे पेरण्याचे काम करूयात! असे होणे म्हणजेच या तुकाराम नीतीचे सार्थक होणे आहे! जय तुकोबाराय!

# अष्टपैलू अभिनेता काळाच्या पडद्याआड




श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५


आधुनिक केसरी

**हिंदी, मराठी चित्रपट सृष्टीतील अष्टपैलू, देखणे, आणि रुबाबदार अभिनेते म्हणून प्रसिद्ध असणारे जेष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने रसिकांना मोठा धक्का बसला आहे. ३० ऑक्टोबर १९४५ रोजी जन्मलेले विक्रम गोखले यांना अभिनयाचा वारसा त्यांच्या कुटुंबातूनच मिळाला. त्यांच्या पणजी दुर्गाबाई कामत, आजी कमलाबाई गोखले आणि वडील चंद्रकांत गोखले अशा त्यांच्या तीन पिढ्या अभिनय क्षेत्रात कार्यरत होत्या.**

त्यांचे वडील चंद्रकांत गोखले हे तर हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते होते. जवळपास ७० हुन अधिक चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या होत्या. त्यांच्या वडिलांकडूनच त्यांना अभिनयाचे बाळकडू मिळाले होते. लहान वयातच त्यांनी बाल कलाकार म्हणून काही नाटकात भूमिका केल्या. नाटकात येण्यापूर्वी त्यांनी विजया मेहता यांच्याकडून अभिनयाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले होते. त्यांनी भूमिका केलेले बॅरिस्टर हे नाटक त्या काळात खूप गाजले. या भूमिकेद्वारे मराठी रंगभूमीला एक उमदा अभिनेता लाभला ज्याने पुढे अनेक दशके मराठी रंगभूमीवर अधिराज्य



गाजवले. एखादी तरी स्मितरेषा, कथा, कमला, कल्पवृक्ष, कन्येसाठी, के, दिल अभि भरा नही, खरं सांगायचं तर, छुपे रुस्तम, जावई माझा भला, दुसरा सामना, नकळत सारे घडले, पुत्र मानवाचा, बॅरिस्टर, मकरंद राजाध्यक्ष, महासागर, मी माझ्या मुलांचा, संकेत मिलनाचा, सरगम स्वामी ही त्यांनी भूमिका केलेली नाटके खूप गाजली. त्यांना जी भूमिका मिळत त्या भूमिकेचा आधी ते बारकाईने अभ्यास करीत आणि आपल्या आकलन आणि निरीक्षण शक्तीच्या जोरावर त्या भूमिकेवर आपला ठसा उमटवित. आधारस्तंभ, आम्ही बोलतो मराठी, कळत नकळत, ज्योतिबाचा नवस, दरोडेखोर, दुसरी गोष्ट, नटसम्राट, भिंगरी, महानंदा, माहेरची साडी, लपंडाव, वजीर, वऱ्हाडी आणि वाजंत्री, वासुदेव बळवंत फडके हे त्याचे मराठी चित्रपट गाजले. केवळ नाटकातच नव्हे तर चित्रपट असो वा दूरचित्रवाणीवरील मालिका प्रत्येक भूमिका स्वीकारताना ते हीच पद्धत वापरत म्हणूनच त्यांनी केलेल्या भूमिका रसिकांच्या मनात कोरल्या जात. मग ती माहेरच्या साडीतील कठोर मनाच्या वडिलांची भूमिका असोत की अग्निपथमधील हळव्या मनाच्या जेलरची भूमिका असो. आपल्याला मिळालेल्या भूमिकेची लांबीपेक्षा खोली किती मोठी आहे हे ते पाहत त्यामुळेच त्यांचा लहान लहान भूमिका देखील रसिकांच्या लक्षात राहिल्या. नाटक आणि चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिकेप्रमाणेच टीव्ही मालिकेत त्यांनी केलेल्या भूमिका देखील गाजल्या. टीव्हीवरील अग्निहोत्र या मालिकेत त्यांनी साकारलेले मोरेश्वर अग्निहोत्र हे पात्र आजही रसिकांच्या मनात घर करून गेले आहे. याशिवाय अकबर बिरबल, अल्पविराम, उडाण, कुछ खोया कुछ पाया, जीवनसाथी, द्विधाता, या सुखांनो या या मालिकेतील त्यांच्या भूमिका रसिकांना भावल्या. हम दिल दे चुके सनम, भूल भुलैय्या, मिशन मंगल, अग्निपथ, दिल से अशा अनेक मोठ्या हिंदी चित्रपटांमध्येही त्यांनी भूमिका केल्या. चित्रपट सृष्टीतील त्यांनी केलेल्या भूमिकेसोबतच त्यांनी केलेले सामाजिक कार्य देखील मोठे आहे. आपली आजी कमलाबाई गोखले यांच्या नावे त्यांनी चॅरिटेबल ट्रस्ट उभारला आहे त्या ट्रस्टच्या माध्यमातून अपंग सैनिक आणि समाजातील उपेक्षितांसाठी त्यांनी मोठे काम केले आहे. कलाकारांना उतार वयात हक्काचे व्यासपीठ असावे या उद्देशाने दोन एकर जमीन अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाला दान केली आहे. विक्रम गोखले यांना त्यांच्या अभिनय कलेसाठी अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. नाटक, चित्रपट आणि दूरचित्रवाणी अशा सर्व माध्यमात भूमिका करून आपल्या अभिनयाचे रसिकांवर गारुड निर्माण करणारा हा श्रेष्ठ नट असा अकाली निघून गेल्याने चित्रपट सृष्टीत मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीचे जे नुकसान झाले ते कधीही भरून न निघणारे आहे. त्यांच्या निधनाने एक श्रेष्ठ, अष्टपैलू कलाकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. अष्टपैलू अभिनेते विक्रम गोखले यांना भावपूर्ण श्रद्धांजली!









# आमच्या घरातील सारेजण आधुनिक केसरी वाचतात



आधुनिक केसरी

संपादक महोदय...
दैनिक आधुनिक केसरी यांना
श्रीनिवास धूत यांचा नमस्कार
आज व्हाट्सएप ग्रुपवर दैनिक आधुनिक केसरी मधील आपण टाकलेला खंडोबा देवस्थानाचा सुंदर सजावट केलेला फोटो पाहिला अतिशय भावपूर्ण फोटो पाहून मन प्रसन्न झालं.
विशेष म्हणजे आमच्या ग्रुप मधिलच सुधीर कोर्टीकर यांनीच तो काढलेला आहे असे समजल्यावर खूप आनंद झाला. आपल्याच ग्रुपवर असलेले सुधीर कोर्टीकर.. एका हरहुन्नरी कलाकार आहेत. मग अशा मित्राचे अभिनंदन करण्याचा मोह झाला. त्यांचे अभिनंदन केले.
संपादक या नात्याने आपले अभिनंदन लिखीत स्वरुपात करीत आहे. आपला दैनिक आधुनिक केसरी या ईपेपरचा मी एक रसिक वाचक आहे बरं का. विशेषतः आपला रविवारचा अंक तर वाचनासाठी परिपूर्ण असा असतो. आमच्या घरातील सारेजण न विसरता रविवारचा अंक वाचतो. कथा..कविता..विविध इतर वाचनिय लेख देखील असतात.त्यासाठी संपादक या नात्याने तुमचं किती कौतुक तितकं ते अपुरच आहे  असंच मला वाटतं... आमच्या घरात सगळ्यांनाच वाचनाची खूप आवड आहे...
त्यामुळे आधुनिक केसरी संपूर्ण वाचला जातो.
मी स्वतः प्रा. श्रीनिवास धूत. ( निवृत्त) एम्. बी.ए. कॉलेज चा संचालक, लेखक, वृत्तपत्रीय लेखन खूप केलेलं आहे , आकाशवाणीवर व्याख्याने बरीच दिलेली आहेत. एअर इंडियाचा बोल्ट अवार्ड सह अनेक अवार्ड्स. मला देऊन गौरविण्यात आले आहे. खूप गोष्टी आहेत त्या इतर सर्व समक्ष भेटीत बोलता येईल.संपादक महोदय आपणांस भेटण्याची इच्छा आहे...
आपणं मला वेळ द्यावा हिच नम्र विनंती आहे...
तसेच सुधीर कोर्टीकरांनाही भेटण्याची इच्छा आहे. कोर्टीकरांचा  अनेक क्षेत्रातील सहभाग व त्याचा संग्रह इतरही अनेक कला गुण छंद जाणुन घेणे खूप आवडेल. पाहुयात तो योग जुळून कधी येईल असेच वाटते...

**आपल्या आधुनिक केसरीचाच एक वाचक...**
**श्रीनिवास धूत**
**मो.नं. ९३७०६४६८३३**

# गुन्हेशाखेची कामगिरी, तीन गुन्हे उघडकीस

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सिडको औद्योगिक आणि जवाहरनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेले गुन्हे क्राइम ब्रान्च ने उघडकीस आणले आहेत चोरट्याना मध्यप्रदेश आणि दिल्लीहून अटक करत सिडको औद्योगिक पोलिसांच्या हवाली केले आहे, अशी माहिती वरिष्ठ सूत्रांनी दिली मोहम्मद नासेर ( २५ ) रा. दिल्ली शाहिनबाग व  रुपेश नागोले ( २३ )रा बैतुल मध्यप्रदेश अशी अटक आरोपीची नावे असून ते रेकॉर्डवरचे गुन्हेगार आहेत.  कपड्याचे व्यवसायिक म्हणून  शहरात येत होते  गेल्याजानेवारी मध्ये एन १ सिडको परिसरात राहणारे डॉ. संजय तोष्णीवाल यांचे एक आठवडा बंद असलेले घर फोडून २० लाखांचा मुद्देमाल चोरून नेला त्यानंतर तब्बल ९ महिन्यांनी १८ नोव्हेंबर रोजी एन१सिडको मधे राहणारे हर्षवर्धन शास्त्री ( ५५ ) यांच्या घरात १लाख १७ हजारांचा मुद्देमाल लंपास केला.वरील दोन्ही प्रकरणी सिडको औद्योगिक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत व त्याच रात्री शहानुर वाडी परिसरात डॉ.प्रसाद देशपांडे यांचे बंद  घर फोडून अंदाजे १ लाख रु चा मुद्देमाल चोरून नेत असतांनाच डॉ. देशपांडे दार उघडून  घरात आले व घराच्या छतावर चाहूल  लागताच  चोरट्याना मज्जाव करण्याचा प्रयत्न केला.पण त्यांना चोरटयांनी मारहाण केली. यावेळी चोरट्याचा मोबाईल देशपांडेच्या छतावर पडला. या प्रकरणी जवाहरनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला   गुन्हेशाखेने डॉ. देशपांडे यांच्या चोरी प्रकरणी तपास सुरु केला असता त्यांना चोरट्याचा मोबाईल देशपांडेच्या घरात सापडला त्यातील सीडीआर तपासले असता विशाल नगरातील एका शिंप्याचा नंबर गुन्हेशाखेला मिळाला त्याला ताब्यात घेत चौकशी केली. वरील दोन्ही चोरटे कपड्याच्या व्यवसाया निमित्त शहरात आले असता ओळख झाल्याचे शिंप्याने सांगितले. चोरट्याने त्यांच्या घरात ठेवलेल्या  बॅगमध्ये हर्षवर्धन शास्त्री यांचा मुद्देमाल सापडला त्यानंतर गुन्हेशाखेचे दोन पथक मध्यप्रदेश व दिली येथे रवाना झाले व चोरटे ताब्यात घेतले तेंव्हा त्यांनी जानेवारीत डॉ. तोष्णीवाल यांचे घरफोडल्याची कबुली दिली. वरील कारवाई पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता, उपायुक्त अपर्णा गीते सहाय्क पोलीस आयक्त विशाल ढुमे पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय अमोल म्हस्केसुनील बेलेकर, नवनाथ खांडेकर अजय दहिवाल यांचा समावेश आहे.

# गडचिरोलीत भांडवलदारांचे राज्य: जयंत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** पुरोगामी कायदे करण्याचा राज्याचा लौकीक आहे. परंतु आज गडचिरोलीसारख्या मागास जिल्ह्यातील गरीब माणसाच्या हक्क आणि अधिकारांचे रक्षण होताना दिसत नाही. येथे भांडवलदारांचे राज्य असल्याचे दिसून येत आहे, अशी टीका विधिमंडळातील ज्येष्ठ सदस्य सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केली. भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या मध्यवर्ती समितीची दोन दिवसीय बैठक २६ नोव्हेंबरपासून गडचिरोलीत होत आहे.



# महासंचालकांकडून बिडकीन पोलिसांना १० हजारांचे रिवॉर्ड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** बिडकीन पोलिसांना मोक्कांतर्गत गुन्ह्याच्या उत्कृष्ट तपास कार्याबद्दल पोलिस महासंचालक रजनीश शेठ यांनी १०हजार रु.रोख रिवॉर्ड दिले, अशी माहिती उपअधिक्षक विश्वंभर गोल्डे यांनी दिली. २०२१साली बिडकीनच्या तोंडोळी शिवारात दरोडा व बलात्कार करणाऱ्या ७आरोपींना मोक्कांतर्गत कारवाई करुन बिडकीन पोलिसांनी उत्कृष्ट तपासकरंत आरोपी अटक केले होते. हा तपास पैठणचे उपविभागिय अधिकारी विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली बिडकीन पोलिस ठाण्याचे एपीआय संतोष माने, पीएसआय जगदीश मोरे यांनी गुणात्मक पध्दतीने पार पाडला. त्यामुळे उपविभागिय अधिकारी विशाल नेहुल यांना ५हजार रु.तर एपीआय माने व पीएसआय मोरे यांना प्रत्येकी अडीच हजार रु.रिवॉर्ड पोलिस महासंचालकांनी जाहिर केले होते. ते आज औरंगाबाद परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक के.एम. मल्लीकार्जून प्रसन्ना यांच्या हस्तू व पोलिस अधिक्षक मनिष कलवानिया यांच्या उपस्थितीत एका समारंभात प्रशस्तीपत्रासह प्रदान करण्यात आले.






# भारतीय संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिकेचे वाचन



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारतीय संविधान दिननिमित्त शहरातील सर्व थरातील नागरिकांनी  शनिवार रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर एकत्र येऊन डॉ. बाबासाहेब यांच्या पुतळ्याला प्रथम पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले, नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी व सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी पुष्पहार अर्पण केला, त्या नंतर भारतीय घटनेच्या उद्धेशिकेचे वाचन धोंडीराम राजपूत यांनी केले. आयोजक राजेश गायकवाड यांनी ही अभिवादन केले या प्रसंगी जयप्रकाश बोरगे, दिलीप अनर्थे,संजय बोरनारे, तांबूस आप्पा, कैलास भाटे, शिवा थोरात,रुद्रा शेजवळ, विलास म्हस्के, कैलास बागुल, दीपक बरकसे, ज्ञानेश्वर सिरसाट,बाबासाहेब जगताप आदी उपस्थित होते.


काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in